१९४६

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ७३२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय [illegible] नालय शाखा.

| अनुक्रम नं. | विभाग | क्रमांक |
| --- | --- | --- |
| | | |

पुस्तकाचें नांव [illegible] कोटणीस

लेखक अनुवादक प्रो. दीनानाथ [illegible]

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

RFFBK-0006723

# डॉक्टर कोटणीस

[ के. आब्बास यांच्या And one did not come back या पुस्तकाचा अनुवाद ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६७२३

दीनानाथ म्हात्रे

REFBK-0006723

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

हें पुस्तक तयार होत असतांना ज्या माझ्या मित्रांनीं मला प्रेमळपणें सहाय्य केलें, त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

—

दीनानाथ म्हात्रे

किंमत २ रुपये

प्रथमावृत्ति फेब्रुआरी १९४६
द्वितीयावृत्ति मे १९४६

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

---

प्रकाशक—शंकर वामन कुळकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४
मुद्रक--रा. का. तटणीस, श्री-लक्ष्मीनारायण प्रेस, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई २

म.ग्रं.सं.ठाणे.

अुनकी यादमें—

जिन्होंने अपने खूनसे

हिंदुस्थानकी बागको सींचा!

दा. क्र. ६८२३

I understand the large hearts of heroes.
The courage of present times and all times,
The disdain and calmness of martyrs......,
All this I swallow, it tastes good, I like it well, it becomes mine,
I am the man, I suffered. I was there.

—WALT WHITMAN

हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसनें चीनला पाठविलेल्या या वैद्यकीय पथकाची गोष्ट, पथकामधल्या एकाद्या व्यक्तीनेंच सांगणें योग्य होतें. कळकळीच्या आणि त्यागाच्या या ज्वलंत अनुभवाच्या गोष्टीला वास्तवतेचा–पथकामधल्या प्रत्यक्ष एकाद्या व्यक्तीचा–हात लागला असता, तर अधिक बरें झालें असतें; पण बिकट परिस्थितीमुळें, या डॉक्टरांपैकीं कोणालाच हें काम सध्यां हातीं घेतां येत नाहीं. पांचांपैकीं डॉ. कोटणीस दुर्दैवानें चीनमध्येंच मृत्यु पावले. डॉ. अतुल आणि मुकर्जी आतां कारावासांत आहेत.......या विलक्षण, पण महत्त्वाच्या फासिस्टविरोधी ध्येयात्मक कथेला ती एक पुरवणी आहे! पथकांतील सर्वांत वयोवृद्ध डॉक्टर चोळकर यांनीं आपलें डॉक्टरकीचें काम पुन्हां चालू केलें आहे. उत्तर चीनमधल्या कडक थंडीमुळें ते एका वर्षानंतर परत आले. तेथें काम करणें त्यांना शक्य नव्हतें. त्यांच्या वयोमर्यादेच्या पलीकडचें होतें तें. राहिले डॉ. बसू. सर्वांच्या शेवटीं ते चीनमधून निघाले. थोडयाच महिन्यांपूर्वीं ते हिंदुस्थानांत आले आहेत आणि आतां देशभर फिरून, चीनला दुसरें वैद्यकीय पथक पाठवायची

कल्पना लोकांना पटवून देत आहेत. अशा स्थितींतही त्यांचा दोन आठवड्यांहून जास्त वेळ घेऊन, मीं त्यांच्याकडून बरीच माहिती मिळविली. डॉ. बसूंच्या साद्यंत रोजनिशीचाही हें पुस्तक लिहिण्यास फार उपयोग झाला आहे. कांहीं ठिकाणीं अवश्य वाटल्यावरून छापील मजकुराचा, उदाहरणार्थ—' एडगर स्नोच्या ' पुस्तकांचा वास्तवतेसाठीं, तसेंच ठराविक स्थलांची बरोबर माहिती मिळावी, त्या स्थलांचें चित्रण योग्य तऱ्हेनें व्हावें म्हणून उपयोग केला आहे.

× × ×

मीं हें जें काम हातीं घेतलें आहे, तें लेखकाचें म्हणण्यापेक्षां बातमीदाराचें म्हणणें अधिक योग्य ठरेल. फक्त शब्द माझे आहेत. अनुभव मात्र चीनला गेलेल्या या पांच निर्भय वीरांचे आहेत. पण बातमीदाराला एक चटक लागलेली असते. ती म्हणजे अद्भुत साहसांचें वर्णन ऐकायची! आणि डॉ. बसू जेव्हां आपले रोमांचकारी अनुभव सांगूं लागले, तेव्हां मला वाटलें, ' मी पथकाबरोबर चीनमध्येंच आहें. चुंकिंगमध्यें बॉंबहल्ला होत आहे आणि मी त्यांत आहें. चीनच्या ईशान्य भागांत शत्रूच्या पिछाडीवरून धोक्याच्या मार्गानें मी मैलच्या मैल तुडवीत जात आहें ' आणि म्हणूनच ही महत्त्वाची गोष्ट मला सांगायला मिळते आहे, हा मला मोठा बहुमान वाटतो. कारण पं. जवाहरलालजींनीं जेव्हां ही योजना मोठ्या कळकळीनें लोकांसमोर ठेवून, मदत करण्याची विनंति केली, त्या वेळेपासूनच मी या योजनेशीं पुरता तद्रूप झालों होतों. जुलै १९३८ मध्यें मी शांघायमधून प्रवास करीत होतों. चीनला हिंदुस्थान वैद्यकीय पथक पाठवणार म्हणून बातमी प्रसिद्ध झाली, त्या वेळचा चिनी लोकांचा उत्साह आणि आनंद काय वर्णावा! ती बातमी ऐकून सर्व चिनी जनता, हिंदुस्थानच्या या प्रेमळ देणगीचें उत्साहानें स्वागत करण्याकरितां अधीर झाली होती. या उदार देणगीचा ' पुकार ' ऐकून कृतज्ञतेनें प्रत्येकाचें हृदय भरून येत होतें.

पथक चार वर्षें चीनमध्यें काम करीत असतांना त्याच्या कामगिरीविषयीं आणि अनुभवांविषयीं ज्या त्रोटक बातम्या हिंदुस्थानमध्यें

येत, त्या मी अधाशीपणानें वाचून काढीत असें. मला त्यांत विलक्षण आनंद मिळे.

पण एकाएकीं गेल्या वर्षी जेव्हां डॉ. कोटणीसांच्या मृत्यूची दुःखद बातमी आली, तेव्हां माझें अंतःकरण बधिर झालें. या दुःखदायक घटनेचा—बलिदानाचा—माझ्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला, कीं लगेच कल्पनेनें 'बॉम्बे क्रॉनिकल' मध्यें "डॉ. कोटणीसांचे शेवटचे क्षण" या मथळ्याचा एक लेख मीं लिहिला. नंतर तो लेख माझ्या एका पुस्तकांत (Let India Fight For Freedom) 'He Died For China' या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झाला. डॉ. बसूंनीं जेव्हां तो वाचला, तेव्हां ते म्हणाले, "तुम्हीं कल्पनेनें लिहिलेला हा लेख तर तेथल्या खऱ्या परिस्थितीशीं बऱ्याच अंशीं जुळतो."

× × ×

ही गोष्ट, खळबळ उडविणारी आणि प्रेरणा उत्पन्न करणारी आहे. अशा तऱ्हेची गोष्ट वृत्तपत्रव्यवसायाच्या धंद्यांत अकस्मात् केव्हां तरी एकदांच येते. ज्याच्या आयुष्यांत ती येते, तो बातमीदार अतिशय भाग्यवान्.

हा पांच शूर ध्येयवाद्यांचा इतिहास आहे! सर्वांत अनुभवी साठ वर्षांचा, आणि तरुण सव्वीस वर्षांचा. या डॉक्टरांनीं पथकांत भाग घेऊन, जाणूनबुजून आपलीं जीवितें संकटांत घालून, या साहसांत निर्भयपणें उडी घेतली, लाखों वेळां जपानी बॉम्बगोळ्यांना चुकवीत, शत्रूंनीं उध्वस्त केलेला हजारों मैलांचा ओसाड भाग त्यांनीं तुडविला, शत्रूकडून पकडले जाण्याचा धोका पत्करून, साध्या निकृष्ट अन्नावर दिवस काढले, भुयारांत अगर गवतानें शाकारलेल्या शेतकऱ्यांच्या झोंपड्यांत नवीन तऱ्हेच्या बांबूंच्या उपकरणांनीं महत्त्वाच्या शस्त्रक्रिया पार पाडल्या. ही नुसती मामुली घटना नव्हती. गुलामगिरींत आणि दारिद्र्यांत पिचलेलें हिंदुस्थानचें हृदय जणूं दुनियेंतील समानधर्मी मानवांकडे सहानुभूतीनें ओढ घेत होतें. फासिस्टविरोधी जागतिक आघाडीला प्रत्यक्ष मदत करून, लोकशाहीच्या तत्त्वांना हिंदुस्थान मान देतो आणि तो जर स्वतंत्र असता, तर त्यानें चीनकरितां काय केलें असतें हें व्यक्त करण्याकरितांच, हें

लहानसें पांच डॉक्टरांचें पथक राष्ट्रीय हिंदुस्थाननें पाठविलें. शाब्दिक सहानुभूति आजकाल अमेरिका आणि ब्रिटन चीनला दाखवीत आहेत. पण हिंदुस्थाननें जेव्हां चीनला वैद्यकीय पथक पाठविलें, तेव्हां इकडे अमेरिकेकडून जपानला तेल व युद्धसाहित्य यांची निर्यात केली जात होती आणि ब्रिटन निपॉनच्या युद्धदेवांना खूष करण्यासाठीं, ' चीनचें हृदय ' ज्याला म्हणतां येईल, तो " बर्मारोड " बंद करण्याच्या प्रयत्नाला लागलें होतें.

वैद्यकीय पथकाची ही कल्पना कोणाला सुचली? जवाहरलाल नेहरूंना! पण आज ते कोठें आहेत? तुरुंगांत ... !! त्यांना तेथें कोणी पाठविलें? अवघ्या हिंदुस्थानवर सत्ता गाजवूनही स्वतःला चीनचा मित्र म्हणविणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यशाहीनेंच! महात्मा गांधी—ज्यांनीं मोठ्या उत्साहानें पथकाला पाठिंबा देऊन आशीर्वाद दिला—तेसुद्धां आज तुरुंगांत आहेत. " चायना रिलीफ कमिटी " चे चिटणीस जी. पी. हाथीसिंग–ज्यांनीं पथकाकरितां फंड जमवून इतर सर्व व्यवस्था पाहिली–ते हल्लींच जामिनावर बाहेर सुटले आहेत. आणि ज्यांनीं या पथकास मदत केली, असे पुष्कळ लोक आज तुरुंगांत आहेत. फार काय, चीनकरितां पाशवी फासिस्ट सत्तेविरुद्ध तोंड देण्यासाठीं ज्यांनीं आपलीं जीवितें धोक्यांत घातलीं ते डॉ. मुकर्जी व डॉ. अतुलही आज तुरुंगांत आहेत. इतकें असूनही आमच्या साम्राज्यकर्त्यांचीं वर्तमानपत्रें निर्लज्जपणें अफवा पसरवितात, कीं..." गांधी, नेहरू, मुकर्जी हे फासिस्टांचे मित्र आहेत—लोकशाहीचे शत्रु आहेत--" या पुस्तकानें तरी त्यांचीं तोंडें बंद होवोत.

कॉंग्रेसच्या वैद्यकीय पथकाचें चीनमध्यें मोठ्या उत्साहानें स्वागत झालें. चीनमधल्या अगदीं मोठ्या अधिकाऱ्यांपासून तों साध्या माणसांनीं त्यांत भाग घेतला आणि यामुळें हेंच सिद्ध झालें कीं, ' हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेस ' हीच हिंदुस्थानच्या लोकांची एकमेव प्रातिनिधिक संस्था आहे. नव्या दिल्लीची नोकरशाही आणि त्या नोकरशाहीच्या मागें गोंडा घोळणारे इतर लोक, न्यूयॉर्क-वाशिंग्टनला जाऊन नाटकी थाटांत हिंदुस्थानच्या नांवानें वाटेल तीं मतें प्रदर्शित करोत; पण कॉंग्रेसनें–गांधी नेहरूंनीं–पाठविलेले हे पांच डॉक्टर अखिल हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून चीननें स्वीकारलें, आणि

त्यांचें प्रेमानें स्वागत केलें. या पांच डॉक्टरांच्या मुखानें सारी हिंदी जनता त्यांच्या चिनी दोस्तांबरोबर बोलली...त्यांना तिनें बंधुत्वाचा नी प्रेमाचा संदेश दिला. शत्रूविरुद्ध प्रतिकाराबद्दल अपूर्व आदर व्यक्त केला; आणि आपल्या या पूर्वकालीन शेजाऱ्याबरोबर पुनः त्यांच्या ह्या स्वातंत्र्याकरितां चाललेल्या लढ्यांत बंधुत्वाच्या नात्यानें हितसंबंध जोडले. पथकांतल्या प्रत्येक सभासदानें हिंदुस्थानांत परत येतांना बंधुत्वाचा आणि प्रेमाचा संदेश आणला. हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा लवकर पुऱ्या व्हाव्या, हा तो संदेश होता.

पण पथकांतील एक जण परतला नाहीं–डॉ. कोटणीस—! ज्यांच्या बलिदानानें, पवित्र मृत्यूनें चीनमधील स्वतंत्र जनतेचे आणि हिंदुस्थानचे हितसंबंध अधिक दृढ झाले आहेत.

# १

"No man is an island entire of itself, every man is a piece of the continent, a part of the main,......any man's death diminishes me because I am involved in mankind, and therefore never send to know for whom the bell tolls, it tolls for thee".

—JOHN DONNE ( an 18th century poet.)

भयंकर स्वार्थप्रेरित आधुनिक युद्धतंत्रांत, माणुसकीला जागून स्वतःचा जीव संकटांत घालून, शस्त्राशिवाय लढणारे योद्धेही आढळतात; रणांगणावर ते उतरतात ते जखमा भरायला, जखमा करायला नव्हे. त्यांचा उद्देश लोकांना मारायचा नसून तारायचा असतो. डॉक्टर, परिचारिका, स्ट्रेचर उचलणारे यांचें काम पाहूनच फक्त असें वाटतें कीं, माणसांची उत्क्रांति रानटी अवस्थेंतून कोणत्या तरी भल्या मार्गानें होत असावी.

बुद्ध, ख्राइस्ट, महंमद व इतर मानव्याचा संदेश देणारे महात्मे आणि फ्लॉरेन्स नाइटिंगेल हिनें क्रिमिअन युद्धाच्या वेळीं प्रज्वलित केलेली ज्योत आजच्या अमानुषतेच्या अंधकारांतसुद्धां प्रकाश देत आहे. नर्स कॅव्हेल आज कोठें आहे ? पण तिची शिकवण अमर आहे.

१८८९ सालीं दक्षिण आफ्रिकेमधल्या एका हिंदी बॅरिस्टरनें स्वयंसेवक म्हणून आपलें नांव नोंदलें. बोअरयुद्धांतील भयंकर अत्याचार पाहून त्याचें हृदय द्रवलें होतें. हा स्वयंसेवक निःशस्त्र होता. त्याचें नांव मोहनदास करमचंद गांधी. पण हा हिंदी " काळा आदमी ! " आणि " काळा आदमी " म्हटला म्हणजे त्याची वाटेल तशी मानखंडना व

तिरस्कार करण्याची प्रथा आमच्यावर राज्य करणाऱ्या या गोऱ्या लोकांनीं पाडली आहे. गांधी त्या वेळीं आपल्या देशांतील नागरिकत्वाच्या हक्कासाठीं झगडत होते आणि या गोऱ्या सशस्त्र साम्राज्याविरुद्ध लढण्यासाठीं निःशस्त्र प्रतिकारात्मक संघटना करीत होते. त्यांच्या या चळवळींत अशास्त्रीय असें काय होतें ? आम्हांला तिरस्कारानें वागवून आमची मानखंडना करणाऱ्यांविरुद्ध, लोकांच्या मनांत द्वेष प्रज्वलित करणें हे योग्यच होतें. ज्या महान् महात्म्यांनीं हिंसा व द्वेष या विषारी ढगांपेक्षांहि उंच जाऊन आपलें माणुसकीचें निशाण सतत फडकत ठेवलें आहे, त्या महान् महात्म्यांच्या रांगेंतील महात्मा गांधी ही एक व्यक्ति होती. गांधींनीं स्ट्रेचर उचलणारांचें एक पथक तयार केलें. भर युद्धाच्या धुमाळींत जखमी लोकांना ते उचलून आणायचे आणि पिछाडीच्या निवांत जागीं इस्पितळांत पोंचवायचे. अत्यंत दुष्कर आणि धोक्याचें काम होतें हें. पुष्कळ वेळां मोठाल्या संकटांतून गांधींचे प्राण वांचले. पण हा "काळा आदमी" बंदुकीच्या गोळयांच्या वर्षावांतून आत्मविश्वास व धैर्य यांच्या सहाय्यानें पुढें चालला होता. हें सारें कोणासाठीं ? तर ज्या लोकांनीं गांधींचा क्षणोक्षणीं अपमान केला होता, गाडींतून एकाच डब्यांत हिंदी इसमाबरोबर प्रवास करण्याचा प्रसंग आल्यास ज्यांना भ्रष्टाकार वाटत होता—त्या लोकांचेच प्राण सुरक्षित राखण्याकरितां !

एका युरोपियन गृहस्थानें प्रत्यक्ष पाहिलेल्या गांधींच्या व त्यांच्या पथकांतील माणसांच्या शौर्याचें केलेलें वर्णन पहा—

'गांधींच्याबद्दल मला हें पूर्ण माहित आहे, कीं त्यांना जी गोष्ट पटत नाहीं, ती ते दुसऱ्याला करायला सांगणार नाहींत. साहजिकच त्यांनीं या साहसांत मोठ्या हिरीरीनें भाग घेतला. कोलेन्सेच्या लढाईच्या आदल्या दिवशीं आघाडीवर जाण्याकरितां बोलावणें आलें आणि एक हजार हिंदी लोक लढाईच्या धुमश्चक्रीच्या ठिकाणीं उभे ठाकले. आगगाडींतून हे सर्व लोक मोठ्या उत्साहानें शिवॅलेला आले. तहान-भुकेची त्यांनीं क्षिति बाळगिली नाहीं. सारी रात्र ते कळकळीनें काम करीत होते.

आणि हा अनुभव किती भयंकर होता ! जखमी लोकांची संख्या किती तरी होती. मृत्यूच्या भयानक स्वरूपाची नोंद या कार्यकर्त्यांच्या

मनांत कायमची राहिली. जागोजाग जखमी लोक पडले होते. त्यांत किती तरी प्रेतें होतीं. सरासरी १५० लोक मृत्यु पावले आणि जवळ जवळ ७९० लोक जखमी झाले. पण अशा आणीबाणीच्या वेळीं हिंदी लोकांनीं त्यांच्या युरोपियन दोस्तांबरोबर तत्परतेनें आणि कळकळीनें काम केलें.

चकमकीच्या अगदीं ऐन भरांत नदीच्या पलीकडच्या बाजूला माणसें पटापट जखमी होत होतीं. शुश्रूषा करणारे थोडे. त्यांनीं पुढें जाऊन जखमी सैनिकांना आणणें म्हणजे मृत्यूच्या जबडयांत उडीच घेणें! पण पथकानें पूल ओलांडून त्या खाईंतही उडी घेतली.

आमच्या पुष्कळशा शिपायांचे प्राण वांचविण्याचें श्रेय या हिंदी पथकालाच आहे. स्वतःचे प्राण धोक्यांत घालून, ही जी बहुमोल मदत हिंदी पथकानें केली, त्याबद्दल आमच्या शिपायांनीं त्यांना धन्यवाद दिले!'

१९१४ च्या महायुद्धांतसुद्धां माणुसकीच्या ध्येयाला जागून, राजकीय मतभेद व जातीय वादंग बाजूस ठेवून महात्माजींनीं दोस्तांच्या जखमी सैनिकांची शुश्रूषा करण्याकरितां एक हिंदी स्वयंसेवकांचें शुश्रूषा-पथक तयार केलें होतें.

१९१२ मध्यें टर्की, बाल्कन युद्धाच्या वणव्यांत होरपळून गेला होता. सर्व बाजूंनीं संकटाची छाया पडली होती; पण स्वातंत्र्याकरितां प्राण पणास लावून हें राष्ट्र लढत होतें. हजारों जखमी लोक, डॉक्टरांची उणीव पडल्यामुळें हां हां म्हणतां मृत्यूच्या जबडयांत पडत होते. अशा आणी-बाणीच्या वेळीं इंग्लंडहून परत आलेला एक तरुण डॉक्टर—मुखतार अहमद अन्सारी (पुढें हे डॉक्टर कॉंग्रेसचे अध्यक्ष व्हायचे होते.)—टर्कीच्या मदतीला धांवला. डॉक्टर—परिचारिकांचें एक पथक तयार केलें गेलें. हें पथक औषधी-साहित्यानिशीं टर्कीला निघालें. हिंदुस्थानांतील सर्व मुस्लिम-बंधूंनीं या मानवतेच्या मंगल कार्याला मोठया आनंदानें मदत केली. तुर्की राष्ट्राकडून पथकानें केलेल्या निरलस सेवेबद्दल धन्यवाद मिळाले.

तसेंच, मुसोलिनीच्या काळ्या शर्टवाल्या टोळधाडीनें जेव्हां दांडगाईनें ॲबिसीनियावर हल्ला केला, तेव्हां ज्या कांहीं थोडया ऐतिहासिक

प्रसंगानें पूर्वी जनसमुदायांत प्रचंड खळबळ उडाली होती, तशाच प्रकारची खळबळ साऱ्या हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत त्या वेळीं उडाली. अखिल हिंदुस्थानच्या राजकीय आकांक्षा जनतेच्या वतीनें बोलणारी जी कॉंग्रेस, तिनें एकमतानें मुसोलिनीच्या या कृत्याचा निषेध केला. ॲबिसीनियाला सहानुभूति दाखविली. इतकेंच नव्हे, तर असहाय्य "इथोपियन्स"ना वैद्यकीय पथक पाठविण्यासाठीं पुष्कळ योजना आंखल्या होत्या. पण त्या पुऱ्या होण्याआधींच फासिस्टांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेस ॲबिसीनियाचा बळी पडला. त्या वेळीं कोणीही पुढें आलें नाहीं. "लीग ऑफ नेशन्स" गप्प बसली. एवढेंच नव्हे, तर फासिस्टांना अप्रत्यक्षपणें खूष करण्यासाठीं ब्रिटन–फ्रान्सनें या अमानुष कृत्याला हळूंच मान डोलवून संमति दिली.

पुढें स्पेनची लढाई आली. ही लढाई म्हणजे तीन वर्षांनीं हिटलर ज्या महायुद्धाला सुरुवात करणार होता, त्याची रंगीत तालीमच होती. कॉंग्रेसनें हिंदुस्थानचे अनभिषिक्त परराष्ट्रीय मंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं फ्रँकोच्या व त्याच्या फासिस्ट दोस्तांच्या या सशस्त्र बंडाळीविरुद्ध एकमुखानें निषेध केला. कॉंग्रेस त्या वेळीं प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकी लढवीत होती. त्या वेळीं नेहरू शेंकडों सभांतून स्पेनचा प्रश्न किती जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा होता हें समजावून देत होते. पुढें कांहीं दिवसांनीं डॉ. अतुल (नेहरूंचे वयोवृद्ध नातलग) एकटेच हिंदुस्थानच्या वतीनें स्पेनला गेले. त्या वेळीं जखमी सैनिकांना जी कांहीं मदत करणें शक्य होती, ती त्यांनीं केली. नंतर नेहरू स्वतः विमानांतून स्पेनला गेले. त्यांच्या त्या भेटीनें राष्ट्रीय हिंदुस्थानचे आणि स्पेनच्या लोकसत्ताक राज्यवाद्यांचे परस्पर संबंध जिव्हाळ्याचे झाले.

पण इकडे चीनमध्यें एक दुर्दैवी घटना उग्र स्वरूप धारण करीत होती. जपानची सैतानी भेसूर छाया चीनवर पडत होती. आणि नानकिंगची सुप्रसिद्ध घटना! खरोखरीच जिच्यामुळे दुसऱ्या जागतिक महायुद्धाला तोंड लागणार होतें, अशा सार्वत्रिक देशव्यापी आक्रमणाचीच ही पूर्वतयारी होती. युरोप आणि अमेरिका तटस्थ होतीं. जसा कांहीं त्यांचा कांहींच संबंध नव्हता. या अफाट पण मागसलेल्या देशावर

तथाकथित पुढारलेल्या बलिष्ठ जपाननें चाल केली. उघडया डोळयांनीं हा खेळ युरोप–अमेरिका पाहत होतीं. साम्राज्यपिपासु राष्ट्रें हीं. निर्बल चीनवर जपाननें केलेला अन्यायाचा हल्ला त्यांना अयोग्य कसा वाटणार? कारण, वसाहतींत यांनींही जुलुमानेंच हातपाय पसरले होते. अशा वेळीं हिंदुस्थानचें दुःखी हृदय द्रवलें. ॲबिसीनिया किंवा स्पेनच्या आक्रमणाविरुद्ध हिंदुस्थाननें निषेध केला तो तात्त्विक कारणाकरितां होता; पण चीनबद्दल सहानुभूति वाटली ती तो शेजारी म्हणून. चीन आमचा पूर्वकालीन हजारों वर्षांचा दोस्त आहे. ज्याच्याबरोबर बुद्ध आणि अशोकाच्या वेळेपासून आमचे आपुलकीचे संबंध आहेत, ज्याच्याबरोबर आम्हीं पुरातन कालापासून व्यापार करीत आहों, आणि ज्याच्याशीं आम्हीं धर्म व तत्त्वज्ञान यांची अदलाबदल केली, असा हा आमचा चीन आहे. याच चीनच्या राजकीय आणि सामाजिक क्रांत्यांमुळें आम्हांला नवी दृष्टि मिळते. आम्हांस स्वातंत्र्याच्या लढयांत लढायला प्रेरणा मिळते. अशा ह्या चीनचा जीवनमरणाचा प्रश्न उपस्थित झाला असतांना हिंदुस्थाननें तटस्थ वृत्तीनें त्याच्याकडे पाहत बसून चालणार नाहीं. पण गुलामगिरीनें बांधलें गेलेलें राष्ट्र काय करूं शकणार? हिंदुस्थान स्वतंत्र असता, तर सोव्हियट रशियानें स्पेनच्या लोकसत्ताक राज्यवाद्यांना जशी भरीव मदत केली, तशी मदत केली असती. चेंबरलेनच्या मतलबी धोरणाविरुद्ध लोकांनीं त्या वेळीं स्पष्टपणें तीव्र नापसंती दर्शविली. जवाहरलालजींनीं एक योजना आंखली. या योजनेमुळें चीनचें दुःख हिंदुस्थानला थोडें कां होईना, कमी करतां येणार होतें. हजारों वर्षांपासून हिंदुस्थाननें प्रत्येकाला सहानुभूतीनें, प्रेमानें वागविलें आहे. या वेळेसही हिंदुस्थान आपल्या त्या पूर्वकालीन माणुसकीच्या रिवाजाला जागला. कॉंग्रेसनें चीनला वैद्यकीय पथक पाठविण्याचें ठरविलें. डॉ. अतुल पथकांतील प्रमुख होते. जनतेला विनंति करण्यांत आली. कमिटी नेमली गेली. पैसा व औषधीसाहित्य जमा होऊं लागलें. दानशूर लोकांकडून देणग्या येऊं लागल्या. वैद्यकीय उपकरणें तयार करणाऱ्या कंपन्यांनीं उपकरणांची मदत केली. मुलें-मुली रस्त्यांतून पेटया घेऊन मदतीसाठीं फिरूं लागलीं. इतकेंच काय, पण मदतीकरितां सिनेमांचे कार्यक्रमही झाले.

शेवटीं डॉ. जीवराज मेहता आणि बी. सी. रॉय या दोघां निष्णात डॉक्टरांनीं, पथकाबरोबर जाण्यासाठीं ज्या डॉक्टरांनीं आपलीं नांवें दिलीं होतीं, अशा बारा डॉक्टरांची परीक्षा घेतली, आणि प्रत्येकाच्या अनुभवाचा, प्रकृतीचा व हुशारीचा विचार करण्यांत येऊन चार डॉक्टर निवडले गेले.

या चार डॉक्टरांपैकीं डॉ. चोळकर हे साठ वर्षांचे होते. राष्ट्रीय चळवळीला मदत करणारे, गांधीजींचे कट्टर अनुयायी आणि डॉक्टरीच्या धंद्यांतील अनुभवी थोर व्यक्ति म्हणून नागपूरमध्यें त्यांचा लौकिक होता. वयाच्या साठाव्या वर्षी असल्या संकटाच्या खाईंत उडी घ्यावयास ते तयार झाले. माणुसकी आणि स्वातंत्र्य यांबद्दल कोण ही कळकळ ...! राहिलेले तिघे तिशीच्या आंतले होते. मुकर्जी कलकत्त्याचे आणि कोटणीस सोलापूरचे. दोघेही साहसी व खिलाडू वृत्तीचे तरुण. दोघांचीही लग्नें झालेलीं नव्हतीं. चौथे डॉ. बसूंची निवड होण्यापूर्वी कलकत्त्याचे एक डॉक्टर 'रणेन्–सेन' यांची निवड झाली होती. पण पोलिसांना ही व्यक्ति कम्युनिस्ट असल्याचा संशय आला. तसे पुरावेही मिळाले. त्यांचा पासपोर्ट रद्द करण्यांत आला. आणि अशा तऱ्हेनें डॉ. बसूंची त्या जागेवर शेवटीं निवड झाली.

ऑगस्ट महिन्याच्या शेवटीं हे पांच डॉक्टर मुंबईला एकत्र येऊन मिळाले. डॉ. अतुल प्रमुख. सारी जबाबदारी त्यांच्यावर होती. आपल्या कामांत ते गढून गेले होते. साठ वर्षांचे अनुभवी असे डॉ. चोळकर उत्साहानें हंसत होते, आणि तिघे तरुण—! साहसाची मधुर चव घेण्याची कल्पना तरुणांना किती प्रिय वाटते, हें काय सांगायला पाहिजे?

आणि मुंबई प्रांतिक कॉंग्रेसच्या वतीनें भरलेल्या सभेंत मुंबईच्या जनतेनें मोठ्या आनंदानें या पांच डॉक्टरांना निरोप दिला. सरोजिनी नायडू आपल्या भाषणांत म्हणाल्या—" तुम्ही जें काम अंगावर घेत आहांत, तें अत्यंत धोक्याचें आहे. कदाचित् तुमच्या चिनी दोस्तांबरोबर चीनच्या स्वातंत्र्या-करितां तुम्हांला आपले प्राणसुद्धां द्यावे लागतील..." चार वर्षांनंतर जेव्हां डॉ. कोटणीसांच्या मृत्यूची बातमी आली, तेव्हां या शब्दांची आठवण झाली. सप्टेंबर एक रोजीं जेव्हां पथक बॅलार्ड पीअरवरून पी. ॲंड

ओ. कंपनीच्या 'एस्. एस्. राजपुताना' बोटीनें निघालें, तेव्हां पथकांतील कोणत्याही व्यक्तीच्या मनांत अमंगळ विचाराची अंधुक छायाही नव्हती.

मुंबईंत स्थानिक चिनी मंडळींनीं पथकाला आनंदानें निरोप दिला. चिनी मुलांनीं चीनचें स्तुतिपर गीत म्हटलें. कॅांग्रेसच्या वतीनें सरोजिनीबाई हजर होत्या. त्यांनीं 'प्रवास सुखाचा होवो' म्हणून पथकाला शुभाशीर्वाद दिला. श्री. हाथीसिंग, सौ. हाथीसिंग व बॉम्बे क्रॉनिकलचे संपादक एस. ए. ब्रेलवी हेही हजर होते.

डॉ. कोटणीसांना निरोप द्यायला जास्त मित्रमंडळी आली होती. बहुतेक कॉलेजांतील मित्र होते. शेवटीं आपल्या वृद्ध आईवडिलांच्या पायांवर माथें ठेवून कोटणीसांनीं निरोप घेतला आणि 'गँगवे' चढून ते बोटीवर आले.

मध्यरात्रीं 'एस्. एस्. राजपुताना' बोटीनें मुंबई सोडली. पांच निःशस्त्र सैनिक निघाले. त्यांच्याबरोबर त्यांनीं—

एक ॲम्ब्युलन्स ट्रक, एक ॲम्ब्युलन्स मोटार, औषधांच्या व शस्त्रक्रियेच्या उपकरणांच्या साठ पेटया, एक क्ष–किरण यंत्र,......

आणि अखिल हिंदुस्थानचा आशीर्वाद व शुभेच्छा घेतली होती. इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानच्या आशेचा, विश्वासाचा आणि गाढ स्नेहसंबंधाचा संदेशही--त्यांच्याबरोबर होता.

# ३

I go to China. But my heart will be in India. India and China will mingle together in my mind, and I shall bring back. I hope, something of the courage and invincible optimism of the Chinese people and their capacity to pull together when peril confronts them."

--JAWAHARLAL NEHRU
( on the eve of his departure to China in 1939)

प्रथम पथक " काँत व्हर्दे " या इटालियन बोटीनें जाणार होतें. पण फासिस्टांची हीन मनोवृत्ति त्या वेळींही दिसून आली. चीनला मदत घेऊन जाण्याचें या बोटीनें नाकारलें. शेवटीं पूर्वीच्या योजना बदलून पी. अँड ओ. कंपनीच्या ' " राजपुताना " बोटीवर जागा ठरविण्यांत आल्या. पुढें चार वर्षानंतर ही बोट जर्मन पाणबुडीनें बुडविली.

डॉ. कोटणीस, बसू व मुकर्जी यांचा हा पहिलाच जलप्रवास होता. ते तिघेहि आश्चर्यानें बोटीच्या कठड्याजवळ उभे राहून पाण्यांत इकडे तिकडे गमतीनें फिरणाऱ्या रंगीबेरंगी माशांकडे पाहत होते. अस्तास जाणाऱ्या सूर्याच्या प्रकाशांत ढगांना फार छान रंग चढले होते. तिघेही डॉक्टर ही निसर्गाची जादू मोठ्या उत्साहानें पाहत होते. बोट अरबी समुद्रांतून आपला मार्ग हळूहळू आक्रमीत होती.

कोलंबोपासून स्वागताची फैर झडायला सुरुवात झाली, ती थेट कँटन-पर्यंत. प्रत्येक बंदरावर पथकाला उतरावेंच लागे. कॅन्टनला वृत्तपत्रांचे

बातमीदार, स्थानिक हिंदी व चिनी संस्थांचे प्रतिनिधि, कोलंबोची व्यापारी संस्था आणि रेडक्रॉस वगैरे संस्था पथकाच्या स्वागताला तयार होत्या. शेवटीं ग्रॅन्ड हॉटेलमध्यें खाना झाल्यावर पथकाला रेडिओस्टेशनवर नेण्यांत आलें. तेथें डॉ. अतुलनीं पथक चीनमध्यें कोणत्या उद्देशानें जात आहे याबद्दल माहिती सांगितली. तो दिवस स्वागताच्या सभांतच संपला. डॉ. अतुल यांच्या जोरदार वक्तृत्वाची चमक त्या दिवशीं प्रथमच दिसून आली.

चार दिवसांनंतर बोट पेनांगला आली. येथेंही हिंदी आणि चिनी लोकांकडून पथकाला स्वागत स्वीकारावें लागलें. चिनी विद्यार्थिनींनीं चीनचें प्रसिद्ध स्वातंत्र्यगीत ( Chilai ) " उठा–जागे व्हा " गाइलें. नंतर मोठी मिरवणूक निघाली आणि हे पांच डॉक्टर ' चायनीज असोसिएशन हॉल '-मध्यें आले. भाषणें, आभारप्रदर्शन वगैरे नेहमींचा कार्यक्रम संपल्यावर पथकाला चीनचे व हिंदुस्थानचे राष्ट्रीय ध्वज अर्पण करण्यांत आले. मिरवणुकींतील अग्रभागीं चालतांना आमचे पांच डॉक्टर फार गांगरून गेले होते. असल्या जंगी सन्मानाची मुंबईहून निघतांना त्यांच्या मनांत अंधुकसुद्धां कल्पना नव्हती.

सिंगापूरलादेखील सन्मानाचा असला अपूर्व सोहळा झाला. बोट सिंगापूर बंदरांत आली, त्याबरोबर ' वंदेमातरम् ' आणि ' उठा-जागे व्हा ' Chilai या दोन राष्ट्रगीतांचे स्वर ऐकूं येऊं लागले. तिरंगी झेंडा चीनच्या शूर वैभवशाली झेंड्याबरोबर डौलानें फडकत होता. ते मंगल दृश्य पाहून त्या पांच हिंदी हृदयांचा आनंद गगनांत मावेना. चीन आणि हिंदुस्थान यांच्या ऐक्याचें तें खरेंखुरें प्रतीक होतें !

बोटीवरून उतरल्याबरोबर चिनी मुलांनीं हार घालून पथकाचें स्वागत केलें. नंतर मोटरमधून त्यांना " चायनीज् चेंबर ऑफ कॉमर्स "कडे नेण्यांत आलें. तेथें चिनी लोकांकडून त्यांचें स्वागत झालें. नंतर स्थानिक हिंदी मंडळानें " व्हिक्टोरिया मेमोरिअल हॉल " मध्यें त्यांचें स्वागत केलें. क्षणभर विश्रांति घ्यावयाची म्हटली तरी तें शक्य नव्हतें. सिंगापुरांतील स्वागताचा सोहळा पथकाच्या स्मरणांतून कधींही हालणें शक्य नाहीं. कारण त्यांच्या गळ्यांत फुलांचे इतके हार घालण्यांत आले होते आणि फुलांचा

अभिषेक इतका प्रचंड झाला होता, कीं सर्वांचे कपडे ओलेचिंब झाले होते. कपडयांवर फुलांचे डाग पडले होते. संध्याकाळीं त्यांना दुसऱ्या सभांना हजर राहायचें होतें.

मध्यरात्रींच्या सुमारास बोटीनें सिंगापूर सोडलें. लोकांनीं केलेल्या अपूर्व स्वागताची आठवण होऊन पांचही डॉक्टरांचे चेहेरे गंभीर झाले. अंतःकरणें भरून आलीं. तशा त्या भरलेल्या हृदयांनींच त्यांनीं सिंगापूरचा निरोप घेतला.

ता. १४ सप्टेंबर रोजीं पथक 'हॅांग-कॅांग'ला आलें. या चौदा दिवसांत युद्धकालीन चीनची स्थिति कशी आहे याची अंधुक कल्पना पुस्तकें वाचून व बोटीवर त्यांनीं जे दोन चिनी मित्र केले होते त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनें त्यांना झालीच होती. (हे मित्र म्हणजे एक डॉ. चो-तींग-ची, पी. एच्. डी. (कोलंबो), अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व अमेरॅशियाचे संपादक आणि दुसरे मि. वॅांग-इंग्लंडहून नुकतीच इंजीनिअरिंगची परीक्षा देऊन आलेले.) दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनीं एकमेकांचे गुणदोष समजावून घेतले होते. कारण प्रत्येकाचीं स्वभाववैशिष्ट्यें आणि मतें निरनिराळीं होतीं.

डॉ. अतुलनीं पुष्कळ प्रवास केला होता. "डाव्यांच्याबद्दल" त्यांना अत्यंत सहानुभूति होती. डॉ. चोळकर हे नागपूरचे प्रसिद्ध आणि अनुभवी डॉक्टर. याची गांधींच्या तत्त्वज्ञानावर अढळ निष्ठा. मुकर्जी हे बंगालमधले. कॅांग्रेसमधील 'उजव्यां' बद्दल अभिमान बाळगणारी ही साहसी व्यक्ति होती. डॉ. कोटणीस-हुशार, चिनी भाषा थोडथोडी बोलतां येणारे आणि डॉ. बसू डाक्याहून आले होते. ते फक्त राजकारणांत गुंग असत.

डॉ. अतुल पथकाचे मुख्याधिकारी होते. आपल्या राजकीय आणि डॉक्टरी आयुष्यांतील अनुभव या चार डॉक्टरना ते केव्हां केव्हां सांगत. त्यांचें व्यक्तिमत्व प्रभावी होतें. कारण त्यांचें संभाषण मधुर असे आणि अनुभव अमोल होते. पथकाला त्यांचा फार उपयोग झाला. ते स्पेनला गेले होते. तेव्हांचे साहसी अनुभव त्यांनीं पथकाला सांगितले. त्यावरून चीनमध्यें

आपल्याला कोणत्या प्रकारचें कार्य करायचें आहे, याची स्पष्ट कल्पना पथकाला आली.

हँग-कँगला चिनी सरकारी अधिकाऱ्यांनीं व तेथील हिंदी लोकांनीं पथकाचें स्वागत केलें. त्यांत प्रमुख संपादक, प्रकाशक आणि राजकीय कार्यकर्ते–शिवाय अमृतलाल शेठ हे होते. मेजवान्यांना व चहापार्ट्यांना सुरुवात झाली. अमृतलाल शेठ व इतर हिंदी लोकांबरोबर फलाहार झाला. नंतर "चायनीज चेंबर ऑफ कॉमर्स" नें चहापार्टी दिली. त्या वेळीं चीनचे आर्थिक मंत्री, टी. व्ही. यूंग, डॉ. वू ( चीनच्या रेडक्रॉसचे प्रमुख ) आणि नुकतेच आघाडीवरून परत आलेले दोन न्यूझीलंडचे डॉक्टर होते.

या मेजवान्या आणि चहापार्ट्या घेत असतांना पथक गोंधळून जात असे. साहजिकच होतें. जो तो प्रेमानें त्यांचें स्वागत करी. उलट ते गोंधळत. कां—? तर ते चीनची भीषण परिस्थिति पाहून थोडीफार मदत करायला आले होते, जखमी देशभक्तांची शुश्रूषा करायला ते आले होते. पण हा गोंधळ त्यांच्या मनांत टिकत नसे. त्यांनीं जें बिकट काम अंगीकारलें होतें, त्याबद्दलच्या आभारप्रदर्शनार्थच या मेजवान्या व चहापार्ट्या होत होत्या. तें व्यक्तीचें स्वतंत्र स्वागत का होतें ? नव्हे !—तर ज्या संस्थेतर्फे ते आले होते, त्या हिंदी राष्ट्रीय कँग्रेसचें तें स्वागत होतें ! गांधी–नेहरू आणि टागोर यांचे ते प्रतिनिधी होते. पथकाचें स्वागत होतांना, चहा पितांना, टोस्ट घेतांना, भाषणें करतांना जी भावना व्यक्त केली जात होती ती हीच कीं, हिंदुस्थान व चीन यांच्या बंधुत्वाचे, ऐक्याचे संबंध दृढ होत आहेत. डॉ. अतुलांनीं आपल्या प्रत्येक भाषणांत हे विचार स्पष्टपणें बोलून दाखविले. दोन्ही महान् देश एकमेकांचे दोस्त झाले होते. कारण पूर्वकालापासून स्वातंत्र्याकरितां हे दोघेही झगडत आहेत. एक सध्यां जपानी क्रूर सत्तेबरोबर झगडत आहे, आणि दुसरा ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध झुंज देत आहे.

ऐतिहासिक आणि भौगोलिक दृष्ट्या हँग-कँग चीनचाच एक भाग होतो; तरी पण १९३८ पर्यंत तो ब्रिटिश अमलाखालींच होता. अति पूर्वेकडील या साम्राज्यवाद्यांची सत्ता चिनी रिपब्लिकन्सनीं उडवून देण्याचा प्रयत्न केला होता. तरी अजून ती पूर्णपणें कोसळून पडली नव्हती. नाना

लोकांचें वास्तव्य असलेलें आणि हरत-हेच्या व्यापारी लोकांनीं गजबजलेलें हें हाँग-काँग वरून जरी शांत दिसत होतें, तरी सारें वातावरण संशयानें भरलें होतें. युद्धाचे वारे अस्पष्टपणें वाहूं लागले होते. त्या वाऱ्यांचा स्पर्श आमच्या डॉक्टरनांही जाणवला. युद्धदेवता लवकर प्रगट होणार अशीं लक्षणें दिसूं लागलीं.

हाँग-काँग-कॅन्टन रेल्वेमार्गावर किती तरी वेळां बॉम्बहल्ला झाला होता. खेड्यापाड्यांतून आलेले हजारों गरीब निर्वासित शहरांत वास्तव्य करीत होते. सबंध शहर गर्दीनें चिकार भरून गेलें होतें. शत्रूविरुद्ध सगळीकडे अंतस्थ आग भडकत होती. वातावरण द्वेषानें भरलें होतें. पंचमदली जपानी, डॉक्टरकीच्या धंद्याचे मुखवटे चढवून शहरांत 'युनिअन जॅक'च्या संरक्षणाखालीं वावरत होते. पहाटे हॉटेलच्या खिडकींतून आमचे डॉक्टर बाहेर पाहूं लागले. चिनी लोक आणि मुलेंसुद्धां सैनिकाचें शिक्षण घेत होतीं. त्यांच्या खांद्यावर बंदुका होत्या. पथकांतील एका डॉक्टरांनीं एका म्हाताऱ्या चिनी गृहस्थास विचारलें, "कां हो, हीं मुलें खांद्यावर बंदुका टाकून कवाईत कां करताहेत ?" हंसून तो म्हणाला, "आम्हीं दीर्घकालीन लढाईची तयारी करीत आहों." त्याच्या त्या हास्यपूर्ण उद्गारांत दृढनिश्चय व विषण्णता पुरेपूर भरली होती.

ता. १७ सप्टेंबर रोजीं पथकानें 'एस्. एस् फतशन' नांवाच्या बोटीनें कॅन्टन सोडलें. पर्ल नदींतून बोट हळूहळू चालली होती. आमचे पांच डॉक्टर डेकवर उभे राहून नदीच्या आसपासच्या मुलुखाकडे पहिल्या प्रथमच पाहत होते.

आतां ते चीन रिपब्लिकच्या मुलखांत आले होते. वांकड्यातिकड्या डोंगरमाथ्यांच्या रांगेंत नदीचें सुपीक खोरें अस्पष्टतेनें दृष्टिपथांत येत होतें. हाच तो चीन—हीच ती 'धरतीमाता!'—त्या धरतीमातेवर हजारों वर्षांपासून साध्याभोळ्या शांतताप्रिय चिनी लोकांनीं आपल्या रक्ताचें आणि घामाचें पाणी घातलें. याच धरतीमातेतून त्यांनीं पिकें काढलीं आणि आपलीं मुलें वाढविलीं आणि याच धरतीमातेतून त्याचें मृदु-प्रेमळ जीवनाचें तत्त्वज्ञान व त्यांची चिरकालीन संस्कृति विकसित झाली आहे!

पण या महान् देशावर आज एक भीषण छाया पडली आहे. त्या छायेनें आपल्या पंखांत दोन गोष्टी आणल्या आहेत. एक मृत्यु— ! आणि दुसरी नाश—संपूर्ण नाश !

हे विचार मनांत येत असतांनाच डॉक्टरांची नजर अकस्मात् आकाशाकडे गेली. तीन जपानी बॉम्बफेकी विमानें गिधाडासारखीं झेंप घेत खालीं येत होतीं: त्यांची ' लाल निशाणी' स्पष्टपणें दिसत होती. क्षणभर त्यांनीं बोटीभोंवतीं घिरट्या घातल्या आणि तीं दूर अंतरावर निघून गेलीं.

## ४

Men of China, proud and free,
Let the stars your garment be,
As you plough uneven soil,
Reap the harvest of your toil,
Fight for your land
Freedom's at hand.
Mankind must reach
The World's Great Peace,
Heaven blue, Sun of white,
Field of red, standard bright,

—CHINESE NATIONAL FLAG SONG,

कॅंटन हें दक्षिण चीनमधील प्रमुख शहर. व्यापारधंद्याच्या कोण उलाढाली चालत तेथें! पण युद्धानें या शहराची दैना उडून गेली होती. शहरांतील बहुतेक इमारती कोसळून पडल्या होत्या. शाळा, इस्पितळें यांचे मोडकेतोडके भीषण अवशेष मधूनमधून दिसत होते. पूर्व आशियाची सुधारणा करायला येणाऱ्या जपानच्या कृत्यांची ही पुरेपुर साक्ष होती! गरज ही कल्पकतेची जननी आहे म्हणतात. येथेंही तेंच दिसत होतें. विध्वंसक तंत्राच्या उत्क्रांतीबरोबर, माणसांच्या स्वसंरक्षणाच्या युक्त्याही पुढें पुढें धांवत असतात. शहरांत हवाई हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठीं "निवाऱ्याच्या जागा" (Shelters) अपुऱ्या होत्या. पण लोकांनीं

घरांवर ' बांबूचीं छपरें ' बांधलीं होतीं. स्वसंरक्षणाची ही प्राथमिक तयारी पाहून अंतःकरण बधिर होई; पण जीं कांहीं थोडीबहुत घरें चांगल्या स्थितींत अजूनही उभीं होतीं, त्या सर्वांवर " बांबूची छपरें "च होतीं. दक्षिण पूर्व चीनमधील युद्धाची लाट भर वेगानें स्वातंत्र्यप्रिय गटाविरुद्ध येत होती. जेथें तेथें अफवा उठल्या होत्या—'कँटन लवकरच खालीं करावें लागणार !'

ता. १८ सप्टेंबरला आपलें पथक कँटनमध्यें आलें. ऐतिहासिक महत्त्वाचा दिवस होता तो. ता. १८ सप्टेंबर १९३१ मध्यें जपाननें चीनवर स्वारी केली. चीनवर कसली—? दुसऱ्या महायुद्धाची ती पूर्वसूचनाच होती. " मुकडेनची ती भयंकर घटना ! " आणि या भयंकर मानहानीचें शल्य लोकांच्या मनांत सलत राहावें म्हणून हा दिवस मोठ्या कळकळीनें साजरा केला जातो. 'ची–आ–पा ' ( नऊ–एक आठ अथवा नऊ महिने–अठरावा दिवस ) चीन देशांतील लोकांत हा दिवस, शत्रूबद्दलचा द्वेष जाज्वल्यानें प्रज्वलित करण्याकरितां मुद्दाम साजरा केला जातो. ज्या शत्रूनें सबंध देशाची–देशांतील लोकांची–मानहानि केली, त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत सतत द्वेषाग्नि भडकलाच पाहिजे.

आणि त्या दिवशींच सकाळीं भोंग्याचा आवाज ऐकून आपले पांचही डॉक्टर बिछान्यांतून घाबरून उठले. हवाई हल्ल्याचा प्रसंग पाहण्याची त्यांची ती पहिलीच वेळ होती. बाहेर रस्त्यांतून लोक शांतपणें चालले होते. गडबड नाहीं—गोंधळ नाहीं. सकाळीं कामाला जातांना माणूस धिम्या पावलांनीं चालतो ना—तसे सारे लोक चालले होते, आणि यांत कांहीं आश्चर्य नव्हतें. किती तरी वेळां कँटनवर हवाई हल्ले झाले होते. लोकांना आतां ती संवय झाली होती. थोड्याच वेळांत ' सब ठीक'चा इषारा देण्यांत आला. शत्रूचीं विमानें दूरवर गेलीं होतीं.

थोड्या वेळानें डॉक्टर खाकी गणवेष आणि डोक्यावर गांधीटोप्या चढवून ॲम्ब्यूलन्समधून निघाले. या मोटरगाड्यावर, वर आणि बाजूला ' रेडक्रॉस ' असें ठळक अक्षरांत लिहिलेलें असूनसुद्धां जपानी विमानांनीं त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला होता. नंतर ते ७२ वीरांच्या स्मारकाजवळ आले. मंचू राजाच्या वेळीं या क्रांतिकारकांनीं कांगटूंगच्या गव्हर्नरला

मारण्याचा कट केला होता. हे ७२ दगड रांगेनें मांडलेले आहेत. कॉंग्रेसच्या वतीनें डॉक्टरांनीं त्या स्मारकांवर फुलें वाहिलीं. पुढें एकोणीसाव्या फलटणीचीं थडगीं होतीं. १९३२ सालीं शांघायमध्यें जपान्यांबरोबर झुंज देतांना या शूरांनीं आपले देह ठेवले होते. या थडग्यांवरही पथकानें फुलें वाहिलीं. शेवटीं ते सन–येत–सेनच्या भव्य तसबिरीजवळ आले. चीनच्या लोक-सत्ता-वादाचा हा प्रणेता! तो दिवाणखाना मोठ्या कलात्मक पद्धतीनें सजविला होता. जपानी बॉंबहल्ल्याच्या वेळीं तसबिरीला किंचितसा धक्का बसला होता. पण आपले पांच डॉक्टर जेव्हां त्या धीरगंभीर, शांत वातावरणांत आदरानें तसबिरीकडे पाहत होते, तेव्हां त्यांच्या मनांत विचार येत कीं, "चिनी देशभक्तांच्या हृदयांत आदरानें बसलेली ही सन-येत-सेनची मंगल मूर्ति जपान्यांना कधींही नाहींशी करतां येणार नाहीं—!"

संध्याकाळीं मोठी मिरवणूक निघाली. प्रत्येक नाक्यानाक्यावर सभा भरत होत्या. मोठीं आवेशपूर्ण भाषणें होत होतीं. सभेंतून बोलणारे वक्ते बहुतेक तरुण मुलें व मुलीं होत्या. 'सात वर्षांपूर्वीं देशाची जी मानहानि झाली–जो अन्याय झाला, त्याचा बदला घेतलाच पाहिजे. हा बदला घेईपर्यंत चीनमधील एकही मनुष्य पळभर विश्रांति घेणार नाहीं—" आणि या आवेशपूर्ण भाषणांनीं सात वर्षांपूर्वींचा तो भीषण प्रसंग प्रत्येक चिनी माणसाच्या दृष्टीसमोर उभा राही. त्याचें रक्त गरम होई. शत्रूबद्दलचा त्याचा द्वेष वाढे आणि—"आम्हीं त्याला ठेंचून ठेंचून काढूं." याच निश्चयानें ते जोरजोरानें टाळ्या पिटत. मिरवणुकींत मिनिटामिनिटाला अधिकाधिक लोक येऊन मिळत. जवळजवळ दोन लाखांची ती मिरवणूक होती. मिरवणुकीच्या मध्यभागीं मोटरीवर मोठमोठे चित्र-फलक लावले होते. त्यावर व्यंगचित्रें होतीं आणि प्रचलित जोरदार घोषणा ठळक अक्षरांत चित्रित केल्या होत्या. त्या प्रत्येक घोषणेनें जपानला नामोहरम करण्याची प्रेरणा लोकांना मिळत होती. संध्याकाळ संपून अंधार पडूं लागला. दिवे लावले गेले आणि गणवेषांतील मुलांमुलींनीं (Chilai) हें राष्ट्रगीत म्हणण्यास सुरुवात केली. राष्ट्राचा अभ्युदय करणारी ही तरुण पिढी होती. मग दुसरीं स्वातंत्र्याचीं गाणीं सुरू झालीं. लाखों

गळ्यांतून सूर निघाले--उंचावले आणि गगनाला जाऊन भिडले. ते सूर म्हणजे क्रूर जपान्यांना उघड आव्हान होतें—राष्ट्राची चेतना होती. सारें वातावरण ‘ ची–ले–अे ’ ( उठा–जागे व्हा ) या स्वातंत्र्यगीतानें भरून गेलें. गीत असें होतें—“ धरतीमातेच्या सुपुत्रांनो ! उठा–जागे व्हा. किसानांनो—कामगारांनो उठा–जागे व्हा. विद्यार्थ्यांनो, कवींनो, कलावंतांनो, किसानकामगारांनो, बायकामुलांनो, तुमचा देश भयंकर संकटांत पडला आहे. अन्यायानें शत्रूंनीं तुमची जमीन बळकावली आहे. तुमच्या इमारती उध्वस्त केल्या आहेत. तुमचीं पिकें जाळलीं आहेत. तुमच्या आयाबहिणींची, मुलींची अब्रू लुटली आहे—उठा–जागे व्हा–पुढें चला ! त्वेषानें, सूडाच्या भावनेनें बेफामपणें पुढें चला. शत्रूला टेंचून ठेंचून काढावयाचें आहे. देशाचें स्वातंत्र्य धोक्यांत आहे—उठा–जागे व्हा आणि सूड घ्या—शत्रूचा पुरा निःपात करा— ! ”

हा हृदयाला जाऊन भिडणारा विलक्षण प्रसंग होता. मिरवणूक संपली. लोक घरीं परतले. रस्ते निर्जन आणि शांत झाले; पण स्वातंत्र्य-गीतांचे व घोषणांचे प्रतिध्वनि अजूनही कानांत घुमत होते. चीनमधील हा पहिलाच दिवस. आमच्या डॉक्टरांच्या हृदयांवर कायमचा कोरला गेला. सबंध चीन सात वर्षांपूर्वींच्या अन्यायांची आठवण ठेवून दिवस साजरा करतो—शत्रूला नामोहरम करण्याची प्रतिज्ञा करतो—तो हा महान् दिवस “ ची–आ–पा ” !

# ५

"If Madame Chiang is the glittering diamond in the Soong dynastic crown, then Madame Sun is other things: a hidden Flower; a beautifully luminous bit of porcelain; a source of spiritual continuity and power; a shadow with Flame behind it".

—JOHN GUNTHER in " Inside Asia."

साधा काळा झगा घातलेली असामान्य सुंदर आणि सुकुमार रेखीव बांध्याची एक स्त्री जेव्हां कँटन बंदरांत आपल्या डॉक्टरांचें स्वागत करायला आली, तेव्हां डॉक्टरनां आश्चर्याचा धक्का बसला. त्या झग्यांतील ती बाई म्हणजे—डॉ. सन–येत–सेन यांच्या पत्नी होत्या. त्या स्वागत करायला बंदरावर आल्या हा पथकाचा बहुमान होता. त्यांचें नांव ' सूंग–चींग–लिंग ' मोठ्या सफाईदार पण किंचित् अमेरिकन पद्धतीनें त्या इंग्रजी बोलत. डॉक्टरांच्या मागून त्यांचें कार्य सतत पुढें चालू ठेवण्याचें सारें श्रेय त्यांनाच आहे आणि म्हणूनच चीनमध्यें त्यांच्याबद्दल प्रत्येक व्यक्तीला आदर वाटतो. इतकेंच नव्हे, तर देशाच्या थोर राजकीय व सामाजिक पुढाऱ्यांत त्यांची गणना केली जाते. सूंग कुटुंबाच्या या तिघी बहिणी फार प्रसिद्ध आहेत. यांची थोरली बहिण चीनच्या पतप्रधानाची पत्नी आणि धाकटी चँग–कै–शैक यांची पत्नी. यांचा स्वतःचा ओढा ' डाव्याच्याकडे ' व कम्युनिस्ट गटाकडे आहे. राजकीय व आर्थिक बाबतींत सूंगबाईंनीं नेहमीं जहाल गटालाच उचलून धरलें आहे. त्यांच्या दोघी बहिणी व " जनरॅलिसिमो " चँग–कै–शैक यांची गोष्ट मात्र निराळी.

सूंगबाई बोटीवर चढल्या तेव्हां त्यांच्याबरोबर, कँटन ट्रेड युनियनच्या सेक्रेटरी डॉ. मादाम लिओ–चँग–कै, इतर अधिकारी व बरीच मंडळी होती. एवढ्या मंडळींत सूंगबाई उभ्या होत्या. जेव्हां डॉक्टरांची त्यांच्याबरोबर ओळख करून देण्यांत आली, तेव्हां डॉक्टरना आश्चर्याचा दुसरा धक्का बसला. उत्साहानें त्यांच्याशीं हस्तांदोलन करणारी ही असामान्य सौंदर्यवान बाई पन्नास वर्षांची आहे हें त्यांना खरेंच वाटेना. मात्र सूंगबाईंचा चेहरा सुंदर व बांधा सुकुमार होता, तरी त्यांच्या मुखावर जीवनाचें तेज आणि ध्येयासाठीं झगडण्याचा दुर्दम्य उत्साह स्पष्टपणें दिसून येत होता.

कँटनमधील एका आठवड्याच्या मुक्कामांत पथकाला फार सौजन्यानें आणि प्रेमानें वागविण्यांत आलें. जेथून तेथून स्वागताचा वर्षाव होत होता. चहापार्ट्या, अभिनंदनें यांची रेलचेल उडाली होती आणि या प्रत्येक प्रसंगाच्या वेळीं चिनी गव्हर्नर जनरल, डॉक्टर आणि मोठमोठे पंडित, तसेंच राजकीय गोटांत वावरणाऱ्या प्रमुख व्यक्ति, कोमिटांगचे अधिकारी वगैरे हजर असत. चहा पितांना, टोस्ट घेतांना हिंदी काँग्रेसला अभिवादन करण्यांत येत असे.

पण पथकाच्या स्मृतींत कायम राहील असें स्वागत म्हणजे चीनच्या नगराध्यक्षांनीं दिलेली पार्टी. या पार्टीच्या वेळीं प्रसिद्ध ब्रिटिश युद्धबातमीदार शॅरलोट हॅल्डेन आणि मादम सन–येत–सेन उपस्थित होत्या. मादाम सन–येत–सेन अध्यक्ष होत्या. हिंदुस्थानच्या ब्रिटिश–विरोधी चळवळीची बारीकसारीक माहिती सूंगबाईंना होती. या चळवळीला त्यांचा पूर्ण पाठिंबाही होता. डॉ. अतुलांना त्यांनीं जवाहरलालजींविषयीं विचारलें. जवाहरलाल नेहरूंची व त्यांची भेट मास्कोमध्यें झाली होती. तेव्हापासून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां झगडणारी एक महान् व्यक्ति म्हणून त्यांच्याविषयीं मादाम सन–येत–सेनना फार आदर वाटत होता.

जेवणाच्या वेळीं आपल्या डॉक्टरांची स्थिति फार विचित्र झाली. चीनमध्यें 'चीप–स्टिक'नें (दोन लहान बांबूच्या काड्या) जेवण घेतात. अर्थात् डॉक्टरनांही चॉप–स्टिकनें जेवण्याची पाळी आली. पण हें बिकट

काम त्यांना कांहीं साधेना. त्यांची परिस्थिति मोठी विचित्र आणि हास्यास्पद होऊं लागली. शेवटीं मादम सन-येत सेननीं पाहुण्यांची सुटका केली, म्हणून बरें झालें. नाहीं तर त्या दिवशीं आपल्या पांचही डॉक्टरांना जेवण पुढ्यांत असतांना उपाशीं पोटीं उठावें लागलें असतें. मादाम सन-येत-सेननीं 'चॉप-स्टिक' खालीं ठेवल्या आणि त्या म्हणाल्या--"देवांनीं आपल्याला हात दिले आहेत. त्यांचाच आपण उपयोग करूं या--" जेवायला आलेल्या सगळ्या लोकांनीं त्यांचें अनुकरण केलें.

कॅंटनमधील या आठवड्यांत डॉक्टरांनीं धंद्याच्या दृष्टीनें शहरांतील दोन मोठालीं मिलिटरी हॉस्पिटलें पाहिलीं. या हॉस्पिटलमधील व्यवस्था चोख होती. जिकडे तिकडे स्वच्छता व टापटीप दिसून येत होती. नंतर त्यांनीं डॉ. सन-येत-सेन यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या हॉस्पिटलला भेट दिली. हवाई हल्ल्यांनीं जखमी झालेल्या लोकांनीं सबंध हॉस्पिटल भरून गेलें होतें. चिनी डॉक्टर रात्रंदिवस जखमी लोकांची शुश्रूषा करण्यांत गुंग झाले होते. हजारों चिनी पुरुष--बायका--मुलें--जखमी झालीं होतीं. हॉस्पिटलचे वॉर्ड तर जखमी लोकांनीं भरून गेलेच होते; पण व्हरांड्यांत-फार काय हॉस्पिटलच्या अंगणांत देखील खाटेवर जखमी लोक पडले होते. हें दृश्य किती करुणाजनक होतें! चीनला आज डॉक्टरांची आणि औषधसाहित्याची मोठी गरज आहे याची पुरेपूर कल्पना आपल्या पथकाला आली. सहाजिक त्यांच्या मनांत विचार आला—'आम्हीं अवघे पांचजण आहोंत—आणि आम्हीं आणलेलें साहित्य जेमतेम एक वर्षभर पुरेल-पण चीनला आज हजारों डॉक्टरांची मदत पाहिजे आहे. अमूल्य औषधसाहित्याची गरज आहे—!"

या हॉस्पिटलवर सुद्धां हवाई हल्ला झाला होता. जपानी लोक किती भेकड आहेत याचा हा स्पष्ट पुरावा होता. हॉस्पिटलजवळच निवाऱ्याच्या जागा ( Shelters ) बांधल्या होत्या. हवाई हल्ल्याचा इषारा होतांच सर्व जखमी लोकांना या जागेंत नेण्यांत येत असे. किती बिकट काम हें!

देशासाठीं तहान–भूक विसरून अहर्निश श्रम करणाऱ्या या डॉक्टरांना कोटी कोटी प्रणाम करावेसे वाटतात.

कँटन सोडण्यापूर्वी पथकाला शेवटचा निरोप देण्याकरितां शहरांतील लोकांची प्रचंड सभा भरली. पण दुर्दैव असें कीं, थोडयाच वेळांत हवाई हल्ल्याचा इषारा मिळाला. जमिनींत खणलेल्या निवाऱ्याच्या जागीं सारे लोक जाऊं लागले. बाहेर बॉम्बगोळयांचा नुसता वर्षाव चालला होता. त्यांचा प्रचंड आवाज ऐकून छाती दबकत होती. बॉम्बहल्ल्याचा हा प्रसंग आमचें पथक पहिल्यानेंच प्रत्यक्ष अनुभवत होतें. मनांत डॉक्टर उदास झाले होते; पण ' सब ठीक ' चा इषारा मिळतांच ते जेव्हां बाहेर आले, तेव्हां त्यांची भीति पार पळाली होती.

मधून मधून आपले डॉक्टर छोटे कार्यक्रम पाहायला जात; पण बरोबर कोणी तरी घेऊन. कारण चिनी भाषेशीं त्यांची अजून पुरती ओळख झाली नव्हती. एकदां मोठा मजेदार प्रसंग घडला. डॉ. बसू, मुकर्जी व कोटणीस एका हॉटेलांत जेवण घेण्याकरितां गेले. भूक तर सपाटून लागली—आणि काय मागवायचें तें तर समजेना. डॉ. कोटणीसांना थोडथोडें ' चिनी ' येत होतें; पण डॉक्टरांना आज ' कोंबडीचीं पिलें ' खायची लहर आली होती आणि डॉ. कोटणीसांचें चिनी भाषेचें ज्ञान तर अजून कोंबडीच्या पिला-पर्यंत आलें नव्हतें. शेवटीं खिशांतली पेन्सिल काढून ' मेनु कार्ड ' च्या पाठीमागें डॉक्टरनीं ' कोंबडीचें पिलूं ' काढलें आणि तें पदार्थ आणून देणाऱ्या मुलीच्या हातीं दिलें. ती हंसली व निघून गेली. डॉक्टर आपापसांत बोलूं लागले—"चित्रकलेचें ज्ञान होतें म्हणून बरें, नाहीं तर आज आपल्याला कोंबडीचीं पिलें कांहीं खायला मिळालीं नसतीं—आणि चित्र तरी किती छान् आलंय—हुबेहुब कोंबडीचें पिलूं—!" थोडयाच वेळांत ती मुलगी बशा घेऊन आली. मोठ्या ऐटींत तिनें तीन बशा टेबलावर ठेवल्या—त्यांत तळलेले बेडूक होते !

ता. २३ सप्टेंबर रोजीं पहांटे चारच्या सुमारास रेडक्रॉसच्या सात ॲम्ब्युलन्स हळूहळू ' चांगशा ' च्या दिशेनें चालूं लागल्या. लोक गाढ निद्रेंत

होते. कँटन शहर पूर्णपणें शांततेनें भरून गेलें होतें. प्रत्येक ॲम्ब्युलन्स-मध्यें दोन-दोनशें मीटरचें अंतर होतें. कारण हवाई हल्ल्याचा नेम सांगतां येत नव्हता. ‘ चांगशा ’ ही ‘हुनान ’ प्रांताची राजधानी. आपलें पथकही चांगशाकडे चाललें होतें. ज्या कामासाठीं तें हिंदुस्थानांतून आलें होतें, त्या कामावर आतां लाकरच तें रुजू होणार होतें.

---

# ६

" The 'unchanging' Chinese are going to win the war because after all they are changing and in a progressive, creative direction."

—OWEN LATTIMORE

चांगशा प्रांत कँटनपासून आठशें मैलांवर होता. आणि हा आठशें मैलांचा रस्ता फार अडचणीचा होता. सपाट पठारें, चढणी–उतरणीचे दुष्कर मार्ग, वांकडींतिकडीं धोक्याचीं वळणें. मध्येंच खेडीं दिसत. कांहींवर नुकताच बॉम्बहल्ला होऊन गेलेला दिसत असे. अर्धवट धुराच्या लोटांत तीं अस्पष्टपणें दिसत. मध्येंच देवदार वृक्षांनीं भरून गेलेल्या टेकड्या, बॉम्ब-हल्ल्यानें उध्वस्त झालेले पूल लागत. डोंगरामधून झरे वाहत होते. त्याच्या पाण्यांत मधूनमधून बर्फ तरंगतांना दिसे. आगगाड्यांचे मार्ग देखील बॉम्बनीं उखडले गेले होते: पण नवीन तात्पुरते मार्ग डोंगराखालीं बोगदे काढून तयार केले होते. रात्रंदिवस मोटर चालवून ड्रायव्हर थकले होते. त्यांची नजर पुढच्या मार्गावर लागलेली होती. कधीं एकदां ठरल्या मुक्कामास पोंचतों, असें त्यांना झालें होतें.

आपल्या पांच डॉक्टरांशिवाय या प्रवासांत आणखी कांहीं लोक होते. ते म्हणजे—रेडक्रॉसचे दोन डॉक्टर वँग आणि हॅरिसन. शिवाय ट्रॅन्स्पोर्ट मिनिस्ट्रीचे एक अधिकारी मि. वू आणि एक अमेरिकन धाडसी लेखिका. तिचें नांव मिस् रुबेन्स्.

ता. २५ सप्टेंबरला पथक चांगशाला आलें. आपल्या नागपूर शहरा-एवढें विस्तारानें हें शहर आहे; पण जुन्या तऱ्हेचें. बनारसला जशा अरुंद गल्ल्या आहेत, तशाच येथेंही आहेत. ठिकठिकाणीं बॉम्बहल्ल्यानें इमारतींची नासधूस झाली होती. रस्त्यावर थंडीपासून रक्षण करण्याकरितां छपरें घातलीं होतीं. शहरांतील इतर शिल्पकला पहायला डॉक्टरना वेळच नव्हता.

चहापाटर्या, अभिनंदनपर सभा—सर्व सोहळे आतां संपले होते. कामाला लवकरच सुरुवात झाली.

' मेडिकल रिलीफ ' आणि ' चायनीज नॅशनल रेडक्रॉस'चे डायरेक्टर डॉ. राबर्ट लिम यांच्या हाताखालीं पथकाची नेमणूक झाली. डॉ. लिम ही चीनमधील अत्यंत विख्यात व्यक्ति. स्वभावानें अत्यंत प्रेमळ, पण तीक्ष्ण बुद्धीची. युद्धापूर्वी ' पेपिंग युनियन मेडिकल कॉलेज'मध्यें डॉ. लिम प्रोफेसर होते. चीनच्या या युद्धांत वैद्यकीय संघटना जी इतकी उत्तम प्रकारें झाली, त्याचें सारें श्रेय डॉ. लिमनाच आहे. त्यांच्या असामान्य धाडसाच्या गोष्टी चीनमध्यें फार प्रसिद्ध आहेत. चीनचे सुप्रसिद्ध कादंबरीकार ' लिन युटांग ' यांनीं एका कादंबरींत (A Leaf in The Storm) डॉ. लिमचें चित्र रंगविलें आहे. नानकिंग शहर ज्या वेळीं खालीं करण्यांत आलें, त्या वेळेस डॉ. लिमनीं स्वतःचें जीवित धोक्यांत घालून हजारों लोकांचे प्राण वांचविले. किरकोळ बांध्याची खाकी कपडे घालून कामांत सतत गुंग असलेली ही व्यक्ति, इतकी धाडसी आणि विलक्षण बुद्धिमान असेल याची कल्पनासुद्धां येत नाहीं.

•

जपानबरोबर जेव्हां युद्ध सुरू झालें तेव्हां डॉक्टरीचें शिक्षण घेत असलेले दहा हजार लोक होते. या दहा हजारांपैकीं अवघ्या दोन हजार डॉक्टरांनीं आपले कोर्स पूर्णपणें पार पाडले होते आणि या दोन हजारांतून एक हजार डॉक्टर सैन्यांत दाखल झाले होते; पण डॉ. लिम मोठ्या धीराचे. त्यांनीं आपले सर्व विद्यार्थी जमविले आणि ' मेडिकल रिलीफ कमिशन ' स्थापन केलें. हेच लोक आतां हॉस्पिटलमध्यें आघाडीवर जेथें मदत लागेल तेथें कामाला जातात.

आपल्या पथकाला 'नंबर फिफ्टीन क्युरेटिव्ह (इंडियन) युनिट'मध्यें जाण्याचा हुकूम झाला. या पंधराव्या क्युरेटिव्ह गटांत इंग्लिश बोलणारे पुष्कळ लोक होते. कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी आपल्या पथकाला 'मेडिकल रिलीफ कमिशन'ची माहिती करून घ्यायची होती आणि डॉ. लिम नवीन डॉक्टरांना सगळी माहिती देण्याकरितां वर्ग घेत असत, त्या वर्गांना हजर रहायचें होतें.

प्रत्यक्ष कामाला आतां सुरुवात झाली होती. एकदां जखमी सैनिकाला उचलून आणीत असतां शुश्रूषा-पथकांतला एक तरुण मरण पावला. त्याच्या डोक्याला भयंकर मार बसला होता. त्यानें त्या जखमी सैनिकाला सुरक्षित आणून ठेवला आणि प्राण सोडला. त्याच्या या शौर्याचा गौरव करण्याकरितां नंतर दुखवटयाची सभा भरली, तेव्हां त्याचा बाप हजर होता. सभेंत भाषण करतांना हा साधा कामगार देशभक्त विलक्षण शांतपणें म्हणाला— "माझा हा एकच एक सतरा वर्षांचा मुलगा, मला आणखी मुलगे असते तर मी मोठ्या आनंदानें ते देशाला दिले असते—!" त्याच्या मुलानें गाजविलेलें शौर्य—आणि मुलाच्या वियोगाचें दुःख मोठ्या धैर्यानें आवरून धरणारा हा साधा देशभक्त कामगार म्हणजे चीनच्या असामान्य, जाज्वल्य देशभक्तीचें प्रतीकच नव्हे का ?—आणि असे उमदे, तरुण देशभक्त पुत्र आपल्या देशासाठीं आनंदानें बहाल करणारे बाप चीनमध्यें आहेत म्हणूनच चीनचा पराभव कधींही होणें शक्य नाहीं.

असें हें देशभक्तीचें वेड साऱ्या देशभर पसरलें आहे. एक लहान मुलांमुलींचा गट ( या गटांत सात वर्षांपासून पंधरा वर्षांपर्यंतचीं मुलें होतीं ) आपल्या पथकाला भेटायला आला. हा गट देशांतून सहा हजार मैलांचा प्रवास करून आला होता. प्रत्येक खेडयापाडयांत जाऊन स्वातंत्र्याचीं गाणीं गाऊन, भाषणें करून, छोटीं छोटीं नाटकें करून लोकांच्या मनांत देश-प्रीतीची ज्योत सतत प्रज्वलित ठेवण्याची महान् कामगिरी हीं लहान मुलें करीत आहेत. गटाचा मुख्य पुढारी एक चौदा वर्षांचा मुलगा होता. यानें, चीनला वैद्यकीय पथक पाठविल्याबद्दल हिंदुस्थानचे आभार मानले. दुभाष्याच्या मदतीनें पथकाला या मुलां-मुलींनीं हिंदुस्थानविषयीं पुष्कळ माहिती विचारली.

देशासाठीं आपले आईबाप आणि घरेंदारें सोडणारीं हीं लहान मुलें म्हणजे नव्या चीनचे प्रतिनिधी नव्हेत काय ? ज्या देशांत अशी असामान्य धाडसी सद्गुणी बाळें आहेत, तो देश किती भाग्यवान !

ता. २९ सप्टेंबर रोजीं तीन ट्रकमधून आपलें पथक (नं. १५ क्युरेटिव्ह हिंदी गट ) रेडक्रॉस ट्रान्स्पोर्ट खात्याचे मुख्याधिकारी विल्यम वू यांच्याबरोबर निघालें. दक्षिणपूर्वेकडे तें चाललें होतें. युद्धांतील भीषण व अंगावर शहारे आणणारीं दृश्यें त्यांना आतां दिसायचीं होतीं.

लहानशा बोटींतून नदी ओलांडून ते ' चंग-येन ' शहरांत आले. दूरवर धुराचे लोट आकाशाला भिडले होते. इमारती जळत होत्या. गेले तीन दिवस एकसारखे भयंकर स्वरूपाचे हल्ले या शहरावर होत होते. अर्ध्या तासापूर्वींच भयंकर बॉम्बवृष्टि होऊन गेली होती. बहुतेक सर्व इमारती कोसळून पडल्या आणि राहिल्या होत्या त्या अर्धवट जळत होत्या. रस्त्यावर प्रेतांचा सडा पडला होता. कांहीं प्रेतें कुजलीं होतीं. त्यांची दुर्गंधी सुटली होती. नुकत्याच झालेल्या हल्ल्यांत जवळजवळ दोनशें लोक ठार आणि शंभर एक जखमी झाले होते. शहरांत फार थोडे होते. मधून मधून भुकेनें व्याकूळ झालेलीं माणसें व कुत्रीं दिसत; पण त्या माणसांना माणूस ही संज्ञा द्यायलासुद्धां भयंकर वाटतें ! हळूहळू कशीं तरी चालत होतीं म्हणूनच त्यांना माणसें म्हणायचें; नाहीं तर नुसते हाडांचे सांपळे ! मृत्यूच्या भयाण छायेचीं तीं प्रतिकेंच म्हटलेलीं बरीं.

रेडक्रॉसचे कांहीं कार्यकर्ते इथें होते, पण असल्या भयंकर परिस्थितींत काम करणें त्यांना शक्य झालें नाहीं. तरी पण त्यांनीं शक्य ती मदत केली होती. चीनमधल्या शेंकडों शहरांवर हीच दुःखी छाया पसरली होती. सबंध चीन 'चंग येन ' शहरासारखेंच दुःख व संकटें सहन करीत होता.

१९३९ मध्यें परिस्थिति फार गंभीर होती. एका पाठीमागून एक शहरें काबीज करीत जपान पुढेंपुढें सरकत होता. कँटन-हँको शहरांना वेढा पडला होता. कँटन-चांगशा-हँको रेल्वेवर भयानक हल्ले झाले आणि परिस्थिति अधिकाधिक गंभीर होऊं लागली. असें एकही शहर राहिलें नव्हतें कीं, ज्यावर बॉम्ब-

हल्ला झाला नव्हता. बहुतेक सर्व शहरांची स्थिति " चंग-येन " शहरासारखीच होती. ' यँगताझ ' नदीच्या रोखानें, आपल्या आधुनिक सुसज्ज यंत्रसामुग्रीच्या साहाय्यानें जपानी पुढेंपुढें येत होते. चिनी सैन्याचा त्याच्यापुढें टिकाव लागेना. हजारों लोकांच्या स्वार्थत्यागाचा कोट उभा करून त्यांना माघार घ्यावी लागत होती.

ट्रक-ड्रायव्हरनीं उत्तरेकडे गाडी वळविण्याऐवजीं चुकून पूर्वेच्या दिशेनें ट्रक नेल्या—आणि आपल्या पथकाला हें जें दृश्य दिसलें, त्यानें त्याचें हृदय अगदीं बधिर होऊन गेलें.

क्षणभर त्यांना वाटलें आपण यमपुरींत तर नाहीं ना ? आघाडीवरून माघार घेतलेल्या शिपायांचे थवेच्या थवे भेटत होते. हे सगळे जखमी झाले होते. लंगडत-खरडत दुःखी चेहऱ्यानें ते पिछाडीवरील हॉस्पिटलकडे धांवत होते. त्यांचे कपडे धुळीनें माखले होते. एकाच्यानेंही धड चालवत नव्हतें. इतके ते दमले होते आणि जखमांतून रक्त गेल्यामुळें त्यांचे चेहरे पांढरे फटफटीत पडले होते. कित्येकांनीं अंगावरचे कपडे फाडून आपल्या जखमा बांधल्या होत्या. कित्येकांना खायाला मिळालें नव्हतें, ते शेतांतलें भात चघळत होते. कांहींची स्थिति तर इतकी करुणास्पद झाली होती, कीं बिचाऱ्यांना धड चालवतसुद्धां नव्हतें. त्यांना शक्तिच उरली नव्हती. रस्त्याच्या कडेला ते गुपचुप पडून राहिले होते. त्यांतले किती जिवंत होते तें कळणें दुष्कर होतें !

मध्येंच एका जमावानें बंदुका रोखून ट्रक थांबविली. भुकेनें व दुःखानें जर्जर झाले होते बिचारे. त्यांनीं अन्नाची मागणी केली; पण ट्रकमध्यें कोण लोक आहेत हें कळतांच त्यांनीं चटकन बंदुका खालीं ठेवल्या, माफी मागितली आणि ते ढळढळां रडूं लागले. हृदय हलवून सोडणारा हा प्रसंग होता ! त्या लोकांची ती केविलवाणी स्थिति पाहून आपल्या डॉक्टरांची स्थिति फार चमत्कारिक झाली. मनांतून ते दुःखीकष्टी झाले. डोळ्यांच्या कडा पाण्यानें ओलावल्या.

पुढें त्यांना बॉम्बनें बायका-पुरुषांच्या चिंधड्या झालेल्या दिसायच्या होत्या, गनिमी सैनिकांच्या भयंकर स्वरूपाच्या जखमा बांधायच्या होत्या आणि

शूर सैनिकांचीं निधडया छातीच्या साहसाचीं कृत्यें पाहायचीं होतीं; पण नुकतींच पाहिलेलीं तीं भयानक दृश्यें डॉक्टरांच्या डोळ्यांसमोरून कांहीं केल्या जात नव्हतीं.

ट्रक भलत्याच दिशेला आली आहे हें जेव्हां त्यांना कळलें, तेव्हां ते परत मागें फिरले. मधूनमधून ते खालीं उतरत आणि कांहीं शिपायांवर प्राथमिक उपचार करीत; पण त्यांचें औषधी साहित्य मागें ट्रकमध्यें राहिल्यानें त्यांचा नाइलाज झाला.

आतां ट्रक मागें वळली होती. अघाडीवर झडत असलेल्या गोळ्यांच्या फैरींचा ' सू ऽ ऽ ' असा आवाज ऐकूं येत होता. चार तास गडद अंधारांत त्यांची ट्रक चालली होती. आघाडी त्यांच्यापासून जवळच होती असें दिसलें. कारण निरनिराळ्या निनादांनीं आणि तोफांच्या गडगडाटानें वातावरण भरून गेलें होतें.

ते नदीच्या दुसऱ्या तीरावर आले होते. काळ्याकुट्ट भयाण अंधारांत तोफ-गाड्यांच्या चाकांचा खडखडाट आणि सैन्यांतील शिपायांची हालचाल स्पष्ट ऐकूं येत होती.

डॉ. बसूंना आपली ट्रक कोणती तें अंधारांत कळेना. त्यांनीं टॉर्चचा प्रकाश पाडला. इतक्यांत कमांडर ओरडला—" कोण गाढव आहे तो ! " बसूंनीं झटकन टॉर्च बंद केला. मग त्यांच्या लक्षांत आलें कीं, आपल्या क्षुल्लक चुकीमुळें हजारों जीव नाहक प्राणास मुकले असते. कारण शत्रु त्यांच्या अगदीं जवळपासच होता. रात्रीं साडेदहाला पथक ' वूचांग 'ला आलें आणि ' यांगतेझ् किआंग ' नदी ओलांडून हँकोच्या मार्गाला लागलें.

हँको शहर आधुनिक पद्धतीचें आहे. वातावरण आनंदित होतें. हॉटेलें सुंदर होतीं. दुकानांतील कांचेच्या कपाटांत चैनीच्या वस्तु भपकेदारपणानें व मोठ्या कलाकुसरीनें मांडलेल्या होत्या. मागच्या थोड्याच मैलांच्या अंतरावर जें दृश्य त्यांनीं पाहिलें, त्या दृश्यांत आणि या दृश्यांत किती तफावत होती ! गाड्यांची रहदारी चालू होती. रस्ते माणसांनीं फुलून गेले होते ! पण हेंच शहर थोड्याच दिवसांत खालीं करावें लागणार याची पुसट कल्पनासुद्धां, हें

शहर पाहाणाराना येत नव्हती. लोकांची मात्र आपापसांत कुजबुज चालली होती ' हँको केव्हां खालीं होणार ? '—खरें म्हणजे शहराला जवळजवळ वेढाच पडला होता. " हँको केव्हां खालीं करायला सांगितलं तर ? " अशा तऱ्हेचा विकट प्रश्न लोकांच्या डोळ्यांसमोर यायला पाहिजे होता; पण सर्व व्यवहार सुरळीत नेहमींप्रमाणें चालले होतें; पण आजूबाजूला नजर टाकली तर युद्धाची छाया पडलेली दिसत नव्हती असें नाहीं. थोडयाशा इमारतींची पडझड झाली होती आणि थोडया कोसळलेल्याही दिसत होत्या.

रस्त्यांतल्या गर्दीत अधिकारी, व्यापारी किंवा विद्यार्थि यांच्यापेक्षां निर्वासित लोकांचाच भरणा अधिक दिसत होता. हे हजारों लोक शेंकडों मैलांचा रस्ता पायांखालीं तुडवीत हँकोला आले होते. इतिहासांत अशा तऱ्हेचा मोठा देशत्याग कधींहि घडला नसेल. माणसांची नुसती रीघ लागली होती. किनाऱ्याकडचे लोक घरेंदारें सोडून येत होते. हल्ल्यांचीं शहरें सोडून दुष्कर डोंगर–नद्या ओलांडून, शत्रूच्या क्रूर कत्तलींतून कसाबसा जीव वांचवून हे सारे निर्वासित येत होते. बहुतेकांच्या अंगावर धड कपडेसुद्धां नव्हते. त्यांनीं जें दुःख आणि यातना सोसल्या होत्या त्याच्या खुणा त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें दिसत होत्या.

दुसऱ्या दिवशीं डॉक्टर ६४ व्या बेस हॉस्पिटलमध्यें गेले. हँको शहरांत आनंदाचें वातावरण भरलें होतें. लोकांचे व्यवहार सुरळीत चालले होते; तरी हँकोपासून थोडया अंतरावर काय भयाण प्रकार चालले होते, त्याचा प्रत्यक्ष पुरावा या हॉस्पिटलमध्यें डॉक्टरना दिसला. पूर्वी हें जपानी हॉस्पिटल होतें आणि दोनशें लोकांची व्यवस्था होण्याइतकी जागा होती; पण आतां दीड हजार लोक याच जागेंत खच्चून भरले होते. गवताचे बिछाने जमिनीवर घातले होते. बहुतेकांच्या जखमा गंभीर स्वरूपाच्या होत्या. दुसऱ्या एका हॉस्पिटलमध्यें आपले डॉक्टर गेले. तेथें अडीच हजार लोक भरले होते. डॉक्टरांचीच उणीव होती आणि औषधांचा तुटवडा भासत होता. आपलें पथक अगदीं योग्य वेळीं आलें होतें आणि बरोबर घेतलेलें औषधीसाहित्य अगदीं आणीबाणीच्या वेळीं उपयोगी पडलें.

ता. १ ऑक्टोबरला कामाला सुरुवात झाली. आपल्या पथकाचे दोन भाग पाडण्यांत आले. निरनिराळ्या दोन हॉस्पिटलमध्यें त्यांना काम करायचें

होतें. चोळकर व बसू एका आणि कोटणीस व मुकर्जी दुसऱ्या. डॉ. अतुल " फिजीशियन " म्हणून दोन्ही हॉस्पिटलमध्यें काम करणार होते.

सतरा दिवस पथक सकाळपासून रात्रीपर्यंत चिनी डॉक्टरबरोबर काम करीत होतें. त्यांच्याबरोबर ' जावा ' मधून चीनला मदत करायला आलेले दुसरे डॉक्टरहि होते.

हॉस्पिटलमध्यें जखमी लोकांवर उपचार करीत असतांना या सर्व डॉक्टरांच्या अंगावर शहारे येत. सबंध आयुष्यांत त्यांनीं असल्या उग्र स्वरूपाच्या जखमा पाहिल्या नव्हत्या. " डम-डम " गोळ्यांनीं कांहींचे हातपाय तुटले होते. कांहींच्या फांसळ्यांत व पोटांत बॉम्बचे तुकडे गेले होते; पण चिनी लोक मोठ्या असामान्य धैर्याचे ! इतक्या भयंकर जखमांचें अपार दुःख ते मोठ्या शांतपणानें सहन करीत होते. डॉक्टरना फार आश्चर्य वाटे.

आपल्या डॉक्टरना पुष्कळ गैरसोई सोसाव्या लागत. रात्रींच्या रात्रीं झोंपेशिवाय जात; पण यशस्वी शस्त्रक्रिया झाल्यावर किंवा एकाद्याच्या जखमेवर हळुवारपणें पट्टी बांधल्यावर, त्यांच्या डोळ्यांत जें कृतज्ञतेचें पाणी चमके, तें पाहिलें कीं डॉक्टर आपले श्रम पार विसरून जात. त्यांच्या साऱ्या श्रमाचें चीज त्या एका दृष्टिक्षेपानें होई.

हँकोच्या मुक्कामांत पुष्कळ वेळां बॉम्बहल्ल्यांचा प्रत्यक्ष प्रसंग पाहण्याची पाळी आपल्या पथकाला आली. पण आतां त्यांना त्याचें कांहीं विशेष वाटत नव्हतें. आघाडीवरून बातम्या येत होत्या; पण त्या कांहीं समाधानकारक नव्हत्या. जपान्यांनीं राजधानीकडे येण्याचा दृढनिश्चय केला होता असें त्यांच्या हालचालीवरून स्पष्ट दिसत होतें.

पथकांतले तरुण डॉक्टर आघाडीवर जाण्यास फार अधीर झाले होते. लवकरच " परराष्ट्र-बातमीदार " व हे डॉक्टर असा गट आघाडीवर निघणार होता; पण कशी कोणाला ठाऊक ही बातमी बाहेर फुटली आणि वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. आघाडीवर जायला मिळालेले हूकुम वरच्या अधिकाऱ्यांनीं रद्द केला. गटांतील लोकांचा हिरमोड झाला; पण त्याला इलाज नव्हता. एक वृद्ध तत्त्वज्ञानी गृहस्थानें डॉक्टरांचें समाधान केलें. तो म्हणाला, " तुम्ही कष्टी कशाला होतां ? आघाडीच तुमच्याजवळ येईल लवकर !"

त्या वृद्ध गृहस्थाचे ते बोल लौकरच खरे ठरले. शहरांतलें जीवन संथपणें चाललें होतें. " सुगीचा सण " ( Harvest-Festivat ) नेहमीप्रमाणें आनंदांत साजरा करण्यांत आला. दारूकामाची मोठी बहार उडविण्यांत आली. आणखी दोन दिवसांनीं ' राष्ट्रीय क्रांति-दिन ' ( ता. १० ऑक्टोबर ) आला. मंचू राजघराणें १९११ मध्यें उडवून लावण्यांत आलें, त्या बद्दल हा दिवस साजरा करतात. सगळ्या शहरांतील नेहमीचीं कामें त्या दिवशीं बंद होतीं. घरांवर निशाणें फडकत होतीं, राष्ट्रगीतानें शहर निनादून गेलें होतें. सगळीकडे आनंदीआनंद पसरला होता. संध्याकाळीं हजारों लोक सैन्यांची 'परेड' पहाण्यास जमले होते. मार्शल चँग-के शैकनीं सैन्याची पाहणी केली. आघाडीवरूनसुद्धां शुभवार्ता आल्या होत्या. किआंगसी विभागांत दोन जपानी डिव्हिजन्सचा धुव्वा उडाला होता. ' लौकरच शहर खालीं करण्याचा हुकुम ' सुटणार होता. आणि ८७ वावं हॉस्पिटल दुसऱ्याच दिवशीं खालीं करून आंत पश्चिमेकडे 'इचांग'मध्यें नेण्यांत आलं. दिवसागणिक जपान पुढें पुढें येत होतें. आपल्या पथकाला चांगशामधून टेलिफोनवरून संदेश आला कीं, " तुम्हांला लवकरच हँकोमधून निघावें लागेल. तयार रहा—" डॉक्टर सामानाची बांधाबांध करीत होते. (Rassian bees) हीं सोव्हियट युनियननें पाठविलेलीं विमानें तयार होतीं. वैमानिकहि रशियन होते. लोकांना या वैमानिकांविषयीं फार आदर होता. कारण लोक त्यांच्याविषयीं स्तुतिपर बोलत होते. एक वेळ बाहेर हवाईहल्ल्याचा इषाराहि झाला. पण शत्रूचीं विमानें दुरूनच पळून गेलीं. सोव्हिएट युनिअननें कोणत्याही परकी राष्ट्रांपेक्षां चीनला आज अत्यंत भरीव मदत केली आहे.

ता. १४ ऑक्टोबरला डॉक्टर शहरांतून निघण्याच्या तयारीनें सज्ज होते. शहरांतील लोक घरें सोडून दुसरीकडे जाऊं लागले होते. पण डॉक्टरांचा बेत एकाएकीं फिसकटला. ते ज्या बोटीनें जाणार होते, ती रद्द करण्यांत आली आणि डॉक्टरना दोनशें स्वयंसेवक तपासण्याचें फर्मान आलें. या सर्वांना वैद्यकीय शिक्षणासाठीं पाठवावयाचें होतें. दोन दिवस मुक्काम अधिक वाढला. शहरावर तर सतत हल्ले होत होते. संबंध शहराचें वातावरण विमानांच्या घरघरीनें व विमानविध्वंसक तोफांच्या आवाजानें भरून गेलें होतें.

ता. १७ आक्टोबरला पथक ' यांगतेझ–कियांग ' या बोटीनें 'इचांग'ला निघालें. डेकवर उभे राहून व्यथित नजरेनें डॉक्टर हँकोकडे पहात होते. ज्या राजधानींत त्यांना युद्धकाळांतील चीनचा खरा आत्मा पहाण्याची सुवर्णसंधि मिळाली होती, तें हँको हळूहळूं दिसेनासें झालें. याच हँकोंत त्यांना अजिंक्य चिनी 'रेडस्' (आठव्या पलटणींतील सैनिक ), त्यांचे पुढारी चो–अेन–ले, कोमिटांगचे अधिकारी, "डाव्या गटा"मधील विचारवंत, कोरियन क्रांतिकारक आणि फासिस्तविरोधी जपानी लोक भेटले होते. त्यासाठीं आपणाला परत आपल्या कथानकाकडे वळावें लागणार आहे.

७

# HIGHWAY OF HELL.

" The terror was not that of battle, of shells and tanks and guns and grenades. It was not even the terror of bombs from the air......It was not the terror of death; of combat, of the clang of metal against metal. Men had killed men in battles since civilisation began......But not until now, since God created man, had human eyes seen laughing soldiers throw a baby into the air, catch it expertly on the point of a sharp bayonet and call it sport......No, the terror was that of man, what men of one race could do to fellow men of another race".

—LIN YUTANG in " A Leaf in The Storm ".

हँकोमध्यें आल्यानंतर तीन दिवसांनीं आपल्या पथकाला ८ व्या पलटणीच्या कचेरींत मेजवानीचं आमंत्रण होतें. त्या वेळेस सैन्यांतले अधिकारी, कम्युनिस्ट पार्टीचे प्रमुख, ' न्यू चायना डेली ' चे संपादक, रशियन बातमीदार व एक अमेरिकन बाई, शिवाय एक नाझी विरोधी बाई इत्यादि मंडळी हजर होती.

तिथल्या पद्धतीप्रमाणें ' टोस्ट ' घेतांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां चीनच्या संयुक्त आघाडीला, आठव्या पलटणीला, सोव्हियट युनिअनला अभिवादन करण्यांत आलें. नंतर बहुतेक सर्व देशांतील प्रख्यात स्वातंत्र्य-गीतें गाइलीं गेलीं. अर्थात् ' वंदेमातरम् ' हि त्यांत होतें.

पहिल्या प्रथम आपले डॉक्टर गाणीं म्हणायला लाजत होते; पण इतर लोकांचा उत्साह पाहून त्यांचा लाजाळूपणा एकदम निमाला. डॉ. चोळकरनीं आपला सूर मिळविला. चित्रविचित्र सुरांत निरनिराळ्या देशचीं तीं गाणीं म्हणतांना डॉक्टरना अवर्णनीय आनंद झाला. हँकोमधील ती ‘ लाकडी इमारत ’ स्वातंत्र्याच्या निरनिराळ्या गीतांनीं भरून गेली.

शेवटीं चीनच्या कम्युनिस्ट प्रचारखात्याचे प्रमुख ‘ के-फँग ’ यांचें भाषण झालें. तें, आंतरराष्ट्रीय प्रचार खात्याचे प्रमुख ‘ वूंग विंगमॅन ’ यांनीं जर्मनींत सांगितलें आणि शेवटीं प्रसिद्ध अमेरिकन क्रांतिकारक लेखिका ‘ ॲगनस स्मेडले’ हिनें इंग्रजीमधून सांगितलें. भाषणाचा आशय थोडक्यांत असा होता कीं—

“ चीन हें जें जपानी साम्राज्याविरुद्ध युद्ध लढतो आहे तें एकट्या चीनसाठीं नाहीं; तर जगांतील सर्व गांजलेल्या, गुलामगिरींत पडलेल्या-लोकांकरितां आहे. हिंदुस्थाननें चीनच्या मदतीकरितां हें शुश्रूषापथक पाठवून आणीबाणीच्या वेळीं चीनला जी सहानुभूति दाखविली आहे, त्याबद्दल चीन हिंदुस्थानचा अत्यंत आभारी आहे. इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या वेळीं, चीन त्याला कधींहि विसरणार नाहीं—”

नंतर आठव्या पलटणीचे मुख्याधिकारी ‘ ये-चेंग-थिंग ’ यांचें भाषण झालें. शेवटीं डॉ. अतुल बोलले. त्यांनीं हिंदुस्थानींत भाषण केलें. डॉ. चोळकरनीं तें इंग्रजींतून सांगितलें-आणि तिथें हजर असलेल्या एका बातमीदारानें तें चिनीमधून सांगितलें.

त्यानंतर सैन्यांतील अगदीं साध्या तऱ्हेचें “ आठ सेंटचं ” जेवण घेण्याकरितां डॉक्टरना आमंत्रण मिळालें. या जेवणाच्या वेळीं पथकाला खरा बंधुभाव आणि लोकशाही दिसली. सैन्यांतील अधिकारी आणि शिपाई एकाच टेबलावर जेवण घेत होते. सैन्यांतील लोक बहुतेक तरुण, शेतकरीवर्गातले दिसत होते. पंधरा वर्षांचीं नुकतीच मिसरूड फुटलेलीं कोवळीं पोरेंसुद्धां त्यांत दिसत होतीं. डॉक्टरना हें जेवण फार आवडलें.

चीनमधला प्रसिद्ध कम्युनिस्ट पुढारी ‘ चो–अेन–ले ’ यांना पाहण्याची पथकाला फार इच्छा होती. ती संधीहि त्यांना मिळाली. ते त्यांच्या कचेरींत गेले

तेव्हां ते कामांत गढले होते. त्यांच्या चेहऱ्यावर विद्वत्तेचें तेज विलसत होतें. डोळ्यांतील बुद्धीची चमक सहज दिसून येई. भुवया दाट होत्या. चीनमध्यें अशा भुवया बहुधा आढळत नाहींत. टेलिफोनची घंटा मिनिटामिनिटाला वाजे. तारा येत होत्या–जात होत्या. टेबलावर फाइल्स, कामाचे कागद, नकाशे, पुस्तकें पसरलीं होतीं. तें सर्व पाहूनच कोणालाही हा मनुष्य किती कामांत असतो याची कल्पना आली असती. चो–अेन–लेनीं पोषाख अगदीं साधाच केला होता. सैन्यांतील शिपायांचा असतो ना ? तसाच. टेलिफोनवरून मधूनच वृत्तपत्रांच्या बातमीदारांना ते मुलाखती देत. सैन्याच्या हालचालींबद्दल सांगत. फोनवरून ते चिनी भाषेंत बोलत. पण इंग्रजीहि ते सफाईदार बोलतात. इंग्रजी–अमेरिकन बातमीदार त्यांच्या मुलाखतींचें भाषांतर करतांना केव्हां चुका करीत; पण चो–अेन–ले त्या लगेच त्यांच्या नजरेला आणून देत.

कामांतून थोडे मोकळे झाल्यावर ‘ चो–अेन–ले ’ पथकाशीं बोलत बसले आणि पथकानें जेव्हां “ आम्हांला आठव्या पलटणीबरोबर काम करायला आवडेल ” असें सांगितलं, तेव्हां त्यांचा चेहरा आनंदानें फुलला. त्या भेटींतील त्यांच्या संभाषण–चातुर्यानें आणि बुद्धिवैभवानें आपल्या पथकाच्या मनांत त्यांच्याविषयींचा आदर द्विगुणित झाला; पण विशेष आश्चर्य पथकाला वाटलं तें मेजवानीच्या दिवशीं समारंभाच्या शेवटीं. यावेळीं दारू घेण्याची पद्धत चीनमध्यें आहे; पण जनरल चो–अेन–ले दारूला शिवले नाहींत हेंच तें आश्चर्य. निष्ठावंत कार्यकर्ते कोणत्याच व्यसनांत वा मोहांत गुरफटत नाहींत हेंच खरें.

आणखी पुष्कळ कार्यकर्ते हँकोंत पथकाला भेटले. त्यांत कोरियन क्रांतिकारक, एक जर्मन बाई ( हिनें एका चिनी कम्युनिस्टाशीं लग्न केलें. या हिटलर-विरोधी बाईनें आतां चीन हाच आपला देश मानला आहे. ) हँकोमधील ‘ टास एजन्सी ’चा रशियन मॅनेजर ‘ रॅगोव्ह ’ यानें तर आपल्या पथकाविषयीं चांगला लांबलचक वृत्तांत लगेच मास्कोला पाठविला.

या हँकोच्या मुक्कामांत पथकाला जर कोणती असामान्य व्यक्ति भेटली असेल, तर ती ‘ अॅग्नस स्मेडले. ’ हँकोंत पाय ठेवल्याबरोबर पहिल्या प्रथम डॉक्टरांचं स्वागत या अमेरिकननें केलें. चामडयाचें जाकीट घातलेल्या राकट

चेहऱ्याच्या या बाईकडे पाहिलें कीं, लगेच कळून येई–या बाईला आयुष्याशीं जबरदस्त झुंज द्यावी लागली आहे आणि तें सत्यही होतें. तिचें सारें जीवन क्रांतीसाठीं झगडण्यांत गेलं होतं. त्यामुळेंच तिच्या चेहऱ्यावर मृदुतेची पुसट रेषासुद्धां दिसून येत नाहीं.

यांचें चरित्र लिहायचें म्हटलें तर हजारों पानें भरतील. स्मेडलेबाईंची जीवन–कथा मोठी विलक्षण आहे.

अमेरिकन कामगारांची ही एक मुलगी. हिचें सारें आयुष्य सामाजिक अन्यायाविरुद्ध व क्रांतीसाठीं लढण्यांत गेलें. शेवटीं देशांतून बाहेर निघावें लागलें. इंग्लंड, जर्मनी, सोव्हियट युनिअन वगैरे देशांत राहून शेवटीं ही चीनला आली आहे. डॉक्टरना त्यांच्याविषयीं जास्त आपुलकी वाटली याचें कारण त्या बरेच दिवस कांहीं हिंदी क्रांतिकारकांबरोबर होत्या हें होय.

कॅलिफोर्नियाच्या युनिव्हर्सिटींत यांनीं एका हिंदी व्याख्यात्याचें भाषण ऐकलें. लगेच स्मेडलेबाईंनीं हिंदुस्थान आणि हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीविषयीं अभ्यास करायला सुरुवात केली. नंतर न्यूयॉर्कला आणखी कांहीं हिंदी लोक त्यांना भेटले–आणि त्या कट्टर साम्राज्यशाही–विरोधक झाल्या. पहिलें महायुद्ध सुरू झालें तेव्हां ब्रिटिशांना मदत म्हणून कांहीं हिंदी क्रांतिकारकांना अमेरिकन गव्हर्मेंटनें तुरुंगात डांबलें. अमेरिकन सरकारच्या या कृत्याचा स्मेडलेनीं जोराचा निषेध केला. त्याचा परिणाम एवढाच झाला कीं, स्मेडलेबाईंना तुरुंगाची हवा खात बसावें लागलें.

युद्ध संपल्यानंतर त्यांची सुटका झाली. त्यांनीं इंग्लंडची वाट धरली. तिथून सोव्हिएट युनिअनला आणि शेवटीं जर्मनीला त्या आल्या. त्यावेळीं जर्मनींत देशत्याग केलेल्या कांहीं हिंदी राजकीय कार्यकर्त्यांचा व क्रांतिकारकांचा निकट सहवास स्मेडलेबाईंना लाभला. नंतर त्या बातमीदार म्हणून चीनला आल्या. तेवढ्यांतच जर्मनींत हिटलर सत्तारूढ झाला. त्यानंतर जर्मनीला परत जाण्याचा विचार स्मेडलेबाईंनीं मनांतून कायमचा काढून टाकला. आतां त्यांचं वास्तव्य चीनमध्येंच आहे. पुष्कळ वेळां त्या सोव्हियट युनिअनला भेट देऊन येतात. अमेरिका व जर्मनींतील हिंदी क्रांतिकारकांच्या साहसी व रोमहर्षक गोष्टी त्यांनीं पथकाला पुष्कळच सांगितल्या.

स्मेडलेबाई खरोखर असामान्य आहेत. त्यांनीं कधीं हिंदुस्थानांत पाय ठेवलेला नाहीं; पण हिंदुस्थानविषयीं त्यांना किती माहिती! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयीं त्यांना कोण कळकळ व आस्था वाटते—आणि साहजिकच आहे. कारण त्याग व सेवा यांची धुरा त्यांच्या हातीं सतत आहे.

यामुळेंच आपल्या डॉक्टरना त्यांच्याविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि वाटूं लागली. त्या अधिक जवळच्या वाटूं लागल्या आणि जेव्हां आठव्या पलट-णीच्या कचेरींत डॉक्टरना मेजवानी दिली, त्यावेळेस शेवटीं 'टोस्ट' घेतांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला अभिवादन करण्यांत आलें. आपले पांच डॉक्टर उभे राहिले. त्यांच्या जोडीला "ॲगनस स्मेडले" उभ्या राहिल्या आणि सहा जणांनीं तें अभिवादन स्वीकारलें!

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल एवढी प्रामाणिक निष्ठा व कळकळ असणाऱ्या या अमेरिकन क्रांतिकारक लेखिकेला 'असामान्य' म्हटलें तर तें अयोग्य होईल का?

प्र. नं. ८३३९
८ अनुक्र. ५९

# A TOAST TO INDIAN FREEDOM.

Manhus ghulami ko barh kar har manzil par thukraenge.
Insani azadi ke liye jal jaenge kat jaenge.
Phir Cheeni Hindi mil jul kar nusrat ke tarane gaenge.
Azadiye alam ka parcham phir duniya par lehraenge!

Forward, comrade, Forward! We'll end this curse of slavery
We'll go through fire, we'll die for human freedom.
Indian and Chinese together will sing the song of victory
And hoist over the world the brave new flag of freedom.

—SAGHAR NIZAMI.

हँकोहून इचांगला येतांना आपल्या पथकाला, शत्रूच्या क्रूर हल्ल्यांमुळें लोक घरेंदारें सोडून कसे पळत होते तें पाहण्याची संधि मिळाली. युद्धकालांतील ती भयानक परिस्थिति त्यांच्या आतां चांगलीच परिचयाची झाली होती.

हँकोचे गजबजलेले रस्ते, स्वागत-सभा, मेजवान्या सगळें सगळें आतां मागें राहिलें होतें.

बोटीमधून, लाँचमधून, लहान होडग्यांतून शहरांतील सर्व लोक बाहेर चालले होते. वातावरण कर्कशतेनें भरलें होतें. लहान मुलें रडत होतीं. बकऱ्या-कोंबड्यांचे चित्रविचित्र आवाज गडबडीमध्यें मिसळले होते. लोकांच्या हातांत बॅगा, बोचकीं दिसत होतीं. सगळीकडे गोंधळ उडाला होता. शहरापासून रस्ते जसे दूरदूर जाऊं लागले, तशा त्यांच्या करुण नजरा शहराकडे लागल्या. बोटीनें

वळण घेतलं आणि हँको शहर उंच शिखरांच्या टेकड्यांत लोपलें गेलें. सर्वांच्या डोळ्यांत दुःखाचे भाव दिसत होते. जणू मनांत ते म्हणत होते, 'आम्हांला हँकोला परत येणें शक्य होईल का ?' पण तसें उघड कोणीही बोलत नव्हतें. असामान्य धैर्याच्या त्या चिनी जनतेनें एकही अश्रु ढाळला नाहीं.

डॉक्टर ज्या बोटींत बसले होते, ती चिकार माणसांनीं भरून गेली होती; पण त्याला कांहीं इलाज नव्हता. जपान्यांनीं पुष्कळ बोटी बुडविल्या होत्या. डेकवरून यँगतेझ-किआंग नदी आपल्या गंगेपेक्षांहि विस्तीर्ण वाटत होती. दक्षिण किनाऱ्यावर छोट्या छोट्या टेकड्यांची रांग आणि उत्तरेस मैलच्या मैल अफाट विस्तीर्ण पठारें दिसत होतीं. हिरवींगार शेतें आणि मातीचीं खोपटें मधूनमधून डोकावत होतीं. तीं पाहून हिंदुस्थानांतील खेड्यांची आठवण येई. मधूनमधून शेतांत माघार घेतलेल्या शिपायांच्या तुकड्याहि दिसत. युद्धाची अक्राळ-विक्राळ छाया या रमणीय प्रदेशावर पडणार याचींच तीं चिन्हें होतीं !

बोटीमध्यें डॉक्टरांच्या नव्या ओळखी झाल्या. प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ आणि " छोट्या शिक्षण चळवळीचे " (Little-teacher movement) प्रणेते प्रो. टॅओ व चिनी पार्लमेंटचे एक सभासद यांच्या ओळखी झाल्या.

चळवळीविषयीं डॉक्टरनीं प्रो. टॅओंना बरीच माहिती विचारली. प्रोफेसरनी ती मोठ्या आनंदानें सांगितली. " या चळवळींत दहा वर्षांपासून तों पंधरापर्यंतचीं मुलं-मुली आहेत. ही सर्व मुलं सबंध देशांत-शत्रूच्या पिछाडीच्या भागांत देखील फिरून शेतकऱ्यांना, त्यांच्या बायकामुलांना लिहिण्या-वाचण्यास शिकवितात. तसेंच चीनची ही लढाई कशाकरितां चालली आहे, जपानबरोबर आपण कां लढतों आहोंत, याची तात्विक भूमिकाहि तीं समजावून देतात. बोटीवर या चळवळींतला एक दहा वर्षांचा मुलगा होता. आपल्या पथकाविषयीं त्याला समजतांच तो लगेच डॉक्टरांजवळ आला. त्याची बुद्धिमत्ता, वागण्याची लीनता व देशाविषयीं कळकळ पाहून डॉक्टरना त्याच्याविषयीं फार कौतुक वाटलें. जातां जातां त्यानें डॉक्टरना सांगितलें, " मी तुम्हांला आमचीं स्वातंत्र्याचीं गाणीं शिकवीन "

जपान आपल्या यांत्रिक शक्तींच्या जोरावर कदाचित चिनी सैन्याचा पर-भव करूं शकेल; पण या 'छोट्या शिक्षकांनीं' जीं शस्त्रें हातीं धरून जपान

बरोबर झुंजण्याचें ठरविलें आहे, तीं इतकीं प्रभावी आहेत कीं, जपानला त्यांच्या-पुढें निश्चितपणें हात टेकावे लागतील. कारण हीं शस्त्रें आत्मविश्वासाचीं व ज्वलंत दृढनिश्चयाचीं आहेत.

चार दिवसांनंतर पथक ' इचांग ' ला आलें. हें लहानसें शहर थोडेंसें महत्त्वाचें आहे. कारण यँगतेझ नदीवरचें हें शेवटचें बंदर. मोठ्या बोटी इथपर्यंत येऊं शकतात. पुढें धोक्याचीं वळणें लागतात. त्यामुळें फक्त लहान बोटींनाच पुढें सोईस्कर पडतें. ब्रिटिश साम्राज्यशाहीनें इचांगमध्येंसुद्धां आपलें जाळें पसरून ठेवलें आहे. ' स्टँडर्ड ऑइल प्लँट, ब्रिटिश व्यापारी कचेऱ्या शहरांत आहेत. पाण्यांत ' गनबोट्स ' उभ्या होत्या, त्यांवर ' युनिअन जॅक ' फडकत होतें.

ऑक्टोबर २२ पासून १६ नोव्हेंबरपर्यंत सव्वीस दिवस आपल्या पथकानें ' नंबर १ मिलिटरी हॉस्पिटल ' आणि ' नंबर ८६ रेडक्रॉस हॉस्पिटल ' यांतून कामें केलीं. जखमी लोकांना हँकोहून इथें आणण्यांत आलें होतें; पण दुर्दैवानें सगळे लोक येऊं शकले नाहींत. हॉस्पिटलच्या बोटीवर जपानी विमानांनीं हल्ले केले. इतकेंच काय, पण पाण्यांत जीव वांचविण्याकरितां कांहीं जखमी लोक धडपडत होते, त्यांच्यावरही बॉम्ब फेंकण्यांत आले. कांहींना मशिनगन्सनीं मारण्यांत आलें.

इचांगला पथक आलें, त्याच दिवशीं बातमी आली–' कँटन पडलें ! ' आणि दुसऱ्याच दिवशीं एका चिनी सैनिकानें बातमी आणली–' हँकोवर चार वेळां हवाई हल्ला झाला–शहर शत्रूच्या कबजांत केव्हां जाईल याचा नेम नाहीं–' दिवसेंदिवस जपानी ' आगे कूच ' करीत होते. इचांगसुद्धां केव्हां खालीं करावें लागेल तें सांगवत नव्हतें.

लोकांत गोंधळ माजला होता. अफवा उठत होत्या. दिवस चिंतेंत चालले होते. आपलें पथक पुढच्या हुकुमाची वाट पाहत होतें. हवेंतला गारठा उग्र स्वरूप धारण करीत होता. पावसाची झिमझिम चालूच होती. वातावरण धुक्यांत अंधुक झालें होतें. पुढें आठव्या फलटणीबरोबर काम करतांना त्यांनीं असल्या वातावरणांतच काम करायचें होतें. डॉ. अतुल मोठ्या धैर्याचे ! ते पथकाला उत्साह देत होते. निसर्गाला त्यांनीं उघड उघड आव्हान दिलें होतें. दररोज संध्याकाळीं चार ते आठपर्यंत ते या पावसाळी गारठ्यांत दहा मैल फिरायला

४

जात. इचांगच्या टेकडचा पायांखालून तुडवीत ते परत येत, तेव्हां फार दमून गेलेले असत ; तरी मानसिक आनंदाच्या उन्मादांत गुंग होऊन जात.

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत ' इचांग ' शत्रूच्या टप्प्यांत आलें. निसर्गानेंही आतां शत्रूबरोबर कट केला होता. कारण धुकें विरून गेल्यामुळें रात्रीं स्वच्छ चांदणें पडे. नोव्हेंबरची तीन तारीख उजाडली. हा जपानी राजाचा वाढदिवस. पुष्कळशा चिनी शहरांवर अमानुष हवाई-हल्ला करून तो दिवस साजरा करण्यांत आला. सुदैवानें इचांग या हल्ल्यांतून सुटलें; पण दुसऱ्याच दिवशीं एक विमान टेहळणी करून गेलें आणि चोवीस तासांच्या आंत नऊ विमानांचा काफिला हजर झाला. डॉक्टर हॉस्पिटलमध्यें काम करीत होते. ते लगेच निवाऱ्याच्या जागीं गेले. किंचाळणाऱ्या बाँबनीं साऱ्या वातावरणांत उग्र भयानकता पसरली. विमान-विध्वंसक तोफांच्या गडगडाटानें व विमानांतून पडणाऱ्या बाँबच्या धडधडाटानें सारें वातावरण निनादून गेलें. विमानें गेलीं. एकही माणूस दगावला नव्हता. बाँब शहराच्या बाजूला विमानतळाजवळ मुद्दाम खणून ठेवलेल्या मोठाल्या खड्डयांत पडत होते.

या अपयशानें जपानी अधिकच चिडले असावेत. सात नोव्हेंबरला आकाशांत पौर्णिमेचा चंद्र डौलानें प्रकाशत होता. अचानक एक मोठा वैमानिक काफिला आला आणि हल्ल्याला सुरुवात झाली. ' घूं ऽऽऽ ' असा भयंकर भयानक आवाज करीत विमानें अगदीं खालीं झेंप घालीत आणि बाँबचा वर्षाव करीत. पुष्कळशीं घरें जमीनदोस्त झालीं. बरींच माणसें दगावलीं. चांदण्याचा हा प्रभाव होता. पण चंद्राला झांकणार कसा ?

जपानी हल्ले आतां वरचेवर होतच होते. हँको शहराची कांहींच बातमी कळत नव्हती. दळणवळणाचे बहुतेक मार्ग उध्वस्त झाले होते. लोकांत अफवा पसरल्या, ' चिनी लष्कर सर्व आघाडीवर माघार घेत आहे. ' पण चँग-के-शेकनीं पत्रकें काढून लोकांना धीर दिला. " हल्ले जोरानें होत आहेत हें खरें; पण घाबरून जाण्याचें कारण नाहीं. अंतिम विजय आपलाच आहे याबद्दल सरकारला पूर्ण विश्वास आहे-" अशा तऱ्हेचीं पत्रकें विमानांतून टाकण्यांत आलीं.

या पत्रकांनीं लोकांना बराच धीर आला. विश्वासाचें वातावरण निर्माण झालें. पण लोक मात्र हा भाग सोडून जाण्याच्या तयारीला लागले होते.

६५२३

आपल्या पथकाला ‘ चुंकिंग ’ला जाण्याचा हुकुम आला. त्यांना घेऊन जाणाऱ्या बोटीचीच काय ती खोटी होती.

पहिल्या एक दोन हल्ल्यामुळें लोक घाबरले; पण नंतर कोणालाच कांहीं वाटेनासें झालें. जेथें तेथें शिस्त आणि शांतता दिसत होती. आपले डॉक्टरहि बरेच धीट बनले होते. एकदां हल्ल्याचा इषारा झाला, तर आपले डॉक्टर खुशाल रेडिओजवळ बसून कलकत्याचा गाण्याचा कार्यक्रम मोठ्या मजेंत ऐकत होते. जपानी बॉंबच्या भीतीवर हिंदुस्थानांतील गाण्यानें विजय मिळविला होता !

एकदां असाच एक गायनाचा प्रसंग चालला होता. औषधांच्या पेट्या सोडतां सोडतां एका पेटींत काय औषधें असावींत तें कळेना. पेटी उघडून पाहतात तर आश्चर्याचा धक्काच बसला. कारण औषधांच्या बाटल्यांऐवजीं आंत ‘ ग्रामोफोन ’ निघाला. एका बाजूला एक चिठी लटकावलेली दिसली. सर्वांच्या ओळखीचें नांव होतें चिठ्ठीवर. “ जवाहरलाल नेहरू ! ” इंग्लंडहून नेहरूंनीं पथकाला भेट म्हणून तो पाठविला होता. नेहरूंची ती प्रेमळ दूरदृष्टि पाहून डॉक्टरांचें हृदय भरून आलें. ती सबंध रात्र ‘ रेकॉर्ड ’ लावीत ते बसले होते.

नोव्हेंबरच्या १५ तारखेस पथक चुंकिंगला निघालें. त्यांच्याबरोबर दोन चिनी अधिकारी आणि आठ नार्वेजियन मिशनरी होते. त्यांपैकीं सहा स्त्रिया होत्या. त्या सहाजणी लग्नाकरितांच चुंकिंगला निघाल्या होत्या. इतक्यांत कोणी तरी विनोदानें म्हटलें, “ सहा नार्वेजियन नवऱ्या. ” त्या विनोदी उद्गारामुळें वातावरण उल्हसित झालें. मृत्यूची भीषण छाया भोंवतालीं पसरली असली, तरी मानवी जीविताला शोभा आणणाऱ्या प्रेम, प्रणय इत्यादि मृदु भावना म्हणूनच जणूं तुच्छतेनें हंसत होत्या.

नदीच्या जोरदार आणि धोक्याच्या प्रवाहांतून बोट गोगलगाईच्या गतीनें चुंकिंगला चालली होती. तासाला जेमतेम दोन-तान मैलांचें अंतर कापलें जात होतें.

यांगत्झेचें पात्र पुढें पुढें अरुंद होत होतें. दोन्हीं बाजूला गगनचुंबी डोंगरांची रांग लागली होती. हीं डोंगरांचीं उंचच उंच शिखरें पाहून

निसर्गाच्या चमत्काराविषयीं नवल वाटतें आणि आपण किती लहान आहों अशी विचित्र कल्पना मनांत येते. वळण घेतांना बोटीचा भोंगा वाजतो, तो पण किती विचित्रपणें. शांत वातावरणांत त्याचे प्रतिध्वनि दूरपर्यंत पसरत.

दुसऱ्या दिवशीं ते " Szechuan "ला आले. ह्याचा अर्थ ' चार नद्या ' असा आहे. चीनचा हा दुसरा मोठा प्रांत. इथें लोकवस्ती अत्यंत दाट आहे. दोन्हीं बाजूला छोटीं छोटीं सुंदर खेडीं व शहरेंहि आहेत. डामरी रस्ते, विजेचे दिवे, उद्यानं, संत्र्यांचे मळे, कौलारू घरं आणि आधुनिक पद्धतीच्या टुमदार बंगल्या दिसत होत्या.

युद्धाचे वादळी वारे अजून या सुंदर प्रांतापर्यंत आले नव्हते. थोड्याच दिवसांपूर्वी नवीन बांधलेल्या मिलिटरी हॉस्पिटलवर ' रेड क्रॉस ' हीं अक्षरें मोठ्या झोकांत चमकत होतीं आणि हँको-इचांगहून आलेल्या शिपायांच्या तुकड्या ' लेफ्ट-राइट, लेफ्ट-राइट ' करीत चालल्या होत्या.

प्रवासाच्या तिसऱ्या चौथ्या दिवशीं संत्र्यांचे मळे बरेच दिसूं लागले. टेकड्यांच्या पायथ्याशीं भाजीपाला लावला होता. आकाशांत चिनी विमानांची घरघर ऐकूं येई आणि ' गन-बोट्स ' नदींतून जा-ये करीत होत्या. त्यांवर उभे राहिलेले खलाशी हवेंत हात उंचावून आनंदानें आरोळ्या ठोकीत होते.

हळूहळू थंडी कडाक्याची पडूं लागली. वातावरण धुक्यानें भरलें होतें. संत्र्यांच्या मळ्यांऐवजीं टेकड्यांच्या पायथ्याला देवदार वृक्षांचीं रानें दिसूं लागलीं. चुंकिंग जवळ येत होतें, त्याच्या या खुणा होत्या.

सहाव्या दिवशीं प्रवास संपला. बोटीच्या इंजीनचा ' खडखड-धडधड ' आवाज संपला आणि बोट धक्क्याला लागली.

पथकाचें स्वागत करायला चुंकिंगचे मेयर डॉ. मै, जनरॅलिसिमोचा एक प्रतिनिधि, शांतिनिकेतनचे एक प्रोफेसर तॅन-यॅन-शॅन, बुद्धसंस्थेचे अध्यक्ष, आणि डॉक्टर ज्यांच्याकडे राहणार होते, ते कॅनेडियन मिशनरी हजर होते. बोटींतील इतर प्रवाशांचा निरोप घेऊन डॉक्टर शहरांत निघाले.

चीनच्या दोन मोठ्या नद्या-यँगतझे आणि केलिंग यांचा संगम (Szechuan) टेकड्यांवर होतो. इथंच चुंकिंग वसलं आहे. समुद्रकिनारा आणि शांघाय इथून १५०० मैलांच्या अंतरावर आहेत. पेकिंग आणि

नानकिंग शहरांप्रमाणें या भागाला इतकें महत्त्व कधींकाळीं येईल असें वाटत नव्हतें; पण जपानच्या हल्ल्यामुळें या आंतल्या अफाट प्रदेशाकडे लोक सुरक्षिततेकरितां धांवून येत होते. पेकिंग, नानकिंग शहरांइतकेंच या भागाला महत्त्व आलें आहे. बरींच वर्षे दृष्टीआड झालेल्या या मागसलेल्या भागांत आतां नवजीवन खेळूं लागलें आहे. शेकडों वर्षांपासून पूर्वकिनाऱ्यालगतचा प्रदेश ( उत्तरेकडील पेकिंगपासून तों दक्षिणेस कँटनपर्यंतचा ) म्हणजे उद्योगधंद्यांचें, शिक्षणाचें आणि संस्कृतीचें माहेरघर होतें. पण जपानी हल्ल्यांमुळें विलक्षण उलथापालथ झाली. या भागांतले सगळे 'बडे' लोक पश्चिमेकडे धांव घेऊं लागले. अंधारांत राहिलेलीं हीं खेडीं, पठारांचे भाग एकदम प्रकाशांत आले. विश्वविद्यालयें, त्यांचीं वाचनालयें, विद्यार्थी—सर्व कांहीं इथें येऊन राहिलें आहे. कॅनसु,शॅन्सी, हुपे, हुनान इत्यादि भागांत एकदम चैतन्य खेळूं लागलंय. विद्यार्थी, कलावंत, व्यापारी, उद्योगधंद्यांतील प्रमुख व्यक्ति इथेंच वास्तव्य करून आहेत.

चुंकिंग गजबजलेलें दिसत होतें. पूर्वेकडून आलेले निर्वासित सरकारचे आणि कोमिंटांगचे अधिकारी शहरांत दिसत होते. लोकवस्ती बरीच वाढली होती. चुंकिंग कांहींसें 'रोम' सारखें आहे. टेकड्यांवर बहुतेक घरें होतीं, तेव्हां शहरांतून फिरायचें म्हणजे बऱ्याच अडचणी—उतरणी लागतात. श्रीमंत आणि बडे अधिकारी 'सीडॅन् चेअर' ( दोन माणसांनीं उचलायची खुर्ची ) मधून जातात. गरीब लोक बिचारे पायीं चालतांना दिसतात. अरुंद रस्त्यांत दुकानें हरतऱ्हेच्या मालानें खच्चून भरलेलीं होतीं. पण प्रत्येक वस्तूची किंमत जबरदस्त होती. घराघरांवर चित्रविचित्र रंगांचीं प्रचारपत्रकें लावलीं होतीं. त्यामुळें वातावरण राजकीय जागृतीनें भरून गेल्यासारखें वाटे. मिरवणुकी आणि सभांची दंगल चालू होती. पुस्तकांच्या दुकानांत पहावें तर जिकडे तिकडे 'समाजसत्तावाद' व 'कम्युनिझम्' यांच्या तत्त्वप्रणालींचींच पुस्तकें अधिक दिसत होतीं. लोकांचा ओढा बहुतेक जहाल मतांकडे होता.

दोन महिन्यांच्या चुंकिंगच्या मुक्कामांत डॉक्टरना चिनी गव्हर्नमेंटमधील पुष्कळ अधिकारी भेटले. भेट झाली नाहीं ती चँग—कै—शेकची. जनरॅलिसिमोचा बहुतेक वेळ नवीन आघाड्या संघटित करण्याकडे जाई. कारण हँको पडल्यावर हें काम फार महत्त्वाचें झालें होतें. एकदां भेट घेण्याची वेळ नक्की ठरली;

पण पथकाला अकस्मात् ‘ येनान् ’ला जाण्याचा रेडक्रॉसकडून हुकुम झाला. चँग–कै–शेकनीं लगेच पथकाला तांतडीचा संदेश पाठविला—“ माझी भेट घेण्यापेक्षां जखमी सैनिकांच्या शुश्रूषेला तुम्हीं आधीं जावं—”

मादाम चँग–कै–शेक मात्र पथकाला नव्या वर्षाच्या गॅदरिंगच्या वेळीं भेटल्या. त्यांनीं मोठ्या सन्मानानें पथकाचें स्वागत केलें आणि चीनच्या वतीनें मनःपूर्वक काँग्रेसचे आभार मानले. त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांना कामाचा ताण अतिशय पडत असला पाहिजे हें स्पष्ट दिसत होतें; पण तरीही साधा निळा झगा घातलेल्या मादाम चँग–कै–शेक मधूनच हंसत, तेव्हां त्यांच्या असामान्य धैर्याची व आशावादाची चमक त्यांच्या त्या हास्यांत पूर्णपणें दिसून येई. याच वेळीं त्यांना सुप्रसिद्ध ऑस्ट्रेलियन गृहस्थ ‘ डोनाल्ड ’ हे भेटले. चीनच्या आधुनिक इतिहासांत या गृहस्थांची कामगिरी महान आहे. चीनमधील प्रमुख व्यक्तींचे ते जिवलग स्नेही आहेत. शिवाय खास सल्लागारही आहेत. वृत्तपत्र-व्यवसायी म्हणून प्रथमतः ते चीनला आले. चिनी क्रांतिकारकांचे दोस्त म्हणून ते राहिले आणि मंचू राजघराणें उलथून पाडायला क्रांतिकारकांना त्यांनीं मदत केली. डोनाल्ड हे सन–येत–सेनचे अत्यंत जिवलग मित्र होते. आज चँग–कै–शेकचे ते अनधिकृत सल्लागार आहेत.

चुंकिंगमध्यें पहिल्या प्रथम पथकाला जर कोणी प्रसिद्ध व्यक्ति दिसली असेल, तर ती ‘ लिन सेन. ’ चिनी रिपब्लिकचे ते अध्यक्ष आहेत. प्रो. तॅन–यॅन–शॅन–बरोबर ते गव्हर्नमेन्टच्या हेड–क्वार्टर्समध्यें आले होते. ही इमारत अतिशय साधी होती. ज्या खोलींत ते उतरले होते, तिथें खुर्च्यांशिवाय कांहीं सामान नव्हतें. त्या साधेपणाचें डॉक्टरना फार आश्चर्य वाटलें. थोड्या वेळानें लिन सेन आले. विलक्षण असामान्य बद्धिमतेचें आणि पूर्वकालीन संस्कृतीचें लिन सेन म्हणजे एक प्रतीक होतें. दाढी लांब वाढलेली. तींत मधूनमधून पांढरे केस दिसत होते. काळ्या लांब झग्यावर त्यांनीं जाकिट घातलें होतें. एवढें वय झालेलें, तरी त्यांच्या चेहऱ्यावरच्या देखणेपणाच्या रेषा जरासुद्धां ढळल्या नव्हत्या. विद्वत्तेचें व ज्ञानाचें तेज सभोंवार पसरलें होतें. ‘ रिमलेस ’ चष्म्यांतून आपल्या पथकाकडे ते प्रेमळ कृपादृष्टि टाकीत होते. डॉक्टरांबरोबर बोलतांना दुभाष्याचें काम प्रो–तॅन–यॅन–शॅन करीत होते. पहिल्या प्रथमच लिन सेननीं महात्मा गांधी व नेहरू यांच्या प्रकृतीविषयीं विचारलें. नंतर पुष्कळ वेळ चीन-

हिंदुस्थानच्या राजकीय व सांस्कृतिक वार्तीविषयीं, बुद्धतत्त्वज्ञानाविषयीं आणि इतर विषयांवर गोष्टी झाल्या. संभाषणाच्या शेवटीं लिन सेन म्हणाले, " हे दोन देश अधिक जवळ आले पाहिजेत—" आपले डॉक्टर परतले, तेव्हां ते लिन सेनच्या विद्वत्तेनें व बुद्धिमत्तेनें दिपून गेले होते. त्यांना खरोखर एक महान् व्यक्ति भेटली होती.

नंतर कोमिटांगच्या संयुक्त कायदेमंडळातर्फे पथकाला पार्टी देण्यांत आली. त्यांच्या प्रत्यक्ष कामाला अजून जरा अवकाश होता.

हँकोमधील आठव्या पलटणींतले कांहीं ओळखीचे लोक इथें पथकाला भेटले. पलटणींतले बरेचसे लोक जपानी हल्ल्यांत कामास आले होते. या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ एक जंगी सभा 'न्यू चायना डेली' तर्फे भरली होती. डॉक्टरही या सभेला हजर होते. सभेंत कम्युनिस्टांचा आणि डाव्या गटाचा भरणा जास्त होता. व्यासपीठावर सन–येत–सेनची भव्य तसबीर लावली होती. तसबिरीच्या बाजूंस चीनचे राष्ट्रीय–ध्वज फडकत होते. सभेंत एकही लाल ध्वज दिसत नव्हता. डॉक्टरनीं याबद्दल विचारलें तेव्हां त्यांना समजलें कीं, चिनी-कम्युनिस्ट लाल झेंडा कधींच फडकवीत नाहींत. चीनचा जो राष्ट्र–ध्वज आहे त्याचाच सर्रास उपयोग त्यांच्या सभांतून केला जातो. पुष्कळ वक्त्यांचीं भाषणें झालीं. शेवटीं डॉ. बसू बोलायला उभे राहिले. चीन हिंदुस्थानचे संबंध नेहमीं भ्रातृभावाचे असले पाहिजेत, असें जेव्हां त्यांनीं सांगितलें, तेव्हां टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

चुंकिंगला त्यांना एक हिंदी हकीम भेटला. हा मूळचा पेशावरचा. पहिल्यानें तो शांघायमध्यें आला; नंतर हँकोंत राहिला आणि आतां चुंकिंगमध्यें सुरक्षिततेकरितां आला होता. डोळ्यांचा डॉक्टर म्हणून तो प्रसिद्ध होता.

चीनमध्यें गेल्यावर प्रत्येक परदेशी इसमास चिनी नांव धारण करावें लागतें. नाहीं तर व्यवहारांत फार अडचणी येतात.

त्याप्रमाणें डॉ. अतुल अॅन–ते–हॅा, चोळकर चो–के–हॅा, कोटणीस को–ते–हॅा, मुकर्जी मु–के–हॅा, आणि बसू बा–सू–हॅा. 'हॅा' या शब्दाचा अर्थ फूल आणि चीन असा दुहेरी होतो. शिवाय 'हॅा' हा शब्द चीनला ते जी मदत करायला आले होते, तिचें महत्त्व दर्शविण्याकरितां वापरीत असत.

येनानला जाण्यासाठीं डॉक्टर थांबले होते. पण तयारी पूर्णपणें न झाल्यानें त्यांनीं म्युनिसिपल आणि रेडक्रॉसच्या हॉस्पिटलमध्यें काम करण्यास सुरुवात केली. हॉस्पिटलची व्यवस्था अगदीं चोख होती. काम जवळजवळ कांहींच नव्हतें म्हटलें तरी चालेल.

लवकरच जपानचे हल्ले सुरू झाले. हँकोंत त्यांनीं आपले विमानतळ ठोकले होते. लोकांत गोंधळ माजविण्याचा आणि दळणवळणाचे मार्ग उध्वस्त करण्याचा त्यांचा विचार होता. या वेळपर्यंत चुंकिंगच्या जगप्रसिद्ध निवाऱ्याच्या जागा बांधून झाल्या नव्हत्या. त्यामुळें प्रत्येक हल्ल्यांत भयंकर मनुष्यहानि व्हायची.

ता. १५ जानेवारीला सुंदर सूर्यप्रकाश पडला होता. हवेंत थोडासा गारठा होता. पण मागील आठवड्यांत सूर्यप्रकाशाचें दर्शनच झालें नसल्यामुळें या दिवशीं लोक बाहेर पडले होते., वातावरण आनंदी होतें; पण त्याच दिवशीं जपानी विमानांची धाड आली. असा भयंकर क्रूर हल्ला आज पहिल्यानेंच डॉक्टर अनुभवीत होते. आगीचा जणूं वर्षाव होत होता. डॉक्टर एका हॉटेलांत बसले होते. हल्ल्याला सुरुवात झाली, " किंचाळणारे बॉम्ब " खालीं येऊं लागले. इमारती धडाधड कोसळूं लागल्या. विमानविध्वंसक तोफांची सरबत्ती सुरू झाली. जपानी विमानांना हाकलून देण्यास निघालेल्या चिनी विमानांची घरघर मधूनच ऐकूं येई. क्षणाक्षणाला बॉम्ब खालीं पडत; पण नशीब हें कीं, डॉक्टर ज्या हॉटेलांत बसले होते, तिथें अजून बॉम्ब पडला नव्हता. इतक्यांत हॉटेलपासून थोड्याच अंतरावर बॉम्ब पडला. सबंध इमारत हादरली. मुलें जोरानें किंचाळलीं. मोठ्या शूर हृदयाचासुद्धां भीतीनें थरकांप झाला असता, असा तो प्रसंग होता.

आणि पुढच्याच क्षणाला दुसरा एक बॉम्ब हवेंतून किंचाळत खालीं आला. सबंध इमारत पायापासून हादरली. खिडकीच्या कांचा खोलींत फेकल्या गेल्या. टेबलावरचीं ग्लासें, कपबशा जमिनीवर पडून खळाखळ फुटल्या. भिंतीचा चुना निखळून पडला, आणि उघड्या खिडक्यांतून धुराचे व धुळीचे लोटचे लोट आंत आले. खोली कसल्यातरी उग्र दर्पानें भरून गेली. कांहीं तरी जळत होतें. जिकडे तिकडे अगदीं सामसूम होतें. 'सब ठीक' चा इषारा झाला मात्र, प्रत्येकजण बाहेर काय धूळधाण उडाली आहे तें पाहायला धांवला.

हॉटेलपासून वीस-पंचवीस फुटांवरची इमारत पार कोसळून गेली होती. माती–विटांचा जंगी ढीग तिथें पडला होता. ‘ थोडक्यांत चुकलें. तोच बॉम्ब जर हॉटेलच्या इमारतीवर पडता– ’ असा विचार डॉक्टरांच्या मनांत आला. भीतीची क्षणिक लहर वेगानें त्यांच्या शरीरांतून चमकून गेली.

हे विचार करीत उभे राहायला डॉक्टरना वेळ होता कुठें ? लगेच ते ए. आर. पीच्या लोकांना मदत करण्यास धांवले. त्यांना जीं दृश्यें दिसलीं, तीं फार करुणास्पद होतीं. बहुतेक सारीं बायका-मुलेंच होतीं. हल्ला दिवसाचा झाला होता. पुरुषमाणसें कामावर गेलेलीं. हॉटेलजवळची जी इमारत पडली होती, त्या एका इमारतींतच दोनशें माणसें दगावलीं. एका बॉम्बचा हा प्रताप. जिकडे तिकडे हातपाय तुटलेलीं, चेहरे रक्तानें भरलेलीं, छातीच्या चिंधड्या उडालेलीं, डोळे फुटलेलीं प्रेतें पडलीं होतीं. मातीचा ढीग उकरून काढतांना एक दृश्य दिसलें, तें किती हृदयविदारक होतें ! आईच्या स्तनाला तोंड लावून दूध पीत असलेलें एक बालक ! त्या दोघांना तशा स्थितींत बाहेर काढण्यांत आलें. बॉम्बच्या जबरदस्त धक्क्यानें त्यांना जागच्या जागीं मृत्यु आला होता. जखमी लोकांना तावडतोब हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. त्या दिवशीं शस्त्रक्रिया करण्यांत, जखमा बांधण्यांत, काटाकाटी करण्यांत डॉक्टरांची सबंध रात्र निघून गेली. हँको, कॅंटन, इचांग येथील हल्ले त्यांनीं पाहिले होते; पण अग्नीचें आणि रक्ताचें असें भयंकर **उग्र स्वरूप** पहाण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती.

मृत्यूशीं झगडण्याची वेळ आली, कीं आयुष्याला नवीन वळण लागतें. मनुष्य बेफिकीरीनें राहूं लागतो. अशा उग्र स्वरूपाचे बॉम्बहल्ले होत असतांना जीविताचा भरंवसा कोण देऊं शकेल ? चिनी वैमानिक हॉटेलांत डॉक्टरनां दिसत ते अगदीं मजेंत गप्पागोष्टी मारतांना. बिलियर्ड खेळतांना, अगदीं, हंसत-खिदळत असायचे. कोणी सांगावें ? कदाचित् दुसऱ्या दिवशीं जपानी हल्ल्याशीं झुंज देत त्यांच्या जीविताचा शेवट होणें अगदींच असंभवनीय नव्हतें. अशा धकाधकीच्या काळांत जीवनाला कांहीं अर्थच उरला नाहीं. जिथें युद्धाच्या ज्वाळा भडकल्या होत्या, तिथें तिथें प्रत्येक माणूस अशा आनंदी बेफाम़पणानें वागत होता.

एक दिवस डॉ. बूंगबरोबर आपले डॉक्टर ‘ पांच वर्षांपूर्वीचें शांघाय ’ हें नाटक पाहायला गेले. रात्रीं आठला खेळ सुरू झाला तो एक वाजतां सुटला.

नाटकाची सजावट अगदीं साधी होती. कामगार-विभागांतील दोन मजली चाळीचें दृश्य होतें. गोष्टदेखील अत्यंत साधी होती. " दोघे मित्र असतात. एकाचें लग्न झालेलें असतें. पुढें तो मँचुरियाला जातो. जातांना आपल्या मित्राला बायकोची व लहान मुलाची काळजी घेण्यास सांगतो. पुढें मँचुरियांत जपानकडून तो पकडला जातो. पांच वर्षांच्या तुरुंगवासाची त्याला शिक्षा होते. इथें त्याच्या बायकोला आणि मित्राला त्याची कांहींच बातमी मिळत नाहीं. त्यांना वाटतें, तो मेला. दोघांनाही त्याची आठवण होत असते; पण या दीर्घ अवधींत दोघांचें प्रेम जमतें आणि तीं एकत्र राहूं लागतात. कांहीं दिवसांनीं तो परत येतो. या दोघांना तें माहित नसतें. त्या दोघांना सुखांत पाहून, त्या सुखाआड येणें याला अयोग्य वाटतें आणि पुन्हां तो जपानबरोबर लढण्यासाठीं सैन्यांत दाखल होतो—" अभिनय उत्कृष्ट होता. संवादांत चातुर्यानें स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना खेळविली होती. एकसारख्या टाळ्या पडत होत्या. क्षणाक्षणाला जपानविषयीं तिरस्कार उत्पन्न व्हावा, अशी पार्श्वभूमि होती.

एकदां डॉक्टर संध्याकाळचे फिरून परतले. खोलींत शिरतांच टेबलावर पत्रें पडलेलीं दिसलीं. तीं प्रत्येकाच्या घरून आलेलीं पत्रें होतीं. सारेच टेबलाकडे धांवले; पण कोटणीसांना विसरले. शेगडीजवळ निमूटपणें कोटणीस बसले होते. गालावरून अश्रू ओघळत होते. त्यांच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी, त्या नुकत्याच आलेल्या पत्रावरून त्यांना समजली होती.

फार शोककारक घटना होती ती! कोटणीसांचे वडील सोलापूरच्या मिलमध्यें कारकून होते. मुलाचा मेडिकल कॉलेजचा खर्च त्यांनीं कर्ज काढून केला होता. कोटणीसांना याची कांहींच माहिती नव्हती. वडील मात्र मनांत आशा बाळगून होते, कीं मुलगा परीक्षा पास झाला कीं, कर्ज काय हां हां म्हणतां फेडून टाकूं. इतक्यांत द्वारकानाथ आपल्या पथकाबरोबर चीनला आले; पण या असामान्य स्वातंत्र्यप्रिय त्यागी गृहस्थानें मुलाच्या योजनेंत मुळींच व्यत्यय आणला नाहीं. किती उज्ज्वल स्वार्थत्याग हा! उलट मुलाला आशीर्वाद देऊन म्हटलें होतें—" मला मोठा अभिमान वाटतो कीं, माझ्या मुलाला आज एका महान् पथकाबरोबर जाण्याचा मान मिळत आहे!—" पण कोटणीस चीनला आल्यानंतर घरची आर्थिक परिस्थिति जास्त गंभीर झाली आणि ती सहन करणें अशक्य होऊन या गरीब वृद्ध गृहस्थानें आत्महत्त्या केली.

आंतड्याला पीळ पाडणारें हें एक सामाजिक करुण सत्य होतें. कोटणीसांच्या मनावर याचा काय परिणाम झाला असेल तें कल्पनेनेंच जाणणें बरें. हिंदुस्थानांत त्यांची आई होती. बहीण होती. पथकांतले चौघे डॉक्टरसुद्धां हतबुद्ध झाले. त्यांची परिस्थिति मोठी बिकट झाली. कोटणीसांना ते हिंदुस्थानांत परत जाण्याचा आग्रह करूं लागले.

पण अशा आणीबाणीच्या वेळींही कोटणीस आपल्या ध्येयाला जागले. ते म्हणाले, " मी परत जाणार नाहीं. कॉंग्रेसनें आपणांसच पाठविलें आहे आणि एक वर्ष पुरें झाल्याशिवाय आपल्यापैकीं कोणालाही परत जातां येणार नाहीं-तशा करारावर आपण सह्याही केल्या आहेत. माझ्या वडिलांनीं माझ्याकरितां अतुल स्वार्थत्याग केला आहे. तेव्हां आतां माझेंही हेंच कर्तव्य ठरतें कीं, ज्या कारणाकरितां त्यांनीं आपलें जीवन दिलें, त्याच कारणाकरितां मीही आपलें जीवित देणें योग्य होईल—"

आणि खरोखरच यापुढें कोटणीस चिनी जीवनाशीं अधिकाधिक समरस होऊं लागले. दुःखी जीवांची सेवा उत्तम रीतीनें करतां यावी हेंच आतां त्यांचें एकमेव ध्येय होतें.

ता. २२ जानेवारीला पथक येनानला जायला निघालें. कोटणीसांचा म्लान चेहरा कसल्या तरी विलक्षण आनंदाच्या तेजानें विलसत होता. मृत्यूशीं झुंज द्यायला निघालेला वीर तो. हुतात्म्याचें जीवन त्याच्या नजरेपुढें चमकत होतें.

९

# THE AMAZING MR. ALLEY

" The only failure is failure to act."

MARSHAL CHIANG-KAI-SHEK.

" One can never give up hope in China, somehow. As soon as you feel that all is lost, some meteoric phenomenon like this appears and you realize again the immense vitality lying immobile in this vast notion."

—NYM WALES " in China Builds for Democracy."

" ......this fascinating experiment which had already achieved so much and which held so much promise for the future......the experience of China is of inestimable value to us and I am sure we can learn much from it."

—JAWAHARLAL NEHRU (Forword to " China Builds for Democracy." )

चुंकिंगच्या त्या हवाई हल्ल्यांत डॉक्टर जायला निघाले.

मृत्यूच्या भीतीपेक्षां आणखी एक वाईट गोष्ट आहे ती म्हणजे शंका. अशा भयंकर हवाई-हल्ल्यांत पुढच्या क्षणाला आपण जिवंत असूं हें कोणाला सांगतां येणें शक्य का होतें ? बॉम्बच्या एका तुकड्यानें शरिराच्या चिंधड्या न् चिंधड्या उडण्याचा संभव होता. रक्ताचा शिडकाव जमिनीवर सहज होणार होता; पण मृत्यूच्या या भीतीपेक्षां शंकांचा गोंधळ मनांत माजला कीं, त्या

गोंधळानें माणूस हजार वेळां मरतो आणि जिवंत होतो. विचारांचें–भावनांचें केंद्रीकरण संपूर्णपणें दैवाच्या हातीं देतों आपण.

शहरावर हल्ला होत होता. एका मोठ्या हॉटेलांत डॉक्टर आणि दुसरे दोनशें लोक गर्दीनें बसले होते. 'चॉपस्टिक' बाजूला पडल्या होत्या, सूप थंड होत होतें, भात व इतर पदार्थ गार होत होते. अशा वेळीं खाणें कुणाला सुचणार? पण अशी एक विलक्षण व्यक्ति त्या वेळीं त्या हॉटेलांत बसली होती, कीं सर्व लोक आश्चर्यानें त्या व्यक्तीकडे पाहत होते. मध्यम वयाचा तो गृहस्थ होता. मजबूत हाडापेराचा आणि करारी मुद्रेचा. त्याचे केंस किंचित पिंगट होते. त्याचें जेवण अगदीं संथपणानें चाललें होतें; जणूं बाहेर बॉम्बहल्ला चालला होता, तो याला ऐकूंच येत नव्हता.

आपल्या डॉक्टरांचेंही लक्ष या गृहस्थाकडे इतरांप्रमाणें गेलें होतें आणि त्यांना जास्त आश्चर्य वाटलें. याचें कारण म्हणजे जेवतां जेवतां तो जें वर्तमानपत्र वाचीत होता तें हिंदुस्थानांतील होतें. डॉक्टर पुढें गेले, तेव्हां त्यानें मान वर केली. डॉक्टरांच्याकडे पाहिलें. परत वर्तमानपत्राकडे पाहिलें आणि एकदम हंसत हंसत हात पुढें केला. त्या पत्राचें नांव 'बॉम्बे क्रॉनिकल.'

डॉक्टरांचे फोटो बॉम्बे क्रॉनिकलमध्यें प्रसिद्ध झाले होते. त्यांकडे पाहून तो म्हणाला, "माझं नांव 'रेवी ॲले'—आणि मला वाटतं तुम्हीं हिंदुस्थानांतले डॉक्टर–खरं ना?"

मग गप्पा सुरू झाल्या. डॉक्टर म्हणाले, "आम्हांला आश्चर्य वाटतं–बाहेर हल्ला चालू आहे आणि तुम्हीं इतक्या संथपणें जेवतां कसे?"

मोठ्या प्रसन्नतेनें हंसून ॲले म्हणाले, "असं सुन्दर जेवण फुकट जाऊं देणें मला आवडत नाहीं. कदाचित मी मेलों तर रिकाम्या पोटानं तरी कां मरूं?"

अशा विचित्र परिस्थितींत रेवी ॲले आपल्या डॉक्टरना भेटले. मूळचे ते न्यूझीलंडचे. पण आतां चीन हाच आपला मायदेश समजून चिनी लोकांच्या कल्याणाकरितां त्यांनीं आपलें सर्वस्व वाहिलें आहे. चिनी लोकांत रेवी ॲले "ॲ–ली" या नांवानें प्रसिद्ध आहेत. चिनी सहकारी संस्थांची मूळ कल्पना रेवी ॲलेंनीं काढली आणि ती पूर्णत्वास नेली. या सहकारी संस्थांच्या अप्रतिम यशाचें सारें श्रेय रेवी ॲलेंना आहे.

त्यांची आई स्त्रियांच्या हक्कांसाठीं झगडणारी न्यूझीलंडांतील एक प्रमुख स्त्री होती. कांहीं वर्षें ॲलेंनीं शेती केली; पण त्यांचें मन त्यांत रमेना. शेवटीं शेतें आणि मेंढ्या त्यांनीं विकून टाकल्या. साहसाची चटक त्यांच्या रक्तांत जन्मापासूनची होती आणि ते चीनला आले. चीनमधल्या क्रांतीविषयीं त्यांना आपुलकी वाटत होती. ते शांघायमध्यें आले. म्युनिसिपॅलिटीमध्यें त्यांना फॅक्टरीइन्स्पेक्टरची नोकरी मिळाली. आधींच त्यांना चीनच्या क्रांतीविषयीं, गरीब मजुरांविषयीं सहानुभूति; तेव्हां ही नोकरी म्हणजे त्यांचें आवडीचें काम करायला त्यांना उत्तेजन मिळालें.

कामगारांच्या निकट सहवासांत ॲले येऊं लागले. कामगारांना मिळणारें अपुरें वेतन, त्यांना वागविण्याच्या क्रूर पद्धति आणि ते रहात असलेल्या घाणेरड्या जागा पाहून ॲलेंचें हृदय कळवळू लागलें. यंत्रांशीं काम करतांना पुष्कळशा कामगारांना अपघात होत; पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यांत येई. कामगारांच्या हिताची एकही गोष्ट नव्हती. एकाद्याचा हात किंवा पाय जायबंदी होऊन तो निकामी ठरला, तर त्याला कामावरून कमी करण्यांत येई. त्यानें पुढें भुकें मरावें हाच मार्ग. कामगारांची ही दैन्यावस्था पाहून ॲलेंना स्वस्थ बसवेना. आपल्या अधिकाराच्या जोरावर जितक्या गोष्टी करतां येणें शक्य होत्या, तेवढ्या त्यांनीं केल्या. इतकेंच नव्हे तर कामगारांच्या हिताकडे ते अधिकाधिक लक्ष घालूं लागले. त्यांना आपुलकीनें ते मदत करूं लागले आणि लौकरच शांघायच्या कामगार वर्गाचे रेवी ॲले अत्यंत आवडते बनले. त्यांची वागणूक अत्यंत प्रामाणिकपणाची आहे. त्यामुळें कामगारवर्गाप्रमाणें फॅक्टरीचे मालक-सुद्धां त्यांना अतिशय मान देतात.

आपली वार्षिक रजा ॲले खेड्यापाड्यांत फिरून लहानसहान धंदे पाहण्यांत, चिनी लोकांची भाषा व विचार शिकण्यांत घालवितात.

१९२८–२९ च्या सुयानच्या दुष्काळाच्या वेळीं आणि १९३१ च्या यांगत्झेच्या पुराच्या अनर्थकालीं हजारों लोक निर्वासित झाले. घरेंदारें पार वाहून गेलीं होतीं. लोकांची दैना दैना उडाली. ॲलेंनीं या वेळेस फार परिश्रम घेतले. निराधार लोकांना पुष्कळ मदत केली. दुष्काळाच्या वेळीं पुष्कळ लोक मेले. बालकें पोरकीं झालीं. ॲलेंनीं दोन निराश्रित मुलें आणलीं. आतां तीं त्यांच्याजवळच आहेत. तीं त्यांचीच मुलें म्हटलें तरी हरकत नाहीं.

१९३८च्या ऑगस्ट महिन्यांत ॲलेंनीं युद्धकालीन चीनमध्यें कांहीं औद्योगिक योजना आंखण्याचें ठरविलें. अमेरिकन व चिनी मित्रांबरोबर विचारविनिमय केला आणि सबंध देशांत " औद्योगिक सहकारी संस्था " काढण्याचें निश्चित केलें. मग काय विचारतां! उत्साही तरुण पिढीच्या चिनी इंजीनिअर्सनीं भराभर आपल्या जादा पगाराच्या नोकऱ्यांवर पाणी सोडलें आणि सहकारी संस्थांना मदत करण्यास ते धांवले. चिनी गव्हर्मेंटनें आणि बँकांनीं या योजनेस आर्थिक सहाय्य केलें. कार्याला प्रारंभ झाला, योजनेची दिशा खालीलप्रमाणें ठरविण्यांत आली—

[ १ ] देशांतील आंतल्या सुरक्षित भागांत मोठीं औद्योगिक केंद्रें उभारणें. तसेंच ज्या भागांत शत्रूपासून धोका आहे अशा भागांतही लहानशीं केंद्रें स्थापणें. तीं अशीं कीं, आणीबाणीच्या वेळीं चटकन खालीं करतां येतील.

[२ ] औद्योगिक क्षेत्रांत जपानची संपूर्ण नाकेबंदी करून, मोठीं यंत्रें [Machinery] न वापरतां चीनला औद्योगिक क्षेत्रांत स्वयंपूर्ण करणें.

[ ३ ] तसेंच निकामी शिपायांना, विधवांना आणि निर्वासित मुलांना व्यवस्थित राहतां येईल अशी व्यवस्था करणें.

औद्योगिक सहकारी संस्थेची ही योजना आंखतांना ॲले आणि त्यांचे सहकारी यांच्या मनांत आणखी एक मोठा उद्देश होता. तो म्हणजे खेड्यापाड्यांतील या औद्योगिक सहकारी संस्थांची जसजशी वाढ होणार होती, तसतशी दररोजच्या व्यवहारांत एकमेकांस सहाय्य करतांना सहजच लोकशाही तत्त्वांची त्या लोकांना ओळख होणार होती. स्वतःच्या कर्तृत्वावर त्यांचा अधिकाधिक विश्वास बसणार होता. ते अधिकाधिक धाडसी होणार होते आणि अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे जपानास विरोध करतांना आपण जागृत देशभक्त आणि चीन रिपब्लिकचे नागरिक म्हणून आपल्या अंगावर कोणती जबाबदारी आहे, याची त्यांना जाणीव होणार होती.

आपल्या डॉक्टरनां रेवी ॲलेच्या सहवासांत राहण्याची अमूप संधि मिळाली. त्यांचें स्वभाववैशिष्टय ओळखतां आलें. त्यांची कामगिरी पाहायला

मिळाली. कारण चुंकिंगपासून ॲले आपल्या डॉक्टरांबरोबरच प्रवास करीत होते. १९३८ मध्यें औद्योगिक सहकारी संस्थांची मुख्य कचेरी हँकोला बसविण्यांत आली; पण पुढें ती यांगतझेला न्यावी लागली. पुष्कळसे निर्वासित व यंत्रसामुग्री ईशान्येकडे रेल्वेनें आणण्यांत आली. आणि इथें मुख्य कचेरीची जागा निश्चित झाली. मध्यंतरीं ॲले, किआंगसी इथें सहकारी संस्था काढायची होती त्यांकरितां कर्ज मिळविण्यास कँटनला गेले. आग्नेयेकडे मुख्य कचेरी बसवायची होती, हुनान व कांगसी प्रांतांत शाखा काढायच्या होत्या. जपानचा हल्ला चालूच होता; तो चुकवीत चुकवीत ते डिसेंबरच्या अखेरीस चुंकिंगला परत आले. पथक ईशान्येकडे जायचें होतें. ॲलेही पथकाबरोबर निघाले आणि तें फार उत्तमच झालें. कारण ॲले चीनमधल्या सर्व पोटभाषा सफाईनें बोलतात. त्यामुळें मोटर ड्रायव्हरनां सूचना देतांना व इतर पुष्कळ अडचणींच्या वेळीं त्यांचा फार उपयोग झाला.

चुंकिंग सोडतांना डॉक्टरना कांहीं संकटांची व खडतर प्रवासाची आधींच माहिती देण्यांत आली.

(१) रस्ता अत्यंत बिकट, कांहीं ठिकाणीं पुढें जायला मार्गच नाहीं अशी परिस्थिति होती.

(२) शत्रूचे बॉम्बहल्ले एकसारखे चालू असल्यानें ही स्थिति झाली होती.

(३) सयान प्रांत अत्यंत धोक्यांत होता. तो जर शत्रूच्या हातीं गेला, तर ते नुसते येनानमध्येंच अडकून पडणार नव्हते, तर चुंकिंगपासून कायमचे अलग पडणार होते.

पण येनानमध्यें भयंकर रणकंदन चाललें होतें. वैद्यकीय मदतीची निकड तेथें जास्त होती. पराक्रमी आठवी पलटण व विलक्षण धैर्यानें लढणारे लाल गनिमी सैनिक येनानमध्यें होते. आणि म्हणूनच तेथें जायला डॉक्टर जास्त उत्सुक होते. 'जें आडवें येईल त्याला ठोकर द्यायची व पुढेंपुढें जायचें' हा त्यांचा ठाम निश्चय झाला होता.

चुंकिंगहून नानकिंगला जातांना डॉ. कोटणीसांचा एक मित्र डॉ. हॉग भेटला. नानकिंगच्या पलीकडच्या भागांत उसाचें पीक भरपूर होतें. जातांना भाताचीं शेतें आणि टेंकड्यांवर उसांचे मळेच मळे दिसतात. चीनमधला

अत्यंत सुपीक असा प्रदेश हाच; पण शेतकऱ्याचें दैन्य कांहीं कमी नाहीं; तें पाहिलें कीं हृदय पिळवटतें. सृष्टिमातेचें वैभव फक्त जमीनदारांनाच लुटावयाला मिळतें.

दोन दिवसांनंतरच्या कटकटीच्या प्रवासानंतर डॉक्टर चेंगटूला आले. तिथें चार दिवस त्यांना थांबावें लागलें. कारण ॲले तोंपर्यंत नवीन स्थापन झालेल्या सूत विणण्याच्या व कातण्याच्या स्थानिक सहकारी संस्थांची पाहणी करणार होते. हवेंत विलक्षण गारठा पडत होता. लोंकरीचे कोट डॉक्टरांच्या अंगावर चढले.

चेंगटू सोडल्यावर प्रसंग बिकट येऊं लागले. धोक्याचीं वळणें, बॉम्बनीं उध्वस्त झालेला रस्ता आणि हवेंतला गारठा. गारठा तर इतका वाटला, कीं हातांत दोन दोन लोंकरीचे हातमोजे घालूनही ऊब येईना. रात्र त्यांनीं एका गरीब शेतकऱ्याच्या झोंपडींत घालविली. त्या झोंपडीला वर छप्परही नव्हतें. गप्पागोष्टी करतांना ॲले त्या शेतकऱ्याला सांगूं लागले, "बुद्धाचा जन्म हिंदुस्थानांत झाला आहे—" पण तो साधाभोळा अज्ञानी शेतकरी ठासून म्हणाला "छे–छे–गौतमबुद्ध चिनांतच जन्मला—!"

दुसऱ्या दिवशीं थंडीचा कडाका विलक्षण पडला. रस्ताही अधिकाधिक बिकट होऊं लागला. झेशूनची सीमा ओलांडून ते शेन्सी प्रांतांत आले. रस्त्यावरील मैलांच्या खुणा रशियन व चिनी भाषेंत लिहिल्या होत्या. रशियन भाषेंत त्या कां लिहिल्या होत्या, तें डॉक्टरना कळेना; पण लवकरच त्याचा उलगडा झाला. पेट्रोल, औषधि साहित्य आणि इतर वस्तु घेऊन रशियन मोटरगाड्या समोरच्या दिशेकडून येत होत्या.

ती रात्र त्यांनीं हँचूंगमध्यें घालविली. 'हॅन्' राजांची ही राजधानी होती. चीनची प्रचंड भित हँचूंगभोंवतींच आहे. सहकारी संस्था इथेंही सुरू झाल्या होत्या आणि पुष्कळशा सुरू होणार होत्या.

Siaosuibu मध्यें डॉक्टरनीं ॲलेंची एक विलक्षण सहकारी संस्था पाहिली. इतर ठिकाणच्या संस्था कापड, ब्लँकेट्स्, चामड्याच्या वस्तु, विणण्या-कातण्याची यंत्रसामुग्री तयार करीत; पण ही विलक्षण संस्था चिनी सैन्याकरितां मशिनगन्स, बंदुका वगैरे तयार करीत होती.

प्रत्येक सहकारी संस्थेच्या डेपोंत व कारखान्यांत उत्साहाचें वातावरण पसरलें होतें. रेवी ॲलेची ' सहकारी संस्थांची योजना ' थोडयाच महिन्यांत कमालीच्या बाहेर यशस्वी झाली होती. संस्थेंत काम करणारे चिनी लोक मेहनती, तरतरीत आणि सामान्य गरीब जनतेपेक्षां स्वच्छ होते. तसेंच संस्थांच्या बाजूला वाचनालयें, शाळा आणि हॉस्पिटलेंही होतीं. कारखान्यांच्या व डेपोंच्या भिंतींवर पत्रकें चिकटविलेलीं दिसत. त्यावर घोषणा लिहिल्या होत्या—

( १ ) औद्योगिक सहकारी संस्था हींच खरीं कामगारांचीं दुकानें आहेत.

( २ ) औद्योगिक सहकारी संस्थांच्या सहाय्यानेंच जपानला बहिष्कृत करतां येईल.

( ३ ) स्वच्छता म्हणजे आरोग्य. उत्तम आरोग्य असेल, तरच चांगलें काम करतां येईल.

( ४ ) सहकारी संस्थेंत जे काम करतील त्यांनाच खायला मिळेल.

( ५ ) आमच्या घरादारावर एकदां बॉम्ब पडून तीं उध्वस्त झालीं, तर परत बांधूं. दहादां पडलीं तरी दहादां बांधूं.

पाऊशी शहरांत लूंघाय रेल्वेनजीक चिनी औद्योगिक सहकारी संस्थेचें मुख्य केंद्र संघटित करण्यांत आलें होतें. त्याच्या आधीं लहान लहान सहकारी संस्थांमधून बूट, गणवेष, साबू, कपडे इत्यादि माल तयार होत होता. ही कामगिरी अत्यन्त कौतुकास्पद नाहीं का ? पण याचें श्रेय तेथील एक न्यायाधीश मि. वँग-फेंग जुई यांना दिलें पाहिजे. कारण त्या संस्था संघटित करण्याकरितां त्यांनीं फार परिश्रम घेतले. वँग मूळचे मँचूरियाचे. जपानी हल्ला झाल्यानंतर ते पाऊशीला आले होते. येथें आपल्या डॉक्टरांचें स्वागत करण्यांत आलें. सभेला जवळजवळ पांच हजार लोक होते. बहुतेक सैन्यांतील शिपाई होते.

पाऊशीस आल्यावर डॉक्टरना कळलें कीं, पेट्रोलचा सांठा संपला आहे. नाइलाजानें त्यांना मोटरींतून उतरून सयानची गाडी गांठावी लागली. रेल्वे वाहतुकीचा एवढाच मार्ग चीनच्या ताब्यांत राहिला होता. डब्यांना बंदुकीच्या

गोळ्यांच्या वर्षावानें. भोकें पडलीं होतीं, तरी आंतील व्यवस्था बरी होती. संध्याकाळच्या सुमारास गाडी सयानला आली. शेन्सी प्रांताची ही राजधानी.

१९३७ मध्यें साऱ्या जगांत सयानचें नांव गाजत होतें. चीनच्या इतिहासांत हें नांव अजरामर राहील. कारण इथूनच चँग–कै–शेकनीं आपल्या जपानविरोधी मोहिमेला सुरुवात केली आणि चिनी कम्युनिस्टांवर उपसलेलें अघोरी शस्त्र खालीं ठेवलें. सयानच्या " गेस्ट हाऊस " मध्यें डॉक्टरनीं आपला मुक्काम ठोकला. याच " गेस्ट हाऊस " मध्यें चँग–कै–शेक आणि त्यांच्या सहकाऱ्यांना कैद करण्यांत आलें होतें.

पुढें येनानला जातांना " बॉर्डर–गव्हर्नमेंट " चे चेअरमन " लिन—पै—चू " डॉक्टरना भेटले. सन—येत—सेनचे जिवलग दोस्त आणि अनुभवी क्रांतिकारक म्हणून त्यांचा लौकिक आहे. कोमिंटांगचे एक संस्थापक व पार्टींतील एक प्रमुख व्यक्ति म्हणून १९२७ पर्यंत त्यांना मानाचें स्थान होतें. चँग–कै–शेकबरोबर मतभेद झाल्यावर ते किआंगसीला येऊन कम्युनिस्टांना मिळाले. आतां परत त्यांना कोमिंटांगच्या मध्यवर्ति कायदेमंडळांतील सभासदत्व देण्यांत आलें आहे.

लिन–पै–चूंनीं आठव्या पलटणीचें ऐतिहासिक महत्त्व डॉक्टरना समजावून दिलें. त्याचा आशय असा होता कीं, " आठवी पलटण आज सेंट्रल गव्हर्नमेंटची पलटण असून चँग-कै-शेकच्या हुकमतीखालीं जपानविरोधी लढा लढत आहे. हें खरें असलें, तरी निव्वळ चीनच्या स्वातंत्र्याकरितां ती लढत नसून जगांतील साऱ्या पिळल्या जाणाऱ्या राष्ट्रांसाठीं ती लढत आहे. त्यांतल्या त्यांत पूर्वेकडील पारतंत्र्यांत पडलेल्या राष्ट्रांसाठीं तर खात्रीपूर्वक आणि म्हणूनच सर्व साम्राज्यशाही राष्ट्राची आठवी पलटण संपूर्णपणें शत्रु आहे, असें मानायला तुम्हांला कांहींच हरकत नाहीं. "

नंतर सयानच्या आठव्या पलटणीच्या मुख्य केंद्रांत डॉक्टरांचें स्वागत करण्याकरितां एक सभा भरली. डॉ. अतुलनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीची हकीकत सांगितली. नंतर राष्ट्रीय गाण्यांनीं व इतर नेहमींच्या कार्यक्रमांनीं सभा संपली.

पुढें डॉक्टर येनानला गेले. तेव्हां त्यांना समजलें, कीं सैनिकाच्या वेषांत त्यांच्यापुढें हजार वेळां आलेले—त्यांच्याबरोबर बोललेले लिन-पै-चू हे पुरुष नसून ती एक स्त्री होती.

चेंगटू व सयान येथें थंडी होती; पण डॉक्टरना ती बाधली नव्हती. शेन्सी प्रांतांतली थंडी मात्र विलक्षण. टेकड्या बर्फानें आच्छादून गेलेल्या. रस्त्याच्या दोन्ही बाजू बर्फानें भरून गेलेल्या. फार काय, टेलिफोनच्या तारासुद्धां बर्फानें पार झांकून गेल्या होत्या. जणूं काय पांढऱ्या शुभ्र फुलांच्या माळाच कुणी तरी टांगल्या होत्या !

लोच्नूनला एका मिलिटरी शाळेंत रात्रींच्या मुक्कामास डॉक्टर राहिले. सकाळीं ते उठले तेव्हां त्यांच्या बाटल्यांतील पाण्याचें बर्फ झालें होतें !

थोड्याच अवधींत ते ' कम्युनिस्टांच्या राज्यांत ' आले. सगळीकडे विस्तीर्ण पठारेंच्या पठारें पसरलेलीं आहेत. लोक गरीब दिसत होते; पण कसल्या तरी तेजाचे उत्साही किरण प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चमकत होते. घरांदारांवर चँग—कै–शेक, मा–से–तुंग आणि चू–ते यांचीं चित्रें लावलीं होतीं. त्याखालीं निरनिराळ्या रंगांत घोषणा लिहिल्या होत्या.

या भागावर अत्यंत उग्र स्वरूपाचे हल्ले झाले होते. जगांत कोणत्याही शहरावर इतक्या भयानक स्वरूपाचे हल्ले झालेले नाहींत. डॉक्टर शहरांत शिरतात न शिरतात तोंच जपानी विमानांची टोळधाड आली. बहुतेक भाग बेचिराख झालाच होता; तरी-पण हल्ले चालू होतेच. नेहमींची एकादी गोष्ट करावी त्याप्रमाणें डॉक्टर संथपणें ट्रकमधून खालीं उतरले आणि बर्फाच्छादित खंदकांत सुरक्षिततेसाठीं गेले.

हा हल्ला किती विलक्षणपणें होत होता ! एक प्रकारें डॉक्टर येनानला आले त्यासाठीं त्यांचें स्वागत करण्याची तर जपान्यांची ही विचित्र तऱ्हा नव्हती ना ?

# १०

## WITH THE 'REDS' IN YENAN

" The road to Yenan is for China's youth the road to life."
—LO HSUN

फेब्रुवारी १२ पासून ता. ४ नोव्हेंबर १९३९ पर्यंत जवळजवळ नऊ महिने आपल्या पथकानें येनानमध्यें घालविले.

हे चार महिने अत्यंत महत्त्वाचे गेले असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण चीनचें अंतरंग पथकाला अगदीं जवळून न्याहाळतां आलें. अजिंक्य चिनी कम्युनिस्टांची जपानबरोबर मोठ्या चतुराईनें झुंज देण्याची तऱ्हा, मॉ–त्से–तुंगसारखे महान् पुढारी आणि लढाईच्या ऐन धुमश्चक्रींतदेखील लोकांची संस्कृति वाढविण्याची तळमळ हें सर्व पाहतां आलें. हे महिने डॉक्टर डोंगरांत खोदलेल्या गुहांतून राहत होते. आणि येनानमधील बहुतेक सर्वच लोक अशा तऱ्हेनेंच दिवस काढीत होते. येनान सोडतेवेळीं या गुहेंत राहण्याच्या जीवनाची त्यांना इतकी संवय जडली होती, कीं खिडक्या असलेल्या एखाद्या उघड्या खोलींत त्यांना झोंपच येत नसे.

मे महिन्यांत डॉ. चोळकर हिंदुस्थानला परतले. तिथली ती भयंकर थंडी त्यांच्या वयोमर्यादेच्या मानानें त्यांना सहन होईना. दोन महिन्यांनंतर डॉ. मुकर्जींना मूत्रपिंडाचा विकार जडला आणि शस्त्रक्रियेसाठीं त्यांना हॉंगकॉंगला यावें लागलें. पण हॉंगकॉंगच्या अंतर्भागांत जाणें शक्य नव्हतें. दळणवळणाचे सर्व मार्ग बंद होते. शेवटीं ते हिंदुस्थानला आले. परत ब्रह्मी रोडनें ते चीनला जाणार होते. प्रकृति सुधारल्यावर त्यांनीं चीनकरितां औषध

व इतर साहित्याची मदत मिळविली; पण दुर्दैव असे कीं, ती घेऊन जात असतांना त्यांना रंगूनला ब्रिटिश पोलिसखात्यानें पकडलें. औषधें व इतर साहित्य जप्त करण्यांत आलें. चीनला जाणारी ही मदत जप्त कां करण्यांत आली तें अजूनपर्यंत एक कोडेंच आहे.

चीनमध्यें आतां तीनच डॉक्टर राहिले होते. नोव्हेंबर चारला हे तीन डॉक्टर येनान सोडून आघाडीवर निघाले.

येनानला आल्याबरोबर डॉक्टर ताबडतोब कामाला लागले. हॉस्पिटलांत व टी. बी. सॅनेटोरिअम्‌मध्यें त्यांना पाठविण्यांत आलें. पण परिस्थिति फार विकट होती. डॉक्टरांची उणीव होती. औषधें अपुरीं होतीं. बिछान्यावर चादरी अस्वच्छ होत्या आणि उपकरणांच्या अभावीं शस्त्रक्रिया फार विचित्र तऱ्हेनें कराव्या लागत. आपल्या पथकाजवळ जें साहित्य होतें, तें या वेळीं फार उपयोगी पडलें. आठव्या पलटणीच्या ताब्यांत सगळें साहित्य देण्यांत आलें. नंतर सर्व हॉस्पिटलमध्यें त्याची विभागणी करण्यांत आली.

आपल्या डॉक्टरनीं हॉस्पिटलच्या सुधारणा करण्याकरितां कांहीं सूचना केल्या. त्या ताबडतोब मान्य करण्यांत येऊन आठव्या पलटणीचें "आदर्श हॉस्पिटल" सुरू झालें. दोनशें नवीन बिछाने आले आणि सुव्यवस्थित रीतीनें हें हॉस्पिटल सुरू झालें. सर्व व्यवस्था आपल्या डॉक्टरांच्या हातीं देण्यांत आली. व ती इतक्या उत्तम रीतीनें पार पडत होती कीं, नांवाप्रमाणें खरोखरच हॉस्पिटल 'आदर्श' बनलें होतें. शहरापासून १५ मैलांवर एका गुहेंत हें हॉस्पिटल होतें. डॉ. बसू, कोटणीस आणि अतुल येथेंच राहत.

डॉ. चोळकर व मुकर्जी मेडिकल कॉलेजमध्यें शिकविण्याचें काम (दुभाष्याच्या मदतीनें) करीत होते. येनानपासून हें कॉलेज ८० मैलांवर होतें.

हॉस्पिटलचा कार्यक्रम आंखीव पण शिस्तींत चाललेला असे. सकाळच्या 'छोटया खान्यानंतर' डॉक्टर वार्डमध्यें फिरून आंतील रोग्यांना पाहत व जे उपचार करावयाचे त्याबद्दल सूचना देत. दुपारीं शस्त्रक्रिया करण्यांत येत. कारण फक्त याच वेळीं शस्त्रक्रियेच्या खोलींत प्रकाश असे. नंतर जेवण झाल्यावर थोडी विश्रांति घेण्यांत येत असे. विश्रांति होतांच बाहेरच्या रोग्यांना

तपासण्याची वेळ येई. दूरदूरच्या गावांहून लोक उपचारासाठीं येत. डॉक्टरांचें हें बाहेरचें खातें (out patient Dept.) फार प्रसिद्ध झालें होतें.

हल्लींचें हें 'मेडिकल कॉलेज' पूर्वी 'मेडिकल' स्कूल' होतें. अंतर्गत युद्धाच्या वेळीं कम्युनिस्टांचा सेंट्रल गव्हर्नमेंटच्या सैन्याशीं तीव्र लढा चालू होता. आणि त्याच वेळीं कम्युनिस्टांना किआंगसीपासून शेन्सीपर्यंत नाइलाजानें सहा हजार मैलांचें प्रदीर्घ ऐतिहासिक प्रयाण करावें लागलें; पण हें प्रदीर्घ कूच चालू असतांनासुद्धां या मेडिकल स्कूलच्या कार्यक्रमांत खंड पडला नाहीं. त्या अकरा महिन्यांत अभ्यासाचे पाठ चालूच होते. लेक्चरें दिलीं जात होतीं, इतकेंच काय, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, कूच चालू असतांना वर्ग घेतले जात होते. या अवधींत विद्यार्थ्यांच्या दोन तुकड्या पदवी–परीक्षासुद्धां उत्तीर्ण झाल्या.

येनान शहराची स्थिति मात्र फार विचित्र झाली होती. बहुतेक सर्व शहर बेचिराख झालें होतें. जपानीहल्ले अतिशय उग्र स्वरूपाचे झाले होते व अजूनही होत होते. कुठें तरी अधूनमधून एकाददुसरें घर उभें दिसे; पण तेंसुद्धां धड स्थितींत नसे. शहरांत एक माणूसही नव्हतें. तरी सुद्धां जपानी विमानें सतत हवाई–हल्ले करून आपले मौल्यवान बॉम्ब फुकट घालवीत होते. एकदां तर एक मजेदार प्रसंग घडला. जपानी विमानांनीं कित्येक टनांचे बॉम्ब खालीं टाकले आणि प्राणहानि झाली ती फक्त एका गाढवाची !

येनान शहराच्या डोंगराळ भागांत हजारों गुन्हा खोदल्या होत्या. शिवाय मोठमोठ्या दऱ्याखोऱ्यांच्या आसपास सुरक्षित जागेत विटांचीं लहानलहान घरें बांधलीं होतीं. या घरांना बॉम्ब हल्ल्यांची मुळींच भीति नव्हती. कारण वरून डोंगरांच्या उंच शिखरांचें छप्पर होतें. जगांत अशा तऱ्हेच्या विलक्षण निवाऱ्याच्या जागा कुठंही बांधल्या गेलेल्या नाहींत. जवळजवळ चाळीस हजार लोक येथें राहतात. जपान्यांच्या मार्गांत अडथळे आणण्याचे बेत येथेंच केले जातात आणि त्यांना हैराण करून सोडणाऱ्या आठव्या पलटणीचे शूर शिपाईही येथेंच राहतात. राजकीय आणि कायदेमंडळांचीं केंद्रेंही इथंच आहेत. हें केंद्र उत्तर चीनचें 'गनिमी सैनिकांचें राज्य' म्हणून प्रसिद्ध आहे.

सयान–घटनेपूर्वी चिनी कम्युनिस्ट पक्ष आणि सेंट्रल गव्हर्नमेंट एकत्र आले आणि सोव्हियट पद्धतीप्रमाणें नमुनेदार राज्यव्यवस्था इथें चालू झाली.

कम्युनिस्टांनीं आपलें स्वतंत्र अस्तित्व विसरून ते मध्यवर्ति लोकसत्ताक राज्यांत सामील झाले. त्यांचें सैन्य ( आतां ज्याला आठवी पलटण म्हणून ओळखतात तें ) सेंट्रल गव्हर्नमेंटला मिळालें; पण शेन्सी, कनसु व निंगसि या तीन प्रांतांत मात्र कम्युनिस्टांचीच सत्ता राहिली. या तीन प्रांतांचा कारभार समाजसत्तावादी पद्धतीनें चालला नव्हता; पण साधारण लोकशाही पद्धतीनें चाले. प्रौढांना मतदानाचा हक्क होता आणि गव्हर्नमेंटनें निवडून दिलेल्याच सर्व संस्था होत्या. बहुतेक पुढारी कम्युनिस्ट होते. पार्लमेंटमध्यें $\frac{1}{3}$ जागा कम्युनिस्टांना, $\frac{1}{3}$ कोमिंटांगला व $\frac{1}{3}$ इतर लोकांना राखून ठेवून संयुक्त आघाडीची आंखणी फार व्यवस्थित रीतीनें करण्यांत आली होती.

ही पद्धति ‘ बॉर्डर गव्हर्नमेंट ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. अशा तऱ्हेचीं तीन बॉर्डर गव्हर्नमेंट्स् चीनमध्यें आहेत. कम्युनिस्ट गनिमी सैनिकांची ही पद्धति निरुपम ठरली आहे. जनता, लोकशाही आणि हलके हलके समाजवादी पद्धतीनें जपान्यांच्या विरुद्ध लढायला उत्तम तऱ्हेनें संघटित होत आहे. जपान्यांनीं ‘ अमुक प्रांत आम्हीं संपूर्णपणें काबीज केले आणि तमुक प्रांतावर आमचें पूर्णपणें वर्चस्व चालतें ’ अशा कितीही बढाया मारल्या, तरी जनतेवर ‘ बॉर्डर गव्हर्नमेंट ’चेंच वजन जास्त आहे.

उत्तर चीनमधील सोव्हियट गव्हर्नमेंटचे माजी चेअरमेन आणि चिनी कम्युनिस्ट पार्टीचे सेक्रेटरी मॉ–त्से–तुंग ही चीनमधील एक अत्यंत थोर व्यक्ति आहे. पथक येनानला आलें त्या वेळीं मॉ-त्से-तुंग आणि इतर कम्युनिस्ट पुढारी पथकाचें स्वागत करायला आले होते. डॉक्टरनीं मॉ-त्से-तुंग बद्दल पुष्कळ ऐकलें होतें आणि ही महान् व्यक्ति पाहण्याची त्यांना फार उत्सुकता होती; पण स्वागत करायला आलेल्या त्या मंडळींतून मॉ-त्से-तुंग कोणते हें त्यांना ओळखतां येईना. शेवटीं कोणी तरी त्यांना सांगितलें “ ते पहा. ” साध्या सैनिकाचा गणवेष त्यांनीं घातला होता. अंगयष्टि सडपातळ आणि चेहरा उन्हातान्हांत राबलेल्या मनुष्याचा जसा राकट दिसतो, तसा होता. एकच गोष्ट विशेष होती; ती म्हणजे इतर मंडळीपेक्षां ते फार उंच होते.

नंतर कांहीं दिवसांनीं डॉक्टरना ते खोलींत, एका मोठ्या खोलींत भेटले. हवाई हल्ल्यांत मोठ्या विलक्षण तऱ्हेनें ही खोली सुटली होती. मॉ–त्से–तुंगची

पाहुण्यांना भेटण्याची ही ठराविक खोली होती. किरकोळ टेबलें आणि कांहीं खुर्च्या यांशिवाय खोलींत सजावटीचें कांहीं एक सामान नव्हतें. डॉक्टर त्यांना भेटायला गेले, तेव्हां मोठ्या प्रसन्न वदनानें मॉ-त्से-तुंगनीं त्यांचें स्वागत केलें. गांधी, जवाहरलाल नेहरू आणि हींदी कम्युनिस्ट पक्षाविषयीं त्यांनीं बरेच प्रश्न विचारले. राजकारणावर बरीच चर्चा झाली. डॉक्टरनीं आपल्याबरोबर हिंदी वृत्तपत्रें नेलीं होतीं तीं मॉ-त्से-तुंगना बक्षिस दिलीं. त्यांत कविवर्य टागोरांनीं जपानी कवि नागुजी याच्यावर कडक टीका करून जपानचें साम्राज्यधार्जिणें आणि प्रतिगामी स्वरूप उघडें केलें होतें.

डॉक्टरांना जेवणाचें आमंत्रण मिळालें आणि त्यांनीं तें स्वीकारलेंही. जेवण अगदीं साधें होतें. मॉ-त्से-तुंगना जेवण तिखट लागतें. मिरच्यांची पूड एका बशींत त्यांच्यापुढें ठेवलेली होती. ती ते भाजी व मांसाचे पदार्थांवर टाकून जेवण घेत होते. मध्येंच गप्पा सांगतां सांगतां ते म्हणाले, "चिनी व हिंदी लोकांची एकी होईलच. कारण दोघांनाही मिरच्या फार आवडतात."

नंतर पुष्कळ वेळां डॉक्टरांची आणि त्यांची भेट झाली. मॉ-त्से-तुंगच्या विनोदी स्वभावानें, साधेपणानें आणि बुद्धीच्या वैभवानें आपल्या डॉक्टरांच्या मनांत त्याच्याविषयींचा आदर दुणावला. एकदां डॉ. अतुल घोड्यावरून पडले आणि त्यांची बरगडी दुखावली. थोड्याच दिवसानंतर डॉ. बसू पडले आणि त्यांचा पाय मोडला. त्या पायाकडे पाहून मॉ-त्से-तुंग म्हणाले "हे घोडे फारच उत्तम. जिथं पाहिजे तिथं ते नेतात आणि पडण्याची तर मुळींच भीति नाहीं."

ऑगस्टमध्यें डॉक्टरनां एक तार आली. ती वाचून त्यांना अतिशय आनंद झाला. कारण पं. जवाहरलाल नेहरू लवकरच चीनला येत होते. मॉ-त्से-तुंग, चूते आणि पथकाला भेटण्याची त्यांची फार इच्छा होती.

येनानमध्यें ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. जिथें तिथें उत्साहाचें वातावरण खेळूं लागलें. मॉ-त्से-तुंगनीं लगच 'स्वागत-मंडळ' नेमलें. एक गुहा नेहरूंच्याकरितां खास राखून ठेवण्यांत आली. रंगकामाला सुरुवात झाली. विमानानें नेहरू येनानला यायला निघालेसुद्धां; पण ते चंगटूला आले आणि बातमी थडकली 'युरोपमध्यें युद्ध सुरू झालें.' तातडतोब नेहरूंना परत हिंदुस्थानांत बोलावण्यांत आलें. येनानमध्यें सर्वत्र निराशा पसरली.

महायुद्ध सुरू होऊन सहा दिवस झाले तरी डॉक्टर अंधारांतच होते. ता. १ सप्टेंबर रोजीं हिटलरी टोळीनें पोलंडची सरहद्द ओलांडली, पण सात सप्टेंबर रोजीं येनानहून 'आदर्श हॉस्पिटल'मध्यें दूतांनीं बातमी आणली 'महायुद्धाला सुरुवात झाली–'

याच वेळेस 'रेडस्टार ओव्हर चायना' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक 'एडगर स्नो' येनानमध्यें आले. डॉक्टर स्नो, आणि मा-त्से-तुंग युद्धाविषयीं चर्चा करीत होते. एवढयांत तुंग म्हणाले–"रेडिओवरून मात्र बातमी कळली आहे कीं, हिंदी कॉंग्रेसनें ब्रिटनला युद्धाच्या धोरणावर विचारविनिमय करून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल स्पष्टीकरण मागितलें आहे–"

येनानमध्यें एक प्रसिद्ध जपान-विरोधी युनिव्हर्सिटी डॉक्टरना पाहायला मिळाली. ही देखील गुहेमध्येंच खोदली होती. १९३९ मध्यें दोन हजार विद्यार्थी येथें शिक्षण घेत होते. शिवाय आणखी आठ हजार विद्यार्थी इतर खात्यांतून शिकत होते. पूर्वी चिनी सोव्हियट पद्धतीच्या वेळीं या युनिव्हर्सिटीला 'रेड अकॅडमी' म्हणत. त्या वेळीं इथें पक्षाच्या सभासदांना राजकीय शिक्षण देण्यांत येत असे. आतां या युनिव्हर्सिटीला 'जपान-विरोधी सैनिक व राजकीय युनिव्हर्सिटी' असें संपूर्ण नांव देण्यांत आलें आहे. सहा महिन्यांचा शिक्षणक्रम अत्यंत परिश्रमपूर्वक पुरा करावा लागतो. राजकारणाचा विषय जे घेतात, त्यांना लष्कराविषयीं थोडा अभ्यास आणि संघटना कशी करावी याबद्दल माहिती देण्यांत येते आणि जे लष्करी शिक्षणक्रम घेतात त्यांना राजकारणाविषयीं थोडा अभ्यास करावा लागतो. पदवी-परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी ज्याप्रमाणें शिक्षणक्रम घेतलेले असतील, त्या अनुषंगानें आठव्या पलटणींत ते अधिकारी होतात किंवा राजकीय कॉमिसार होतात.

अखिल चीनमधून शिक्षण घेण्याकरितां प्रत्येक भागांतून विद्यार्थी येथें येतात. कांहींना शेंकडों मैलांचा प्रवास करावा लागतो. कांहीं आईबापांना सोडून आलेले असतात. तर कांहींनीं सुखी आयुष्याला कायमचा रामराम ठोकून येथें धांव घेतलेली असते आणि या लोकांत सामान्य माणसेंच नव्हे, तर कवि, लेखक, पंडित व डाव्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगणारीं विचारवंत माणसेंही आहेत.

लोकांच्या संस्कृतीला योग्य वळण लावावें म्हणून 'लोकनाट्य' ( Peoples Theatre ) नांवाच्या संस्थाही येनानला आहेत. चांगल्या तत्त्वांचा प्रचार करून लोकांना शिक्षण देण्याच्या कामीं "लोकनाट्याचा" फार उपयोग होतो.

एकदां विद्यार्थ्यांतर्फे एक छोटा नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. नाटकाचें कथानक साधें होतें. प्रयोगांत आपल्या डॉक्टरांचीं पात्रें रंगविण्यांत आलीं होतीं. हिंदी डॉक्टर आणि चिनी परिचारिका आघाडीवर जखमी सैनिकांची शुश्रूषा करीत आहेत असा देखावा होता; पण पांचहि हिंदी डॉक्टरना लांब दाढ्या होत्या. तें पाहून डॉक्टरना हंसूं आलें. सर्वसाधारण चिनी इसमाला हिंदी माणूस दिसायचा म्हणजे शांघायमधल्या ब्रिटिश शीख पलटणींत. तेव्हां हिंदी इसम म्हटला कीं, त्याला लांब दाढी असायची अशीच कल्पना त्यांची झालेली असते; आणि त्याच भूमिकेवरून प्रयोगांतल्या हिंदी डॉक्टरांचीं पात्रें रंगविलीं होतीं.

अशा तऱ्हेचीं नाटकें, नाच व इतर करमणुकीचे कार्यक्रम करून सैनिकांना, खेड्यांतील अशिक्षित शेतकऱ्यांना व इतर लोकांना 'लोकनाट्य' संस्था राजकीय दृष्ट्या सतत जागृत ठेवीत असतात. देशांतील लोकांना अशा सुलभ रीतीनें शिक्षित करून देशाचें केवढें मोठें हित या संस्था साधित आहेत !

× × ×

जनरल चो-अेन-लेना एकदां अपघात झाला आणि त्यांच्या उजव्या खांद्याला दुखापत झाली. आपल्या डॉक्टरांशिवाय ते दुसऱ्या कुणाकडून उपचार करून घेत नसत. त्यांच्या गुहेंत जेव्हां डॉक्टर आले, तेव्हां चो-अेन-ले डाव्या हातानें लिहीत कामांत गुंग झाले होते.

डॉ. अतुल आपल्या कामांत फार हुषार होते; पण आणखी एका कलेंत ते फार निपुण होते. ती म्हणजे पाकशास्त्र. केव्हां केव्हां ते आपलें हिंदी पद्धतीचें जेवण करायचे. सर्वांना तें फार आवडायचें; पण मजा अशी झाली कीं, ही बातमी बाहेर फुटली. दूर–दूरच्या गांवाहून लोक येत आणि "आम्हांला हिंदी पद्धतीचें जेवण पाहिजे—" म्हणून आग्रह धरीत.

एके दिवशीं संध्याकाळीं फिरत असतांना डॉक्टर वाट चुकले आणि भलत्याच दिशेला गेले. इतक्यांत भाले, तलवारी, जुन्या तऱ्हेच्या बंदुका वगैरे घेऊन लोकांचा जमाव त्यांच्या दिशेकडे येत होता. डॉक्टर आश्चर्यचकित झाले! पण एवढ्यावर काय झालें होतें? त्या लोकांनीं डॉक्टरनां कैद करून खेड्यांत नेलें. चहा दिला आणि नंतर सोडून दिलें. मागाहून डॉक्टरना कळलें कीं, शत्रूचे हेर समजून त्यांनीं चुकीनें आपणांस पकडलें होतें. मुख्य केंद्राला फोन करून त्यांची खात्री पटली, तेव्हांच आपणांस चहा देऊन सोडण्यांत आलें. खेड्यापाड्याचें संरक्षण उत्तम रीतीनें व्हावें म्हणून प्रत्येक खेड्यांत असे गट संघटित केलेले असतात. जपानला कोणत्याही गांवांत स्थिर पाय रोवतां येत नाहीं, तो या संघटित गटामुळेंच.

आठव्या पलटणीचे सरसेनापति ' चु-ते ' यांची मुख्य कचेरी नैर्ऋत्ये-कडील शेन्सी प्रांतांतील कसँग खेड्याजवळ होती. चोळकर आणि मुकर्जी हिंदुस्थानांत परतल्यानें पथक आतां तीन डॉक्टरांचेंच होतें. लवकरच चु-तेनीं डॉक्टरना बोलावून घेतलें. शान्सी प्रांताजवळच्या आघाडीवर प्राणहानि बरीच झाली होती. तेथें वैद्यकीय मदतीची फार जरूर होती.

येनान सोडतेवेळीं तिघां डॉक्टरना स्पष्टपणें सांगण्यांत आलें कीं, " हा प्रवास फार धोक्याचा आहे. शत्रूनें काबीज केलेल्या कांहीं भागांतूनही जावें लागेल. " पण चिनी दोस्तांची सेवा करायला आलेले डॉक्टर भिणार कशाला? ते म्हणाले, " काय होईल त्याची आम्हांला पर्वा नाहीं. प्रवासाला आम्हीं तयार आहों. " अतुल आणि बसूंना आतां थोडथोडें चिनी समजूं लागलें होतें. कोटणीस मात्र सफाईनें बोलत.

येनानपासून वूसांग साधारणपणें तीनशें मैल आहे. एरवींच्या दिवसांत तेथें जायला चार–सहा दिवसांपेक्षां जास्त अवधि लागला नसता; पण शत्रूचे हल्ले होत असल्यामुळें परिस्थिति गंभीर झाली होती. सरळ रस्त्यानें जाणें मुष्किलीचें होतें. पूर्वेला जावें आणि धोका दिसतांच परत वळून पश्चिमेचा मार्ग धरावा, पुढें जावें तेथें संकट दिसावें; परत दुसऱ्याच मार्गानें कूच करावें. अशीं हजारों तऱ्हेचीं संकटें वाटेंत येत होतीं. अखेर सहा आठवड्यांनीं हा त्रासदायक प्रवास संपला.

येनानहून सयानला ट्रकमधून येतांना पथकाला एक झेक डॉक्टर भेटले. स्पेनच्या रणांगणावरून हे जाऊन आले होते आणि आतां आठव्या पलटणींत सामील होऊन चीनमध्यें काम करीत होते. इथें एक दुःखदायक बातमी डॉक्टरनीं ऐकली. ती म्हणजे कॅनडाचे डॉ. बेथून यांच्या मृत्यूची. गनिमी सैनिकांच्या भागांत हे काम करीत असत. त्यांना मरण मोठ्या विचित्र तऱ्हेनें आलें. अत्यंत निकडीची शस्त्रक्रिया करावयाची होती, आणि शस्त्रक्रियेच्या वेळीं जे रबरी हातमोजे चढवितात ते नव्हते; पण बेथून त्यासाठीं थांबले नाहींत. एकेक क्षण मोलाचा होता. बेथूननीं हातमोजांशिवायच शस्त्रक्रियेला सुरुवात केली आणि दुर्दैवानें घात केला! डॉक्टरांचें एक बोट जरासें कापलें होतें. सेप्टिक झालें. सबंध रक्तांत विष भिनलें. आणि सारा कारभार आटोपला. जातिभेद, पक्षाभिनिवेश या सर्व गोष्टींपासून दूर राहून हा निर्भय शूर वीर माणुसकीची खरी सेवा करीत होता. आठव्या पलटणीनें यांच्या स्मरणार्थ स्मारक उभारलें आहे.

सयानला आल्यावर गाडी पुढें तुगक्वानपर्यंतच गेली. पुढचे मार्ग बंद. शत्रु जवळपास वावरत होता. आणि गाडी पुढें गेली तर हल्ला होण्याचा निश्चित संभव होता. थोड्याच वेळांत हुकूम आला कीं, पुढचा ऐशीं मैलांचा प्रवास घोड्यावरून करायचा व नंतर गाडींत बसायचें; पण घोडे इतक्या मंदगतीनें चालत होते कीं, वूसांगला ते आले तेव्हां गाडी निघून गेली होती. ती रात्र त्यांनीं स्टेशनमध्यें उभ्या असलेल्या एका मालगाडींत घालविली. शत्रु त्यांच्यापासून फार तर दहाबारा मैलांवर होता; पण प्रवासानें ते इतके शिणले होते, कीं लवकरच त्यांना गाढ झोंप लागली. सकाळीं ते उठले, तेव्हां ते झोंपलेले होते ते डबे गाडीला लावण्यांत आले होते आणि त्या धक्क्यामुळें डब्यांत भरलेल्या गव्हांत आपले तिघे डॉक्टर अर्धेअधिक बुडून गेले होते!

पावसांतून आणि धुक्यांतून गाडी पुढें चालली होती. दुसऱ्या दिवशीं गाडी मिएनसीला आली आणि डॉ. बसूंना आपला ऊबदार गव्हाचा डबा सोडून बाहेरच्या भयंकर गारठ्यांत उतरावें लागलें; पण थंडींत इचांगला टेंकड्यांवर फिरण्याची त्यांना थोडी संवय होतीच. सामान खेचरांच्या पाठीवर चढवून डॉक्टर थंडींतून टेकडीवरचा मार्ग आक्रमूं लागले. हा भाग आठव्या

पलटणीचा आणि गनिमी सैनिकांचा म्हणून प्रसिद्ध होता. दळणवळणाची सोय फार उत्तम रीतीनं ठेवण्यांत आली होती.

थोडया थोडया अंतरावर लष्करी ठाणीं होतीं. तिथें पंधरा वीस शिपायांचा पहारा असे. अशा तऱ्हेनें मुख्य कचेरीला नव्हे तर गनिमी सैनिकांच्या गटालाही व्यवस्थित रीतीनें संदेश देतां–घेतां यावे, अशी योग्य आंखणी केलेली होती.

मिएनसीच्या पलीकडे पिवळी नदी (Yellow River) होती. ते दुसऱ्या किनाऱ्यावर आले. तिथें त्यांना दोन विरोधी दृश्यें पाहायला मिळालीं. एक अत्यंत करुण होतें, तर दुसरें मनांत प्रेरणा उत्पन्न करणारें होतें.

सेंट्रल गव्हर्नमेंटचे जखमी झालेले सैनिक पिछाडीकडच्या हॉस्पिटलमध्यें जात होते. कपडयांच्या चिंध्या झालेल्या, अंग धुळीनें माखलेलं. शिवाय जखमांतून रक्तस्राव झाल्यामुळें चेहरे फिके पडलेले. त्यांच्याकडे पाहिल्यावर कुणाच्याही डोळ्यांतून पाणी आलें असतें. डॉक्टरनीं लगेच रस्त्याच्या बाजूला 'छोटा दवाखाना' (Emergency Dressing Station) उघडला आणि उपचार सुरू केले. पुढें खेडयांत जीं दृश्यें दिसलीं, तीं पाहून तर अंगावर शहारे यायचे. हृदय फाटून जायची वेळ यायची. जपान्यांनीं अति अमानुषपणानें लोकांचे हालहाल केले होते. त्यांना केलेले शस्त्रांचे प्रहार अशा कांहीं रानटीपणानें व क्रूरतेनें केले होते, कीं ते पाहून डोळे पांढरेच व्हायचे. गांवांतलीं बहुतेक घरेंदारें जळून खाक झालीं होतीं. लोक डोंगर रानांत पळून गेले होते. गांवच्या मोठया चौकांत सांपळ्यांची व हाडांची रास पडली होती. कांहीं घरांदारांवर मशीनगन्सच्या गोळ्यांच्या स्पष्ट खुणा दिसत होत्या. गरीबगुरीब शेतकऱ्यांना अशा भयंकर रीतीनें मारण्यांत आलें होतें-

पुढें त्यांना तीस विद्यार्थ्यांचा गट भेटला. आघाडीवरून हे विद्यार्थी परत आले होते. आठव्या पलटणीच्या प्रचारखात्याचे हे विद्यार्थी. अठरापासून पंचवीस वर्षांपर्यंतचे युवक या गटांत होते. यांत मुलीही होत्या.

या गटाजवळ 'स्टेज' तयार करण्याची सामुग्री होती. तोंडानें वाजविण्याचीं साधीं वाद्यें, तंतुवाद्यें, ड्रम, गॅसचे दिवे, लहानशा कापडी पेटया आणि इतर वस्तुही होत्या. तीन महिन्यांच्या प्रचारक सफरीवरून ते नुकतेच परतले होते.

पिवळ्या नदीच्या तीरावर एक बुद्धाचें देऊळ होतें. तिथं या विद्यार्थि-गटानें खास प्रयोग करण्याचें ठरविलें. प्रयोगाला दोन–तीनशें लोक हजर होते. प्रेक्षक देवळाच्या अंगणांत बसले आणि स्टेज म्हणून देवळाचा प्रशस्त ओटा उपयोगाला आणला गेला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पांच–सहा तासांच्या अवधींत या विद्यार्थ्यांनीं छोटें प्रहसन लिहिलें आणि तें पण हिंदुस्थानच्या ब्रिटिशविरोधी झगड्यावर. हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत चिनी लोकही हिंदुस्थानला मदत करतील असा कथानकाचा भाग होता. कथानकांतील संवाद व गाणीं फार चातुर्यानें केलीं होतीं. थोड्या अवधींत लिहिलेलें तें छोटें प्रहसन तंत्राच्या आणि कलेच्या दृष्टीनें असामान्य होतें.

जपानी सैन्याविरुद्ध मिळालेल्या ताज्या बातम्या काव्य-स्वरूपांत ड्रमच्या साथींत सांगण्यांत आल्या. टाळी एकसारखी कडाडत होती. करमणुकीच्या द्वारें प्रभावी प्रचार करण्याची ही विलक्षण पद्धत पाहून एकीकडे आदराची व दुसरीकडे कौतुकाची भावना मनांत रुजली तर आश्चर्य तें काय ?

उत्तरेकडे ते चू–ने यांच्या मुख्य केंद्राकडे आले. येथें गनिमी सैनिक चातुर्यानें कसे हल्ले करता तें डॉक्टरना प्रत्यक्ष पाहायला मिळालें. खेड्यांतील प्रसिद्ध गनिमी–पुढारी ‘तेंग–से–लेन’ त्यांना भेटले. सबंध रात्र तेंग–से–लेन आपल्या डॉक्टरांबरोबर बोलत ( दुभाष्यामार्फत ) होते. पहिल्यानें ते एक साधे खेड्यांतील शेतकरी होते. शेतांत राबायचें, धान्य पिकवायचें आणि शांततेनें आयुष्य काढायचें; पण जपानी हल्ला सुरू झाला. संघटनेला आरंभ झाला. तेंग-से-लेननीं धडाडीनें त्यांत भाग घेतला. गांवचे लोक एकत्र येऊं लागले; पण हातांत शस्त्रें नव्हतीं. मग टेहळणी करून रात्रींच्या वेळीं जपान्यांवर ते अकस्मात हल्ला करायचे. शस्त्रें मिळालीं. लोकांना लष्करी शिक्षण मिळूं लागलें. हे हल्ले कसे केले जातात, त्यासाठीं कोणत्या युक्त्या कराव्या लागतात, तेंही डॉक्टरना त्यांनीं सांगितलें. कांहीं वेळां रस्ते उध्वस्त करावे लागत. कारण जपानी सैन्य दबा धरून बसलेलें असे.

प्रवासांत डॉक्टरना खेचरें दिलीं होतीं; पण त्यावर बसण्याचें धाडस कांहीं त्यांना होईना. कारण थंडी कडाक्याची होती. तेव्हां बसण्यापेक्षां चालत जाणेंच अधिक योग्य होतें. चढणीउतरणी लागत होत्या. खेंचरांच्या टापांचा कांहीं तरी विचित्र आवाज येत होता. म्हणून डॉक्टरनीं वाटेंतला एक दगड उचलला.

इतर दगडांपेक्षां हा फार जड होता. नंतर डॉक्टरना समजून आलें कीं, या भागांत लोखंडाच्या व इतर धातूंच्या खाणी आहेत. या भागांतील प्रत्येक खेड्यांत, आपल्या येथें विहिरी जशा प्रत्येकाच्या दारांत असतात तशा कोळशाच्या खाणी खोदलेल्या आहेत आणि कोळसाही उत्तम जातीचा मिळतो. शेन्सी प्रांतांत तर कोळशाच्या आणि लोखंडाच्या खाणी इतक्या विपुल आहेत कीं शंभर वर्षं सबंध जगाला हा प्रांत कोळसा व लोखंड पुरवील आणि या एकाच कारणानें जपानचा डोळा या भागावर फार होता; पण गनिमी सैनिकांच्या शौर्यामुळें त्यांचे सारे प्रयत्न फोल ठरले.

रात्रीं जनरल चू–ते यांच्या मुख्य केंद्राकडे पोंचण्याआधीं डॉक्टरना शत्रूच्या भागांतून जायचें होतें आणि हें काम कांहीं साधेंसुधें नव्हतें. पण आठव्या पलटणीचें आणि गनिमी सैनिकांचें या बाबतींत एक विशिष्ट तंत्र ठरून गेलें होतें.

दुपारीं विश्रांति घेत असतांना डॉक्टरना बोलावणें आलें. टेकडीच्या माथ्यावर गेल्यावर झोंपून दुर्बिणीच्या साहाय्यानें त्यांना शत्रूनें काबीज केलेला विभाग दाखविण्यांत आला. रात्रीं त्यांना याच धोक्याच्या मार्गानें जायचें होतें. मोटरीचा रुळलेला वांकडातिकडा रस्ता स्पष्टपणें दिसत होता. जपानी सैन्याच्या ट्रक्स हळूहळू चालल्या होत्या.

गनिमी सैनिकांनीं दोन खेडीं डाक्टरना दाखविलीं. दोन्हीं जपाननें काबीज केलीं होतीं. एका खेड्यांत ५० शिपाई होते व दुसऱ्यांत दीडशें होते. ही बातमी गनिमी हेरांनीं मोठा धोका पत्करून मिळविली होती आणि हेंच तर त्यांचें मोठें कौशल्य होतें. त्या दोन खेड्यांत एक मैलाचें अंतर होतें. खालून मधून–मधून तोफांचे आवाज येत होते.

रात्रीं ते निघाले. बाहेरच्या बाजूनें गनिमी सैनिक जपान्यांवर हल्ला करणार होते. इतक्या वेळांत डॉक्टरनीं व दुसऱ्या बरोबरच्या लोकांनीं आपल्या साहित्यानिशीं मधल्या वाटेनें कूच करायचें. दिसायला हा बेत किती साधा होता ! पण तो तितक्याच सुलभ रीतीनें पार पडणार होता का ?

प्रवासाला सुरुवात झाली. घोडे बरोबर घेतले नव्हते. कारण त्यांच्या टापांची शत्रूला चाहूल लागण्याचा संभव होता. सारें काम कमालीच्या शांत-

तेनें पार पाडायचें होतें. सावधगिरीही तितकीच बाळगायची होती. डॉक्टरांचें औषधी-साहित्य शेतकरी स्वयंसेवकांनीं खांद्यावर घेतलें होतें. एकशेंवीसचे असे दोन गट पाडण्यांत आले होते. एक गट आधुनिक शस्त्रसामुग्रीनें सिद्ध होता व दुसरा शेतकऱ्यांचा गट होता. त्यांच्याजवळ हातबॉम्ब, भाले, फावडीं, सुतार-कामाच्या करवती अशा तऱ्हेचें साहित्य होतें. टेकडीच्या पायथ्याशीं ते थांबले. चंद्र अजून मावळला नव्हता. जमिनीवर बर्फ पडलें होतें. चांदण्याचा प्रकाश सभोंवार पसरला होता. मध्यरात्रीनंतर थोडया वेळानें गट पुढें सरकला आणि थोडयाच वेळांत एकच गलका झाला. डाव्या उजव्या बाजूला आरडाओरड सुरू झाली. जपान्यांवर हल्ला झाला होता.

पुढें सरकण्याची वेळ हीच होती. टेकडीच्या पायथ्याशीं उभे असलेले आपले डॉक्टर व इतर लोक दोन्ही खेडयांच्या मधल्या रस्त्यानें चालूं लागले. प्रत्येकजण मुकाट्यानें चालला होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर गंभीरता आली होती. शत्रूच्या प्रदेशांतून ते चालले होते.

पण हें साहस एवढयावरच कुठें थांबलें होतें ! त्यांचा वाटाडया म्हातारा चिनी वाट चुकला आणि सबंध रात्र ते चालतच होते. टेकडया चढत होते. प्रवास संपतो कधीं असें होऊन गेलें होतें. पण मुक्कामाला पोंचण्याची मनाला आतुरता लागल्यामुळें त्यांना थकवा मात्र जाणवला नाहीं.

सकाळीं ९ वाजतां ते मुख्य केंद्राजवळ आले. तीस मैलांचा प्रवास करून त्यांचीं शरीरें पार थकून गेलीं होतीं. तिथेंच एका झोंपडींत त्यांनीं हातपाय पसरले. आणि ते गाढ झोंपीं गेले. तो सबंध दिवस त्यांनीं झोंपेंत घालविला. दुपारीं खेडयांवर उग्र स्वरूपाचा हल्ला झाला होता, त्याची त्यांना मुळींच दाद नव्हती. ते उठले तेव्हां हुकुम सुटला होता—" आगे कदम—"

# ११

## THE GUERILLAS STRIKE AT NIGHT !

" What are we fighting for ?"
" Defending our country."
" How old is our country ?"
" Four thousand years."
" What are we fighting against ?"
" Japanese Imperialism."
" What must we do when the enemy retreats ?"
" Attack."
" When only must we attack ?"
" By surprise and with superior numbers."
" What is our most important principle ?"
" Co-operate with the people."

—Chinese guerillas catechism quoted in Lin Yutang's novel, " A LEAF IN THE STORM."

वूसांग खेडयाजवळ ( उत्तर चीन ) एक झोंपडी अंधुकपणें दृष्टिपथांत येत होती. बाहेर चिनी आया दळत होत्या आणि बाजूला घोडे चरत होते. याच झोंपडींत जनरल चू–ते डॉक्टरना भेटणार होते. डॉक्टर झोपडीजवळ आले, तेव्हां एक वयस्क गृहस्थ दारांतच उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या. शिरोभाग मोठा होता आणि ओठ जाड होते. डॉक्टर झोपडीजवळ येतांच मोकळेपणानें हंसत त्यानें डॉक्टरांचें स्वागत केलें.

त्याचा तो साधा आणि कांहींसा अव्यवस्थित पोषाख पाहून डॉक्टरना वाटलें कीं, हा जनरलसाहेबांचा चपराशी असेल; पण जेव्हां त्याच्याबरोबर ते आंत गेले, तेव्हां त्यांना कळलें कीं त्यांचा कयास सपशेल चुकीचा होता. ज्यांनीं त्यांना आंत नेलें, तेच जनरल चू-ते होते.

ही झोपडी एका शेतकऱ्याची होती. भिंतीवर उत्तर चीनचे, आशियाचे आणि इतर देशांचे नकाशे टांगले होते. अर्धी खोली ' कँग 'नीं (मातीची शेगडी–आणि झोंपण्याकरितां व्यवस्था केलेली.) व्यापून टाकली होती. इतर सामान म्हणजे थोडया खुर्च्या, एक लहानसें टेबल–आणि एक दिवा होता. डॉक्टरांच्याबरोबर दुभाष्याच्या मदतीनें चू-ते पुष्कळ वेळ बोलत होते. तीन वर्षें जपानच्या बलिष्ठ सैन्याची लाट चू-तेनीं मोठया कौशल्यानें थोपवून धरली होती आणि ही कामगिरी कांहीं लहानसहान नव्हती; पण ही कामगिरी आपण गनिमी तंत्रानें कशी पार पाडली तें त्यांनीं डॉक्टरांना समजावून सांगितलें. वसाहतींतील लोकांनींही या तंत्राचा उपयोग केला, तर साम्राज्यशाही उथलून पडायला वेळ लागणार नाहीं असें त्यांचें मत दिसलें.

अनुभवाचें आणि गांभीर्याचें तेज त्यांच्या मुखावर दिसत होतें. हाताखालच्या लोकांबरोबर त्यांची वागणूक मोठया सौम्यपणाची होती.

जानेवारी एक तारखेला डॉक्टरांच्या स्वागताकरितां एक सभा भरली आणि त्याच दिवशीं चू-तेंचा वाढदिवस होता. चू-ते त्या दिवशीं फार सुंदर बोलले. भाषणाचा विषय ' हिंदुस्थान, चीन आणि सोव्हियट युनियन यांचा भविष्यकाल ' हा होता.

कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी डॉक्टरना आठव्या पलटणीच्या सर्व खात्यांची माहिती करून देण्यांत आली. त्या त्या खात्याचे प्रमुख डॉक्टरना घेऊन जात आणि सर्व गोष्टी समजावून देत. शिक्षणशाखेची कामगिरी पाहून डॉक्टर आश्चर्यचकित झाले. सर्व शिपायांना या शाखेतर्फे शिक्षण देण्यांत येतें. सुटीच्या दिवशीं सर्व शिपायांची सभा होते. त्यांत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विषयांवर चर्चा करण्यांत येते. शिपायांचे निरनिराळे गट पाडण्यांत आले आहेत. प्रत्येक गटाचें एक लहानसें वाचनालय व सायक्लोस्टाइलवर चालविलेलें वर्तमानपत्र आहे. लढाईवर शिपाई जातात, तेव्हां पुस्तक बरोबर नेतात. याचा परिणाम

असा झाला आहे कीं हे शिपाई नुसते यांत्रिक शिपाई नसून आपण कशाकरितां लढतों आहों आणि याचा फायदा काय याची त्यांना पुरती जाणीव आहे. अशा तऱ्हेचें राजकीय शिक्षण देण्याची प्रथा पूर्वी लाल सैन्याच्या वेळीं होती. तीच परंपरा आतां आठवी पलटण चालवीत आहे. पण पूर्वीचा वर्गकलह नष्ट होऊन आतां राष्ट्रहितासाठीं सर्व सामर्थ्य जपानविरोधी लढ्यांत केंद्रित करण्यांत आलें आहे.

आणखी एक शाखा डॉक्टरना फार आवडली. ती म्हणजे “ गनिमी वर्क डिपार्टमेंट. ” दहा शिपायांचा एक गट असतो. त्यांत एक दोघांना जपानी भाषा बोलतां येते. हल्ला करतेवेळीं हे लोक जपानी भाषेंत मोठमोठ्यानें घोषणा करतात. बंदुका आणि मशीनगन्सनीं हल्ला करतेवेळीं या घोषणांचा फार उपयोग होतो. पकडून आणलेल्या कैद्यांचे बौद्धिक वर्ग घेतले जातात. आणि त्यांना खरी परिस्थिति समजावून देण्यांत येते. अशा तऱ्हेनें शेंकडों जपानी आठव्या पलटणींत सामील झाले आहेत.

दोन आठवडे सारी माहिती आणि विश्रांति घेतल्यानंतर डॉक्टर कामाला लागले. शेतकऱ्यांच्या झोंपड्यांतच “ हॉस्पिटल–वॉर्ड ” होते. अशा शेंकडों झोंपड्यांत जखमी सैनिक होते. कडाक्याच्या थंडींतून सैनिकांना पाहण्याकरितां डॉक्टरना खेड्यांपाड्यांतून फिरावें लागे. आठव्या पलटणीबरोबर त्यांना जें अन्न खावें लागे, तें निकृष्ट दर्जाचें आणि जीवनतत्त्वांचा अंश अत्यंत कमी प्रमाणांत असलेलें असे. त्यामुळें लवकरच डॉ. अतुल यांची प्रकृति ढासळली. अंगांतील रक्त बिघडलें. अंगावर गळवें झालीं आणि मार्चमध्यें ते हिंदुस्थानांत यायला निघाले. जवळजवळ अठरा महिने ते सर्वजण एकत्र काम करीत होते. बसू आणि कोटणीसांचे ते जिवलग सहकारी होते. त्यांची उणीव दोघांना फार गंभीरतेनें जाणवली. पण युद्धाच्या वादळांत वैयक्तिक भावना, मैत्री आणि सारें बाजूला ठेवावें लागतें.

डॉक्टर ज्या हॉस्पिटलमध्यें काम करीत होते, तें आघाडीपासून फार दूर होतें. जखमी सैनिकांना येथें आणीपर्यंत दोनतीन दिवस लागत आणि वाटेंत जखमी सैनिकांची स्थिति फार गंभीर स्वरूपाची होई. कित्येक मृत्युमुखीं पडत अशा वेळीं कॅनडाचे डॉ. बेथून यांचे शब्द डॉक्टरना आठवत. ते

म्हणत. " जखमी सैनिकांची वाट पाहत बसूं नका. तुम्ही त्यांच्याकडे चला " डॉ. बसूंनीं ' फिरते दवाखाने ' संघटित केले होते. प्रत्येक गटांत एक डॉक्टर, एक असिस्टंट डॉक्टर, परिचारिका आणि औषधसाहित्य घेऊन बरोबर चालणारा स्ट्रेचर असे. आघाडीपासून दोन मैल अंतरावर हे दवाखाने असत. त्यामुळें जखमी सैनिकांना तावडतोब उपचार करण्यांत येई. मात्र या दवाखान्यांत काम करणाऱ्या मंडळींना क्षणाचीही फुरसत मिळत नसे, कारण एका ठिकाणाहून उपचार करून येऊन पांच मिनिटें झालीं नाहींत तोंच परत दुसऱ्या ठिकाणीं बोलावणें येई.

खास परवानगी काढून बसू आणि कोटणीस अशा फिरत्या दवाखान्यां-बरोबर काम करण्यास तयार झाले. एका सैन्याच्या तुकडीबरोबर त्यांना पाठविण्यांत आलें. भारी किंमतीच्या मशिनगन्स आणि इतर शस्त्रसामुग्री या तुकडीजवळ होती. प्रत्यक्ष हल्ले कसे करतात हेंही या दोघांना पाहायला मिळालें. क्षणाक्षणाला जखमी सैनिकांना घेऊन स्वयंसेवक येत. प्राथमिक उपचार झाल्यानंतर गंभीर स्वरूपाच्या जखमा नसल्यास सैनिकांना पिछाडीवरील हॉस्पिटलकडे पायीं यावें लागे; नाहीं तर स्ट्रेचरवर किंवा ॲम्ब्युलन्समधून पाठविण्यांत येई. काम करणारे शेतकरी स्वयंसेवक फार कळकळीनें काम करीत. जखमी सैनिकांना आघाडीवरून पाठीवर घेऊन येण्यापासून तों तात्पुरतीं हॉस्पिटलें उभीं करण्यापर्यंत ते सहाय्य करीत.

महिन्यानंतर डॉक्टरना ' वूटै 'ला ( शेन्सी-चाहार-होपे बॉर्डर रीजन ) जाण्याचा हुकूम आला. पूर्वी इथें डॉ. बेथून काम करीत होते.

एप्रिल महिन्यांत ते निघाले आणि पंधराशें मैलांचें अंतर कापून ' होपे-चाहार-शेन्सी बॉर्डर रीजनला ' सप्टेंबरला आले. एवढा वेळ लागण्याचें कारण शत्रूला चुकवून सुरक्षितपणें प्रवास करायचा होता. सबंध उत्तर चीन फिरून एक दिवस संध्याकाळीं ते पेकिंगला आले. तो जुलै महिना होता. रात्रीं पुढच्या प्रवासाला सुरुवात झाली. टेकडीवरून त्या अविस्मरणीय शहराचा भाग स्पष्टपणें दिसत होता. रात्रीची वेळ होती. सबंध शहरांत दिवे लागले होते. मोठा सुंदर देखावा होता. पण दुसऱ्याच क्षणीं तें स्वप्न विरलें. पेकिंग अतां चिनी लोकांचें कुठें होतें ? तिथलें पूर्वीचें जीवन, संस्कृति साऱ्या मंगल गोष्टी क्रूर जपान्यांच्या हातीं गेल्या होत्या.

प्रवास धोक्याचा होता, पण निरनिराळीं शहरें पाहायला मिळत. नवीन अनुभव येत. पर्वत ओलांडावे लागत. नद्यांतून जावें लागे. एकदां त्यांचा तळ एका शेतांत होता. शत्रु जवळपासच होता. वसू सिगरेट पेटवीत, पण काडी सिगारेटला लावण्याचा अवकाश, कीं डोक्यावरून सूं...सूं...करीत गोळी जाई.

खेडयापाडयांतून जातांना डॉक्टर तिथलीं हॉस्पिटलें पाहात. नवीन असतील त्यांना सूचना देत. सैनिकांना तसेंच गांवांतील इतर लोकांना औषधोपचार करीत; पण एक गोष्ट त्यांना स्पष्टपणें दिसून आली आणि ती म्हणजे—' जनता जागी होत होती ! '

गांवच्या वेशीजवळ मुलें पहारेकऱ्यांचीं कामें करीत होतीं. खेडयांतील पुरुष माणसांनीं ' संरक्षण-गट ' संघटित केले होते. ' छोटे शिक्षक ' ( Little Teacher ) मोठया उत्साहानें अशिक्षितांना शिकवीत होते. एक दिवस एका खेडयांत डॉक्टर आले. तेथें मोठया फळयावर खडूनें लिहिलें होतें— " कम्युनिस्ट आणि कोमिटांग यांची एकी झालीच पाहिजे—" डॉक्टरनीं त्याबद्दल विचारलें, तेव्हां त्यांना सांगण्यांत आलें कीं, त्या दिवसाचा तो धडा होता आणि तो शिकल्याशिवाय कोणालाही खेडयांतून बाहेर जायला मिळणार नव्हतें—आमच्या डॉक्टरना सुद्धां !

चीन जागा होत होता. त्यांत पुरुषच नव्हते, तर स्त्रियाही होत्या. पूर्वीच्या बारीक पायांच्या अजागळ स्त्रिया आतां अदृश्य झाल्या होत्या. राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां त्या प्रत्येक क्षेत्रांत वावरतांना दिसत होत्या. त्या साक्षरताप्रसार करण्यांत मग्न होत्या; इतकेंच काय, पण दिवसा घरगुती व्यवहार संभाळून रात्रीं गनिमी गटांत कामें करीत होत्या.

या प्रवासांत डॉक्टरांना गनिमी सैनिकांचे बरेच गट पाहायला मिळाले. जपानी सैन्यानें बांधलेले रूळ उखडून टाकणें हा गनिमी सैनिकांचा आवडता खेळ होता. या आवडत्या खेळामुळें मात्र त्यांचा भरपूर फायदा होई. हे उखडून लावलेले रूळ गनिमी सैनिक औद्योगिक सहकारी संस्थेकडे पाठवीत व त्यापासून बंदुका व इतर शस्त्रसामुग्री तयार होई.

चीनची प्रचंड ऐतिहासिक भिंत प्रथम डॉक्टरनीं पेकिंगजवळ पाहिली. ही भिंत फार रुंद आहे. ( एका वेळीं दोन मोटर-गाडया जातील इतकी ) चाळीस फूट उंच आहे. वाटेंत नद्या–डोंगर–दऱ्या इत्यादि अडथळे असतांना सुद्धां ही बांधली आहे. हें केवढें आश्चर्य !

पूर्वीच्या साम्राज्यकर्त्यांनीं शत्रूंनीं आंत येऊं नये म्हणून ही प्रचंड भिंत बांधली. आणि तिचा तसा उपयोगही झाला; पण ही भिंत बांधण्याच्या वेळीं मजुरांचे भयंकर हाल करण्यांत आले. घरादारांतून लोकांना बळजबरीनें ओढून आणून कामाला लावण्यांत आलें. पूर्वीच्या जुन्या गाण्यांतून आणि लोककथांतून अजूनही त्या करुण कथा ऐकायला मिळतात; पण आजच्या आधुनिक शास्त्रीय शोधांपुढें तिचा कांहींच उपयोग होत नाहीं. आजची चीनची 'प्रचंड भिंत' म्हणजे लोकांची प्रभावी संघटना. ही संघटना बळजबरीनें, जुलमानें झालेली नाहीं. स्वातंत्र्याकरितां प्राण पणास लावून उभी केलेली ही भिंत जपानी राक्षसांना कधींच फोडतां येणार नाहीं.

सप्टेंबरमध्यें चाहार प्रांतांत 'लियुआन' जवळ डॉक्टर आले. दोन नवीन वैद्यकीय गट तयार करण्याचा त्यांना हुकुम मिळाला होता.

बसू ज्या पलटणींत होते त्या पलटणीला डंगटूनॅपो नांवाच्या खेडयावर हल्ला करण्याचा हुकुम देण्यांत आला. चिनो गनिमी हेरांनीं मोठ्या महत्त्वाची गुप्त बातमी आणली होती. ती म्हणजे त्या खेडयांत नुसत्या मशिनगन्सनीं सज्ज असलेले जपानी होते. इतर कोणत्याही प्रकारचीं शस्त्रें किंवा तोफा त्यांच्याजवळ नव्हत्या. लगेच हल्ल्याची तयारी सुरू झाली. बसू आपल्या वैद्यकीय गटासह आघाडीपासून दोन मैल मागें तयार राहिले. सैनिक जखमी होण्याचा संभव होता. पंधराशें लोकांनीं गांवावर हल्ला केला. संबंध रात्र लढाई चालली होती. शिपाई जखमी होत होते. पहांटेच्या सुमारास जपानी मशिनगन्स थंडावल्या. जपान्यांनीं मुख्य केंद्रावर संदेश पाठवून 'दारूगोळ्याचा सांठा खलास' झाल्याचें कळवलें.

थोडयाच वेळांत 'छत्रीवाले जपानी' मदत घेऊन आले; पण वारा उलटया दिशेनें वाहत असल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला. चिनी सैन्यानें सर्व जपानी छत्रीवाल्यांना कैद केलें. पन्नास हजार काडतुसें, वीस रेशमी छत्र्या ( Parachutas ) आणि डमडम बंदुकीच्या गोळ्या मिळाल्या. या गोळ्या फार भयंकर होत्या. एकदां का ही गोळी शरीरांत गेली, की ज्या भागांत ती शिरते, त्या भागाच्या चिंधडया-चिंधडया होतात. आणि तो भाग कायमचा कापून काढावा लागतो; आणि पोटांत किंवा छातींत गेली तरी त्या माणसाची आशाच नको.

चिनी सैन्यापुढें टिकाव लागत नाहीं असें पाहून आणि मुख्य केंद्राकडून आलेली मदत चिनी गनिमी सैन्याच्या हातीं लागलेली पाहून जपानी शिपाई बेभान झाले. दारू पिऊन गांवांतल्या स्त्रियांवर त्यांनीं अत्याचार केले. जपानी साम्राज्यशाहीच्चीं गाणीं गाइलीं आणि शेवटीं अंगाभोंवतीं ब्लँकेट्स गुंडाळून 'हाराकिरी' 'हाराकिरी' (आत्महत्या) म्हणत आगींत उडया घेतल्या.

चिनी सैनिक गांवांत शिरले तेव्हां मोटरगाडया जळत होत्या. घोडे मरून पडले होते. जागोजागीं प्रेतें पडलीं होतीं. आपलें सैन्य गांवांत आलें आहे हें समजल्याबरोबर झोंपडयांतून गांवकरी बाहेर आले. इतके दिवस सहन केलेल्या दुःखाच्या खुणा त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें दिसत होत्या. कांहीं वयस्क गृहस्थांनीं आपल्या मुली उपचारासाठीं बाहेर आणल्या. त्यांतल्या कांहीं तर फारच अल्पवयी होत्या. त्यांच्यावर केलेले अत्याचार इतक्या भयंकर स्वरूपाचे होते, कीं डॉ. बसूंच्या अंगावर शहारे आले. निप्पॉनच्या या लोकांना योद्धे म्हणतां येईल का ?

लियुआनच्या विजयाची बातमी सगळीकडे पसरली. आजूबाजूच्या खेडयांतील लोक मोठ्या आनंदानें धांवत आले. मित्रांच्या भेटी झाल्या. सैन्याला भेटी मिळाल्या. मोठ्या आनंदांत तो दिवस गेला. शत्रूपासून सगळीं शहरें, गांवें, –खेडीं परत हिसकावून घेण्याची दुर्दम्य आशा जनतेच्या मनांत प्रखरतेनें प्रज्वलित झाली.

कोटणीस दुसऱ्या पलटणीमध्यें होते. त्या पलटणीनेंही दुसरें गांव अशाच तऱ्हेनें शत्रूकडून परत मिळविलें होतें. कांहीं दिवसांनीं डॉ. बेथूनच्या स्मरणार्थ बांधलेल्या फीपूंग येथील हॉस्पिटलमध्यें कोटणीस आणि बसूंची भेट झाली. दोघांनाही एकमेकांस पुष्कळ गोष्टी सांगायच्या होत्या.

लौकरच दोघां डॉक्टरांची ताटातूट झाली. कोटणीसांनीं चिनी भाषेवर उत्तम प्रभुत्व मिळविल्यामुळें त्यांना 'मेडिकल स्कूल' मध्यें शिकविण्याकरितां पाठविण्यांत आलें आणि बसूंची बदली येनानला झाली.

त्यांचीं दोन वर्षें सुखांत गेलीं होतीं आणि आतां ते एकमेकांपासून दूर जात होते. लवकरच हिंदुस्थानला परतण्याचा बेत करून त्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला.

पण—त्यांची भेट पुनः होणार होती का ?

# १२

## THE NEW GREAT WALL.

His name is already immortalised among
Those who have fought for human freedom in China

—"Edger–Snow writting about Chu–Teh

" The greatest lesson we have learned is that a people
Can fight victoriously with what resources it happens to have."

—General–Chu–Teh.

दोन महिन्यांच्या दीर्घ प्रवासानंतर बसू येनानला आले. जवळ जवळ ६०० मैलांचा रस्ता त्यांनीं पायांखालून घातला होता. हा प्रवास फार त्रासाचा झाला. ज्या गटांबरोबर ते प्रवास करीत होते, त्यांत निर्वासित स्त्रिया, मुलें होतीं. एकदां जपान्यांनीं सतत सात दिवस त्यांचा पाठलाग केला. पण त्यांच्याशीं झुंज देण्याऐवजीं ते पुढें पुढें जात होते. कारण झुंज दिली असती तर नाहक निर्वासित बायकामुलांचे प्राण धोक्यांत पडले असते. केव्हां केव्हां एकाद्या खेडयांत त्यांनीं मुक्काम ठोकला न ठोकला तोंच स्काउट वर्दी घेऊन येत, " शत्रु जवळ येतोय् " लगेच पांच दहा मिनिटांत पुढच्या प्रवासाची तयारी करावी लागे.

प्रत्येक खेडयापाडयांत सहकारी संस्था चालूच होत्या. पण दूरदूरच्या खेडयांत लहान प्रमाणावर उद्योगधंदे चालू होते. अशा लढाईच्या धामधुमींत आर्थिक पाया कमजोर होण्याचा फार संभव असतो. पण चिनी लोकांनीं प्रत्येक खेडयांतून लहान प्रमाणावर उद्योगधंदे

सुरू ठेवून, शेतकऱ्यांना दररोज लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा व्यवस्थित रीतीनें चालू ठेविला होता. औषधें आणि इतर वैद्यकीय साहित्य प्रथम प्रथम जपानी व्याप्त भागांतून मिळवून नंतर ते आपल्या हद्दींत गनिमी सैनिक आणीत. पण ह्या तंत्राचा पुढें उपयोग होईना; कारण जपान्यांच्या तें लक्षांत आलें होतें. पण ही उणीव लवकरच भरून काढण्यांत आली. खेड्यांतली सहकारी संस्था जखमा बांधण्याची बँडेजीस, कापूस, गॉझ, शस्त्रक्रियेचीं उपकरणें इत्यादि वैद्यकीय शास्त्र मागें पडून आधुनिक शास्त्रांच्या साहाय्यानें नवीन वैद्यकीय साहित्य तयार होऊं लागलें. पण जंतुनाशक, रोग-प्रतिबंधक आणि शस्त्रक्रियेच्या वेळीं देण्यांत येणारें गुंगीचें औषध तयार करणें सहकारी संस्थांना अशक्य होतें.

१९४० डिसेंबरला डॉ. बसू योनानला आले, तेव्हां त्यांची डोळ्यांचे, नाकाचे आणि गळ्याचे सर्जन म्हणून "इंटरनॅशनल" हॉस्पिटलमध्यें नेमणूक करण्यांत आली. मागें "आदर्श हॉस्पिटल" म्हणून ज्याचा उल्लेख झाला आहे, तें हेंच हॉस्पिटल. हॉस्पिटल अर्थात् गुहेमध्येंच उभारण्यांत आलें होतें. बाहेरून जे रोगी उपचाराकरितां येत, त्यांच्याकरितां झोंपड्या उभ्या केल्या होत्या. येथें दररोज जवळ जवळ शंभर माणसांना तपासावें लागे. दुसरे तज्ज्ञ डॉक्टर कोणीही नव्हते. त्यामुळें सर्व जबाबदारी डॉ. बसूंवरच पडली होती.

शॅंचाय, कॅंटन शहरामध्यें कांहीं हिंदी वैदू डोळ्यांच्या विकारावर औषध देत होते. त्यामुळें चिनी लोकांत सर्वसाधारण असा समज (म्हणजे गैरसमज) पसरला आहे कीं, हिंदी डॉक्टर डोळ्यांचे रोग सुधारण्यांत फार हुशार असतात. त्यामुळें येथें हॉस्पिटलमध्यें डोळ्यांचे विकार झालेले रोगी पुष्कळ येऊं लागले. पण एके दिवशीं एक विलक्षण डोळ्यांची 'केस' आली. एक तरुण शेतकरी उपचाराकरितां आला. आघाडीवर त्याच्यासमोर थोड्या अंतरावर तोफेचा गोळा पडला. स्फोट झाला आणि गोळ्याचे बारीक तुकडे त्याच्या डोळ्यांत गेले. सैन्यांतून त्याला काढण्यांत आलें आणि अशा निकामी झालेल्या शिपायांची एक सहकारी संस्था ( Disauled-Soldier-Co-Op. ) आहे, तेथें त्याला पाठविण्यात आलें. पण त्याचें दुर्दैव असें कीं त्याची बायको थोड्याच दिवसांत पळाली. बायकोवर

त्याचें निस्सीम प्रेम, त्यामुळें बिचाऱ्यानें कित्येक रात्री दुःखांत घालविल्या. शेवटीं डॉ. बसूविषयीं त्याला बातमी लागली आणि तो धांवतच इंटर-नॅशनल-हॉस्पिटलमध्यें आला. डॉ. बसूंनीं त्याचे डोळे तपासले तेव्हां त्यांना आढळून आलें कीं, त्याचा एक डोळा सुधारण्याची आशा होती. दुसरा मात्र कायमचा निकामी झाला होता.

शस्त्रक्रिया अत्यंत धोक्याची होती. डोळ्याच्या बाहुलीला भोंक पाडावें लागणार होतें; इतकें करूनही शस्त्रक्रिया यशस्वी होईलच असें निश्चित सांगतां येत नव्हतें. बसूंनीं ह्या अडचणी त्या तरुण शतकऱ्याला समजावून दिल्या. पण तो एकसारखा आग्रह करूं लागला, "काय होईल तें होवो, पण माझ्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया करा."

पण दुसरी अडचण आली ती शस्त्रक्रिया करण्याच्या उपकरणांची. शेवटीं बसूंनीं एका सहकारी संस्थेला नमुने देऊन, उपकरणें तयार करायला सांगितलीं; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. एका डॉक्टरनीं सूचना केली कीं, बांबूच्या तीक्ष्ण उपकरणांनीं शस्त्रक्रिया करावी. पण 'कॉर्निआ' (डोळ्याच्या बुब्बुळाजवळचा भाग) जुनाट स्नायु कापण्याकरितां बसूंना तीक्ष्ण लहानशी कातरी पाहिजे होती. एका लहानशा क्षुल्लक कातरीकरितां ही महत्त्वाची शस्त्रक्रिया अडून राहिली. पण एक दिवस बसूंना कातरी सांपडली. एक चिनी डॉक्टर कातरीनें मिशा सारख्या करीत होता. बसूंनीं त्याच्याजवळून ती हिसकावून घेतली आणि ते धांवत सुटले. तात्काळतोब शस्त्रक्रियेची तयारी सुरू झाली. कातरी गरम पाण्यांत उकळत ठेवली. आणि थोड्याच वेळांत शस्त्रक्रियेला सुरुवात झाली. शस्त्रक्रिया अर्धी झाली नाहीं तोंच तो तरुण शेतकरी हर्षानें ओरडून सांगू लागला—"डॉक्टर, मला दिसूं लागलें, डॉक्टर, मला दिसूं लागलें." आणि—ह्या गोष्टीचा शेवट मोठा मजेदार आहे. त्याची पळून गेलेली बायको परत आली आणि हा तरुण शेतकरी आपल्या देशाचें स्वातंत्र्य मिळवण्याकरितां सैन्यांत दाखल झाला.

१९४० जूनपासून १९४३ पर्यंत बसूंनीं येनानमध्यें काम केलें. पूर्वीपेक्षां हें काम ठराविक सांच्याचें होतें. हॉस्पिटलमध्यें काम करायचें. इतर दवाखान्यांवर व वॉर्डवर देखरेख करायची आणि 'खाजगी केसिस' घ्यायच्या.

ह्या तीन वर्षांत वसूंनीं शेतकरी, शिपाई यांच्यावर उपचार केलेच; पण मॉ–त्से तुंग आणि चू–ते त्यांचेही तेच डॉक्टर होते.

येनानमध्यें ह्यावेळीं पुष्कळ देशांतले लोक होते. कोरिआ-मलायामधले, आणि विशेष आश्चर्य म्हणजे फासिस्टविरोधी जपानी सुद्धां. डॉ. वसूंनीं या सर्व लोकांच्या सहकार्यानें "Anti Fascist League of Oriental Nations" नांवाची एक संस्था काढली. संस्थेचें मुख्य कार्य म्हणजे रेडिओच्या सहाय्यानें निरनिराळ्या भाषेंत फासिस्टविरोधी प्रचार करणें. थोड्याच दिवसांत ही संस्था इतकी नांवारूपाला आली, कीं "बॉर्डर गव्हर्नमेंटनें" या संस्थेला रीजनल पार्लमेंटमध्यें एक प्रतिनिधि पाठविण्याची विनंति केली. रीजनल पार्लमेंटमध्यें शाळा–कॉलेजांतून, राजकीय आणि साहित्यसंस्थांतून, कामगारांतून–शेतकऱ्यांतून, व्यापारी संस्थांतून प्रतिनिधि येतात. लढाईच्या वेळीं हल्ले–प्रतिहल्ले होत असतांनाही दरवर्षीं निवडणुकी चालू असतात. भांडवलशाही राष्ट्रांचें मत आहे कीं, लढाईच्या वेळीं निवडणुका घेणें शक्य नाहीं. पण इथल्या लोकांनीं हें भांडवलशाही शास्त्र खोटें करून दाखविलें आहे.

प्रत्येक राष्ट्रांत परकी माणसांना नागरिकत्वाचा हक्क मिळविण्याकरितां पुष्कळ अडचणी येतात. अमेरिकेंत तीच स्थिति आहे. दक्षिण आफ्रिके-मधील हिंदी लोकांना मतदानाचा हक्क नाहीं. पण युद्धकालीन चीनमध्यें चीनची सेवा करायला आलेल्या कोणाही मनुष्यास चीनचें नागरिकत्व मिळतें. इतकेंच काय, पण कायदेमंडळाचे सभासदही होतां येते. रीजनल पार्लमेंटमध्यें वसूंना प्रतिनिधि म्हणून पाठविण्यांत आलें. दोन जपानी शेतकऱ्यांचे प्रतिनिधि म्हणून आले होते, त्यांनाही पार्लमेंटनें मान्यता दिली.

हरतऱ्हेचे लोक पार्लमेंटमध्यें होते. लेखक, विचारवंत, शेतकरी, तलम रेशमी झगे घातलेले जमीनदार, सैन्यांतील अधिकारी, विद्यार्थी, तरुण मुली, वयस्क स्त्रिया, शिवाय अल्पसंख्याकांमधले, मँगोलियन, मंचून, तिबेटियन आणि मुस्लीमही होते.

राजकीय दृष्ट्या ही एक संयुक्त आघाडी आहे. कम्युनिस्टांचे आणि कोमिटांगचे प्रतिनिधिही येथें आहेत. मात्र कम्युनिस्टांची संख्या एकतृतीयांश आहे. चीनच्या पुढच्या नमुनेदार लोकशाहीचें हें एक उत्तम प्रतीक आहे.

१९४३ मध्यें बसू हिंदुस्थानांत परत यायला निघाले. रॉयटरचे हिंदुस्थानांत होणाऱ्या घडामोडींविषयीं संदेश येत. पण ते फार अपुरे असत. पांच वर्षं बसू सतत चीनमध्यें काम करीत होते. मायदेशाला जायची त्यांना आतां उत्कंठा लागली यांत काय वावगें होतें? चीन सोडतांना त्यांचें हृदय अतीव दुःखानें भरून आलें होतें; पण चीनच्या फायद्यासाठींच ते हिंदुस्थानला जात होते. कारण शक्य झाल्यास दुसरें वैद्यकीय पथक त्यांना चीनला आणायचें होतें.

जेवणाचीं आमंत्रणें आणि सभांची रेलचेल उडाली. चिनी दोस्तांचें त्यांच्याविषयींचें तें प्रेम पाहून बसूंचे डोळे भरून येत. आणि शेवटीं त्यांनीं जेव्हां त्यांच्या "पेशन्टस्‌चा" निरोप घेतला, तेव्हां कांहीं रोगी ढळढळां रडायला लागले. डॉक्टर परत चालले हें त्यांना खरेंच वाटेना. एक तरुण विद्यार्थी रडत रडत बसूंजवळ येऊन म्हणाला, "डॉक्टर, लवकर परत या. तुम्ही आलां नाहीं, तर माझा डोळा बरा कसा होणार? माझ्या चीनकरितां मी कसा लढणार?" त्या साध्याभोळ्या प्रेमळ जीवाचे ते शब्द ऐकून बसूंचें हृदय कसल्या तरी विलक्षण सुखाच्या संवेदनेनें थरारून गेलें.

पण येनानहून बसू चुंकिंगला आले, तेव्हां त्यांचें हृदय दुःखानें भरून गेलें होतें. कोटणीस व बसू हिंदुस्थानला बरोबर येणार होते. पण कोटणीस कुठले त्यांच्याबरोबर यायला? कोटणीस हिंदुस्थानला कधींच परतणार नव्हते. कोटणीस......! कोटणीसांना मृत्यु आला होता.

# १३

## AND ONE DID NOT COME BACK.

'Lo, soul, seets thou not God's purpose from the first ?
The earth to be spanned, connected by network.
The races, neighbours, to marry and be given in marriage.
The oceans to be crossed, the distant brought near.
The lands to be welded together–

—WALT-WHITMAN

डॉ. बसू येनानला गेल्यानंतर फ्युचिंगजवळच्या मुख्य केंद्राकडे डॉ. कोटणीस एकटेच राहिले. त्यांनीं तेथून हॉस्पिटल व मेडिकल स्कूलमध्यें काम करण्यास सुरुवात केली. चिनी भाषेवर त्यांनीं आतां चांगलेंच प्रभुत्व मिळविलें होतें. आणि त्यामुळें एखाद्या चिनी डॉक्टरानें जितक्या सफाईनें काम केलें असतें, तितक्या सफाईनें ते काम करीत. चिनी जीवनाशीं ते अधिकाधिक समरस होत होते. कोटणीसांचा मूळचा स्वभाव आनंदी आणि थोडा साहसीही, पण युद्धाच्या आगींत सांपडलेल्या चीनची गंभीर परिस्थिति पाहून त्यांची साहसी वृत्ति एका विशिष्ट दृष्टीनें वळण घेऊं लागली. राजकारणाचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास ते झटून करूं लागले. चर्चेंत भाग घेऊं लागले. आणि त्याचा परिणाम असा झाला, कीं त्यांचा दृष्टिकोन व्यापक झाला. ते पक्के फॅसिस्टविरोधी झाले. आणि त्यांच्या आठव्या पलटणींतील कम्युनिस्ट दोस्तांच्या दृष्टीसमोर जो ध्येयवाद होता, त्या ध्येयासाठीं आपला देह कुरबान करण्याची त्यांची वाटेल त्या क्षणीं तयारी होती, त्या ध्येयवादाशीं कोटणीस पुरते समरस झाले.

जपानी सैन्याला उत्तर चीनमधील प्रत्येक खेडें काबीज करतां येणें शक्य नाहीं. पण प्रत्येक वर्षी जपानी सैन्य एक हल्ला करतें. हा हल्ला एका विशिष्ट हेतूनें केला जातो. तो हेतु म्हणजे गरीबगुरीब शेतकऱ्यांना घाबरवून सोडायचें आणि गनिमी सैनिकांना हुडकून ठार मारायचें हा होय. ह्या हल्ल्याला " मॉपिंग–अप–कॅम्पेन " म्हणतात. ह्या वेळीं आठव्या पलटणीची मुख्य कचेरी येथून हॉस्पिटल आणि मेडिकल स्कूल सारखें एका जागेवरून दुसऱ्या जागेवर बदलावीं लागत. कारण शत्रूचें सैन्य अफाट असतें, तेव्हां त्याला चुकवून, रात्रींच्या वेळीं छुपे हल्ले करून तोंड द्यावें लागतें. ही खरी आणि आणीबाणीची वेळ असते. शत्रूला मोठ्या चातुर्यानें तोंड द्यावें लागतें. हृदय दगडासारखें कठीण करावें लागतें. साध्यासुध्या मनुष्याची येथें डाळ शिजायची नाहीं.

डॉ. बसू गेल्यानंतर एक महिन्यानंतर " मॉपिंग–अप–कॅम्पेन " सुरू झाला. झोंपेशिवाय रात्रींच्या रात्री जाऊं लागल्या. हल्ले चालूच असत; एकीकडे भुकेनें पोटांत थैमान घातलेलें असावें आणि दुसरीकडे शत्रूकडून आगीचा वर्षाव होत असावा. ता. १६ जानेवारी १९४१ रोजीं कोटणीसांनीं बसूंना चीन–त्साची पेन्सहून लिहिलेल्या पत्रांत ह्या हल्ल्याचा ओझरता उल्लेख पहा..."तुम्हीं इथून गेल्यानंतर महिन्यानंतर ठरलेला "मॉपिंग–अप–कॅम्पेन" सुरू झाला. उत्तर चीनमधील मुख्य सैनिकतज्ज्ञांनीं वीस हजार सैन्याला आघाडीवर पाठविलें आहे. सतत एक महिना शत्रूला चुकवीत आम्हीं " आगे–कूच " करीत होतों. शाळेच्या अधिकाऱ्यांनीं पुढें सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आणि चळवळ चालू ठेवली हें मोठें पाहण्यासारखें आणि धडा घेण्यासारखें होतें. विद्यार्थी पाहण्याचीं आणि टेहळणीचीं कामें पाहत. चळवळींत आम्हीं आमचे पांच विद्यार्थी गमावले."

आतां माझ्याबद्दल म्हणाल, तर मी कामांतच गुंग होतों म्हणानात. कारण पहिल्या तीन गटांतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना डॉक्टरकीची पदवी द्यायची होती. ( पदवीदान-समारंभ उद्यां आहे. ) शिवाय मी डॉ. पेंग यांच्या शस्त्रक्रिया शिक्षणाकडे जरा जास्त लक्ष देत आहे. तेव्हां मला वेळ कसा तो मुळींच नाहीं. आजूबाजूला घाईचें आणि उत्साहाचें वातावरण भरून राहिलें आहे.

जीवाला थोडें बरें वाटतें, आणि आपण कांहीं तरी नवें नवें मिळवितों असें वाटतें मला.''

आणि थोडयाच दिवसांत एक अनपेक्षित घटना घडून आली. ती नाजुक आणि विलक्षण होती. पण ह्या घटनेमागें कोटनीस ज्या प्रामाणिकपणें चीनच्या स्वातंत्र्याकरितां लढत होते, त्या भावनेचें महत्त्व होतें. कोटणीस एका चिनी मुलीच्या प्रेमांत पडले.

तिचें नांव को-चिंग-लॅन. पांच फूट उंचीची, हुशार, सुरेख आणि मोकळया स्वभावाची ती मुलगी होती. बेथून हॉस्पिटलचे कोटणीस प्रिन्सिपल होते, आणि त्याच हॉस्पिटलमध्यें ती परिचारिकांची शिक्षिका होती. मूळची ही पेपिंग येथील एका सुखवस्तु घराण्यांतील मुलगी. युनियन मेडिकल कॉलेजमध्यें हिचें शिक्षण पुरें झालें आणि थोडयाच दिवसांत युद्ध सुरू झालें. लढाईच्या धुमश्चक्रींत इतर हजारों लोकांप्रमाणें पालकांपासून हिची ताटातूट झाली. नंतर शेंकडों मैलांचा प्रवास पायीं करून शेवटीं तिनें आठव्या पलटणींत आपलें नांव दाखल केलें.

कोटणीसांच्या हाताखालीं ती काम करायची. त्या दोघांचें प्रेम जमलें यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं. आपला देश सोडून आपलें सर्वस्व चीनला वाहिलेल्या या शूर तरुणावर ती प्रीति करूं लागली यांत नवल काय?

को-चिंग-लॅन इतर चिनी मुलींप्रमाणें लाजाळू नव्हती. इंग्रजी ती फार सफाईदार रीतीनें बोलायची. कोटणीस आणि ती नेहमीं हिंदुस्थानवर, जागतिक राजकारणावर आणि कधींकधीं स्वत:बद्दलहि चर्चा करीत असत. कोटणीसांविषयीं को-चिंग-लॅनला आदर वाटत होता. हलके हलके आदराची जागा प्रेमानें घेतली. युद्धकालामध्यें प्रियाराधन करायला वेळ कुठें असतो? तें सर्व शांततेच्या वेळीं. तरी प्रेमाचा शेवटचा प्रश्न टाकतेवेळीं कोटणीसांना कोण प्रयास पडले, "मी करतों तें बरोबर आहे ना? तिच्या मोकळ्या स्वभावाचा गैरफायदा तर मी घेत नाहीं ना? मीं इथं आलों चीनची सेवा करायला. मग हें माझं कृत्य बरोबर कीं चूक आहे? चिनी लोकांच्या मैत्रीचा मी गैरफायदा घेत नाहीं ना?" असे हजारों प्रश्न त्यांच्या मनांत थैमान करूं लागले. पूर्वी चीनमध्यें परकी देशांतील माणसांविषयीं बरेच गैरसमज पसरलेले

असत. अंतर्राष्ट्रीय विवाहावर लोक बहिष्कार टाकीत. मग ह्या विवाहानें चिनी लोकांच्या भावना दुखावल्या जाणार होत्या का? हिंदुस्थान-चीनच्या ऐक्याला ह्या विवाहानें कांहीं धक्का तर बसणार नव्हता ना? हे प्रश्न कोटणीसांच्या मनांत येणें साहजिक होतें. कारण कोटणीस एक साधे डॉक्टर म्हणून चीनला गेले नव्हते. ते हिंदुस्थानचे प्रतिनिधी होते. त्यामुळें सगळी परिस्थिति लक्षांत घ्यावी लागली. त्यांच्या मनाचा गोंधळ उडणें साहजिक होतें.

आणि एका सुंदर सकाळीं कोटणीसांनीं आपला हा बेत आपल्या मित्र-मंडळींना बोलून दाखविला. त्या वेळेस कोणीही विरोध केला नाहीं. आसपासच्या खेड्यांत बातमी पसरली. सर्व लोकांना आनंद झाला. कोटणीस मोठ्या आपुलकीनें आणि परिश्रमानें चिनी जनतेची सेवा करीत होते. त्यामुळें ते सर्वांचे लाडके झाले होते. चिनी लोक त्यांना आपल्यांतलाच एक माणूस समजत. मोठ्या प्रेमानें ते त्यांना हांका मारीत, "चूंगो–हैजा" (चीनचा मुलगा) आणि चुंगे-हैजा आतां चीनचा "जांवईबापू" होत होता. साऱ्या चिनी जनतेला मोठा संतोष झाला.

अशा आनंदी वातावरणांत एक दिवस लग्नसमारंभ पार पडला. नवऱ्याच्या बाजूची कुणी मंडळी नव्हती. पण ती उणीव कोटणीसांच्या चिनी मित्रांनीं भरून काढली.

डॉ. बसूंना पाठविलेल्या पत्रांत कोटणीसांच्या कामाची आणि त्यांच्या मन:स्थितीची कल्पना बरोबर येते. हीं पत्रें येनानला जाणाऱ्या एखाद्या कॉम्रेडबरोबर पाठवावीं लागत. शत्रूचे हल्ले ठिकठिकाणीं गंभीर स्वरूपाचे चालूच होते. त्यामुळें पत्रें बसूंना नक्की मिळतात कीं नाहीं हें कोटणीसांना कळणें शक्य नव्हतें. त्यामुळें कोटणीस एका पत्रांत लिहिलेला मजकूर परत लिहीत. चार जानेवारी रोजीं लिहिलेल्या पत्रांत आपल्या लग्नाची बातमी कोटणीस लिहितात.—

"गेल्या संबंध वर्षांत मीं इथें काय काम केलें याची तुम्हांला थोडक्यांत माहिती सांगणार आहे. आतां एक जानेवारी रोजीं अधिकृत रीत्या मी आठव्या पलटणींत सामील झाल्यानंतर, बेथून हॉस्पिटलची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे.

वेथून मेडिकल स्कूलच्या वॉर्डला आणखी एक जादा वॉर्ड जोडण्यांत आला आहे. दोन्ही वार्डमध्यें एकंदर दोनशें रोगी आहेत. मी मुख्याधिकारी असल्यामुळें सर्व कामें मला पाहावीं लागतात. आणि वेळ कामांत कसा निघून जातो तें समजत नाहीं. गेल्या वर्षांत आम्हीं एकंदर ४३० शस्त्रक्रिया केल्या. त्यांत ४५ जणांचे अवयव कापावे लागले; २० जणांच्या " हर्निया " रोगाच्या शस्त्रक्रिया, ३५ जणांच्या कमरेच्या शस्त्रक्रिया, तिघांच्या आंतड्याच्या शस्त्रक्रिया, कांहीं बाळंतपणाच्या शस्त्रक्रिया आणि इतर शस्त्रक्रिया मिळून ४३० शस्त्रक्रिया आम्ही पार पाडल्या. अशा प्रकारच्या कामांत माझा वेळ जातो. शास्त्रीय वाचन करायला मला वेळच नाहीं. पण शस्त्रक्रियेच्या तंत्रांत मला अमोल अनुभव मिळाला आहे.

आतां माझ्या वाचनाविषयीं म्हणाल, तर राजकारणावर लिहिलेलीं इंग्रजी पुस्तकें मला मुळींच मिळत नाहींत. ( येनानहून मला एकही पुस्तक आलेलें नाहीं. ) वर्ष दीड वर्षांत वाचनाच्या बाबतींत माझी चांगलीच कुचंबणा झाली आहे. पण चिनी भाषा येत असल्यामुळें चिनी क्रान्तीचा इतिहास व इतर कांहीं पुस्तकें, तसेंच चिनी वर्तमानपत्रें मी शब्दकोशाच्या सहाय्यानें वाचूं शकतों. अग्रलेखांत बदललेल्या राजकारणावर चांगले लेख असतात. पण माझी खरी अडचण वेळेची आहे. माझें काम माझा अर्धाअधिक वेळ खाऊन टाकतें; त्यामुळें माझा राजकारणाचा अभ्यास माझ्या मताप्रमाणें समाधानकारक नाहीं.

गेल्या सबंध वर्षांत मी कांहीं नवीन मिळविलें असेल, तर माझ्या स्वभावांत झालेला बदल. येनानला येण्यापूर्वीं माझें राजकारणाविषयींचें ज्ञान किती अगाध होतें हें तुम्हाला माहितच आहे. माझ्या मनांत राष्ट्रीय भावनेचे कोते विचार, आणि क्रान्ति करण्याच्या कसल्या मूर्ख कल्पना त्या वेळीं भरल्या होत्या ! मध्यम वर्गाच्या संस्कृतीचा पगडा माझ्यावर पूर्णपणें होता. पण इथें एक वर्षांत आठव्या पलटणीबरोबर सुरुवात झाल्यानंतर सभेंत, चर्चेच्या वेळीं माझ्यावर कठोर टीका व्हायची. पण ह्या टीकेमुळें माझा फायदाच झाला. माझे कोते विचार, खुळ्या कल्पना विरून गेल्या आहेत. माझ्या आयुष्याला चांगलें वळण लागलें आहे. स्वभावांत विलक्षण फरक पडला आहे. त्या

दृष्टीनें मला वाटतें–१९४१ हें माझ्या दृष्टीनें माझ्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचें वर्ष आहे.

आपण हिंदुस्थानांत परत जायचें ना ? हो––पण त्याच्या आधीं मला तुम्हाला एक बातमी सांगायची आहे. आपल्या मेडिकल स्कूलमधील ती जाड काचांचा चष्मा लावणारी मुलगी तुम्हाला माहित आहे ना ? को-चिंग-लॅन–तिच्याबरोबर २५ नोव्हेंबरला मीं लग्न केलें. तुम्ही "ॲन्टी फॅसिस्ट असोसिएशन ऑफ ईस्टर्न नेशन" या संस्थेमध्यें फार उत्तम तऱ्हेनें काम करतां आहात, आणि "बॉर्डर गव्हर्नमेन्ट" मध्यें तुम्हाला कौन्सिलर नेमलें आहे. माझ्या लग्नाच्या निर्णयाच्या दृष्टीनें, तुमच्या या हुद्याच्या जागा मला फायदेशीर पडल्या. असो––पण एकंदरींत राजकीय काम करण्यांत तुम्हीं अगदीं गुंग असाल असें दिसतें. मलाही हिंदुस्थानला परतण्याची फारशी घाई नाहीं. पण जाते वेळीं आपण दोघेही बरोबर जाऊं आणि यापुढें एकत्रच काम करूं. माझें लग्न झालें असलें तरी हिंदुस्थानला परत जातांना लग्नाची कांहीं आडकाठी येणार नाहीं. आणि लग्नाच्या मुद्याला कशाला इतकें महत्त्व द्यायचें ?"

जून १९४२ ला कोटणीसांनीं बसूंना एक लांबलचक पत्र लिहिलें, त्यांत ते लिहितात.

" आतांपर्यंत मीं तुम्हाला बरींच पत्रें लिहिलीं. पण दुर्दैवानें तुम्हाला तीं पोहोंचूं शकलीं नाहींत. याचें कारण असें कीं, ज्या कॉमरेडबरोबर मी तीं देत होतों, ते येनानला पोंचूं शकले नाहींत, अर्ध्या वाटेंतूनच ते परत यायचे. त्यामुळें तुम्हाला अजूनपर्यंत माझीं किती पत्रें मिळालीं याची मला कांहींच कल्पना नाहीं. म्हणून मी तुम्हाला, आपण एकमेकांपासून दुरावलों तेव्हांपासून मीं काय काय केलें हें थोडक्यांत सांगतों."

मागची सगळी हकीगत कोटणीसांनीं परत लिहून, ते पुढें म्हणतात, "सध्यां शाळेनें मला शस्त्रक्रियेवर ( Surgery ) डॉक्टरच्या वर्गाकरितां एक पुस्तक लिहायला सांगितलें आहे. ह्या कामांत माझा बराचसा वेळ जातो. कारण नुसतें इंग्रजीमध्येंच हें लिहायचें नाहीं, तर परत तें चिनी भाषेंत भाषांतर करावें लागतें.

दुसरी महत्त्वाची गोष्ट सांगायची म्हणजे गेल्या नोव्हेंबरमध्यें माझें लग्न झालें. माझ्या बायकोचें नांव कॉ. को-चिंग-लॅन हे तुम्हाला माहितच असेल. आमच्या शाळेंत ती शिक्षिका आहे. मला वाटतें, हें पत्र तुमच्या हातीं पडेल, तेव्हां मला मुलगा झालेला असेल.

हिंदुस्थानला परत जाण्यासाठीं आतां मी फार अधीर झालोंय. पण त्यासाठीं मला पहिल्या प्रथम येनानला यावें लागेल आणि येनानला पोहोंचायला किती दिवस लागतील तें कसें सांगावें? बहुधा या वर्षाअखेर अथवा नव्या वर्षाच्या सुरवातीला मी इथून निघेन. पण त्याच्याआधीं दोन गोष्टींसाठीं मला इथें थांबलेंच पाहिजे. पहिली माझें "शस्त्रक्रियेवरचें" पुस्तक पुरें झालें पाहिजे. आणि दुसरी, माझें बाळ पाहायची मला फार उत्सुकता लागली आहे.

चँग बुजांग नुकताच इथें आला. त्यानें सांगितलें कीं, तुम्हीं हिंदुस्थानला कांहीं लवकर जात नाहीं. त्याचा निरोप ऐकून मला फार आनंद झाला. आपण दोघे बरोबरच जाऊं. थांबणार ना तुम्ही माझ्यासाठीं? हिंदुस्थानांतील घटनांचे जे पडसाद ऐकू येतात त्यावरून मला वाटतें कीं, चीनमध्यें आतां आपल्याला जास्त दिवस राहतां येणार नाहीं. हिंदुस्थानच्या आघाडीवर आतां आपली जरूरी आहे. तुम्हाला पटतें ना हे?"

या पत्रामध्यें करुण भावना आहे-शेवटीं कोटणीसांनीं बसूंना विचारलेला प्रश्न-'आपण दोघे बरोबर जाऊं. थांबणार ना तुम्हीं माझ्यासाठीं?' आणि बसू कोटणीसांच्या करितां थांबलेही. पण......कोटणीस परत आले नाहींत, आणि आतां कधींच परत येणार नाहींत...!

कोटणीसांची ही कथा म्हणजे एक शोककारक घटना आहे. ती मनांत प्रेरणा उत्पन्न करील. पण त्याबरोबर हृदयाला चटकाही लावील. नोव्हेंबर १९४१ मध्यें त्यांचें लग्न झालें. जुलै १९४२ ला त्यांना मुलगा झाला. आणि ९ डिसेंबर १९४२ ला कोटणीसांना मृत्यु आला.

जपानी "मॉपिंग-अप-कॅम्पेन"च्या वेळीं कोटणीसांना अतिशय त्रास झाला. त्यांची प्रकृति एकदम ढांसळली. मेंदूवर भयंकर ताण पडला. आणि वर्षभर

झटके येऊन ते बेशुद्ध पडायचे. पण ही गोष्ट त्यांनीं कुणालाही कळूं दिली नाहीं. स्वतःच्या पत्नीजवळही याबद्दल त्यांनीं अवाक्षर काढलें नाहीं. स्वतः डॉक्टर असल्यामुळें झटका केव्हां येईल हें साधारणपणें त्यांना कळायचें. अशा वेळीं ते एकटेच टेकडीच्या बाजूला जाऊन पडायचे. झटक्याचा जोर ओसरला कीं परत यायचे.

विश्रांति नाहीं, चांगल्या अन्नाचा तुटवडा, कामाचा प्रचंड बोजा, आणि औषधांची उणीव या सर्व गोष्टींचा मेळ एकदम बसला. कोटणीसांचें शरीर कमकुवत बनत गेलें. आणि शेवटीं या झटक्यांनीं घात केला.

उत्तर चीनमधील एका झोंपडींत कोटणीसांची प्राणज्योत निमाली...!

शेवटची घटका भरत आली. तेव्हां आपल्या लाडक्या पत्नीकडे त्यांनीं दृष्टि टाकली. तिच्या कडेवर सहा महिन्यांचें बालक होतें. हिंदुस्थान–चीनच्या ऐक्याचें तें छोटें प्रतीक होतें. शेवटचें आपल्या पत्नीकडें त्यांनीं पाहिलें आणि त्यांच्या मुखावर हास्य उमटलें. क्षणांत डोळे मिटले. ते कांहीं परत उघडले नाहींत. पण मुखावरचें हास्य मात्र तसेंच राहिलें. त्यांचें शौर्य आणि निर्भयपणा तें दाखवित होतें.

झोंपडीबाहेर सैन्यांतील अधिकारी आणि शिपाई उभे होते. त्यांचीं माथीं दुःखानें खालीं वांकलीं. त्यांचा दोस्त त्यांना आतां परत कधींच दिसणार नव्हता.

दूर हिंदुस्थानांत कोटणीसांच्या आईला "केबल" मिळणार होती. असीम दुःखाच्या वेदना आतां तिला सहन करायच्या होत्या.

एक राष्ट्र तिच्याबरोबर दुःखी झालें. दोन राष्ट्रें तिच्या दुःखांत सहभागी झालीं. आणि जगांतल्या ज्या राष्ट्रांना स्वातंत्र्याची आणि माणुसकीची किंमत कळली तीं राष्ट्रें तिच्या दुःखांत सामील झालीं.

कोटणीस...कोटणीस, तुम्हीं परत आला नाहींत, पण तुमची आठवण पुढच्या पिढया सतत प्रेमानें हृदयांत ठेवतील.

मादाम सन-यत-सेननीं हिंदुस्थानांत पाठविलेल्या संदेशांत म्हटलें, "डॉ. कोटणीसांची आठवण आमच्या दोन महान् देशांपुरती मर्यादित नाहीं.

तर स्वातंत्र्यासाठीं आणि मानवतेच्या प्रगतीसाठीं झगडणाऱ्या प्रत्येक असामान्य वीराच्या हृदयांत त्यांच्या स्मृतीची ज्योत सतत तेवत राहील.

आज त्यांच्या महान् कार्याची जाणीव कोणाला फारशी येणार नाहीं. पण भविष्यकाळांत त्यांच्या कार्यावर स्तुतिसुमनांचा अविरत वर्षाव होईल. कारण पुढच्या नव्या पिढीच्या मांगल्याकरितां ते झगडले आणि झगडतां, झगडतां त्यांना मृत्यु आला—वीराचें मरण आलें !"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
6723
REFBK-0006723